नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९ ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९ ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९
दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक
ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९ ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९ ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९
दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक
ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९ ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९ ऑगस्ट सप्टेंबर ऑक्टोबर १९७९
दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक दिवाळी अंक



अनुक्रमणिका

साभार पोच

क्रमांक	पुस्तकाचे नाव	लेखक	प्रकाशक	पृष्ठे	किंमत रुपये
१.	व्यक्ती आणि विचार	य. दि. फडके	विद्या प्रकाशन, पुणे	१९२	२२-००
२.	काळा हिटलर	आनंद हार्डीकर	--,,--	१६४	१५-००
३.	एक आत्महत्या पंथाची अखेर	विजय कुवळेकर	--,,--	१५७	१७-५०
४.	क्रान्तिवीर बाबाराव सावरकर	द. न. गोखले	--,,--	३४३	३०-००
५.	ही बांधावरची माणसं	अर्जुन डांगळे	मागोवा प्रकाशन, पुणे	१०२	८-००
६.	भूमिसंभवा	डॉ. सुशिला पाटील	पंडित अनंत कुळकर्णी १८६ शनिवार, पुणे-३०	१७५	१५-००
७.	यक्षगान आणि मराठी नाट्य परंपरा	डॉ. एम. एस. कृष्णमुर्ति प्रा. तारा भवाळकर	मराठी साहित्य परिषद आंध्र प्रदेश, हैद्राबाद	४३	४-००
८.	काव्य शिल्प	के. एन. नांदूरकर	मंगल प्रकाशन, नशिराबाद	४९	५-००
९.	हाय मोंगलाई	सिनिक	आनंद अंतरकर, कर्वे रोड, पुणे	७७	१०-००
१०.	ग्राम जयंती यात्रा	बाबा मोहोड	गुरूदेव प्रकाशन, गुरुकुंज मोझरी, (जि. अमरावती)	११०	६-००
११.	मनोहर अंबानगरी (मुकुंदराज : स्थल कालनिर्णय)	डॉ. म. रा. जोशी	हिंदु धर्म संस्कृति मंदिर, धंतोली, नागपूर	१८०	१७-००

' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

ऑगस्ट-सप्टेंबर-ऑक्टोबर
१९७९
श्रावण–भाद्रपद–आश्विन
१९०१

संपादक :
वि. बा. प्रभुदेसाई

मूल्य पाच रुपये)   (वर्ष ३५, अंक ३/४/५.

संपादकीय

कथा, कविता, समीक्षा, संशोधनपर लेख अशा विविध प्रकारच्या साहित्याने सजवलेला हा दिवाळी अंक रसिकांना सादर करताना संपादक मंडळाला अतिशय आनंद वाटतो. विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र या नात्याने प्रामुख्याने या प्रदेशातील साहित्याला प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट असले तरी 'युगवाणी'चा लेखकवर्ग हा प्रादेशिक मर्यादांनी आक्रसला गेलेला नाही हे या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या लिखाणावरून सहज ध्यानात यावे. कविवर्य केशवसुतांच्या अत्यंत अर्थपूर्ण शब्दात सांगावयाचे झाल्यास, "तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा !... मळचास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे ! जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत".

विदर्भाप्रमाणेच महाराष्ट्राच्या विविध विभागांतील आणि बृहन्महाराष्ट्रातील देखील अनेक साहित्यिकांनी स्वयंस्फूर्तीने आपापले साहित्य पाठवून 'युगवाणी' विषयीचे अगत्य प्रगट केले आहे, या गोष्टीचा कृतज्ञतापूर्वक निर्देश करायला हवा.

यंदाचे वर्ष हे 'राजभाषा–वर्ष' असून महाराष्ट्र राज्याची लोकभाषा जी मराठी तिचे सामर्थ्य व समृद्धी यांवर प्रकाश टाकणारे जाणकारांचे लेख 'युगवाणी'च्या एका विशेषांकात प्रसिद्ध होतील. संपादकांच्या प्रस्तुत उपक्रमाला नामवंत लेखकांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे याचा संतोष वाटतो.

वि. सा. संघाचे सर्व सभासद व 'युगवाणी'चे वाचक यांना दीपावली व नूतन वर्ष सुखाचे जावो.

म. म. दत्तो वामन पोतदार यांचे निधन

ज्येष्ठ मराठी साहित्यिक आणि थोर इतिहास संशोधक महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार यांच्या ८९ व्या वर्षी पुणे येथे दि. ६–१०–१९७९ रोजी देहावसान झाले.

१९३९ साली अहमदनगर येथे भरलेल्या चोवीसाव्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

म. म. पोतदार हे काही काळ पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती, भारत इतिहास संशोधक मंडळाचे व महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार सभेचेही अध्यक्ष होते. मराठीप्रमाणेच संस्कृत व हिंदी भाषांवरील प्रभुत्वाने त्यांनी अनेक सभा–संमेलने गाजविली आहेत. १९५६ मध्ये फ्लॉरेन्स येथे झालेल्या जागतिक इतिहास काँग्रेसला ते उपस्थित होते व भारतीय शिक्षण तज्ज्ञ या नात्याने त्यांनी रशियाचाही प्रवास केला होता. प्रा. पोतदार हे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे शिष्य होते.

म. म. पोतदार हे जुन्या पिढीतील मराठी विषयाचे एक नाणावलेले प्राध्यापक होते. 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार', 'महाराष्ट्र साहित्य परिषदेचा इतिहास', 'मी युरोपात काय पाहिले ?', 'श्रोते हो', 'ओळख', 'लोकमान्यांचे सांगाती' अशी त्यांची मोजकीच ग्रंथसंपदा असली तरी निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या संशोधनपर लेखांची संख्या बरीच मोठी आहे. दत्तोपंत म्हणजे एक चालता बोलता इतिहासच होता असे म्हणायला हरकत नाही.

प्रा. पोतदारांनी आयुष्यभर ज्या 'शिक्षण प्रसारक मंडळा'ची सेवा केली त्याच संस्थेला त्यांनी आपली सर्व संपत्ती व दुर्मिळ ग्रंथसंग्रह आपल्या मृत्युपत्राच्या द्वारा बहाल केला आहे.

महाराष्ट्रातील अनेक वाङमयीन चळवळी व संस्था यांचा आधारवड असलेल्या या 'पुराण-पुरुषा'च्या आत्म्याला वि. सा. संघाची विनम्र आदरांजली.

अंतरंग

कविता

याशिवाय साभार पोच, कार्यवृत्त वगैरे.

मुखपृष्ठ विजय देऊस्कर.

सम्राट / मुरलीधर कुलकर्णी

प्राध्यापक साने गॅलरीत बसून चारमिनार सिगरेटींची खाक करत होते. सिग्रेटींसाठी वर्षावर्षाला त्यांनी किती रुपये खर्च केले असतील याचा हिशेब त्यांना देता आला नसता. तसा हिशेब देण्याचं कारणही काय होतं? मात्र त्यांच्या दृष्टीनं ते आपलं आयुष्य मात्र हिशेबानं जगत होते. लग्नापूर्वी तर गोल्डफ्लेक शिवाय ते इतर ब्रँड ओढतच नसत. कधी कधी मॅक्रोपोलसारख्या महागड्या सिगरेटीही ते ओढीत. सिगरेटचा ब्रँड माणसानं बदलू नये असं जाणकार म्हणतात. त्यानं प्रकृतीवर परिणाम होतो. पण सान्यांना ते तर पटत नव्हतंच शिवाय पुढं सिगरेटच्या पाकिटांवर 'धुम्रपान करणे प्रकृतीला अपायकारक आहे' अशी इशारेवजा सूचना झळकू लागली तरी सान्यांच्या प्रकृतीवर काही परिणाम झाला नाही. लग्न झाल्यावर प्रा. सान्यांची तल्लफ वाढली आणि ते भराभर सिगरेटींचे ब्रँड बदलत राहिले. कुठलीच भारी सिगरेट त्यांची तल्लफ भागवीत नव्हती. प्रा. एस्. बीं. नी त्यांना कुड्यांची विडी एकदा ओढायला दिली तेव्हा ते म्हणाले, 'शी: आपल्या प्रेस्टीजला कुड्याची विडी शोभत नाही.' पण तल्लफ भागतच नव्हती. शेवटी ते चारमिनारवर येऊन थडकले. आणि सिगरेट म्हणून ती त्यांच्या प्रेस्टीजमध्येही बसू शकत होती.

चारमिनारचे कडक झुरके त्यांच्या काळ-जाला भिडत तेव्हा त्यांना भयंकर उत्साह येई. आणि या उत्साहाच्या भरात आपण काय बोलतो आहोत याचं भानही त्यांना रहात नसे. त्यामुळं स्टाफमधल्या बऱ्याच लोकांच्या मनात त्यांच्या-संबंधी गैरसमजूत निर्माण झाली. पण प्रा. सान्यांचं त्यांच्यावाचून काही खेटर अडत नव्हतं. कारण प्रा. साने स्वत:ला वेगळे आणि श्रेष्ठ समजायचे. तेही योग्यच होतं. कारण ते इंग्रजीचे प्राध्यापक होते. आणि इंग्रजीच्या बहुतेक प्राध्यापकांना जे वाटतं ते त्यांनाही वाटायचं. ते म्हणजे इतरांना इंग्रजी भाषेचा ट म्हणता फ कळत नाही.

आताही उत्साह वाढवण्यासाठी ते सिगरेटी मागून सिगरेटी पेटवत होते. कॉलेजातही एक लेक्चर सोडलं तर त्यांच्या ओठात सिगरेट दिसली नाही असं घडायचं नाही. त्यामुळं कॉलेजात ते चेनस्मोकर समजले जात. एकदा तर तल्लफ भागत नाही म्हणून त्यांनी एकदम तीन सिगरेटी पेटवून ओढून पाहिल्या. आणि काय काय आश्चर्य, तल्लफ भागण्यासाठी म्हणून ज्या तीन चार सिगरेटी अर्धातास जाळाव्या लागत त्यापेक्षा दहा मिनिटांत त्यांची तल्लफ भागली आणि 'यूरेका' म्हणून ओरडण्याचंच काय ते बाकी राहिलं. हा प्रयोग मात्र त्यांनी अगदी खाजगीत केला. कारण अगोदरच कॉलेजात त्यांना क्रॅक सानं नाव पडलं होतं ते त्यांना आणखी खराब करून घ्यायचं नव्हतं.

अती धुम्रपानानं कॅन्सर होतो हे त्यांना ठाऊक होतं. म्हणून त्यावर उपाय म्हणून आपलं शरीर सुदृढ, निरोगी व्हावं म्हणून प्रा. सान्यांनी आपलं जानवं खुंटीला टांगलं आणि आठवड्यातून चारपाच दिवशी ते बाजार आणू लागले. आणि तरीदेखील त्यांच्या झुरळासारख्या असलेल्या हातापायांच्या काड्यांत चरबी भरली नाही, याचं त्यांना आश्चर्य वाटे. शिवाय मरण पचावं म्हणून जेवणाआधी ते काजूफेणीचे दोन तीन पेगही पोटात रिचवू लागले. आणि आपल्या तोंडाचा वास लेक्चर्स देताना मुलांपर्यंत पोचू नये म्हणून खिशात फुटाणेही घेऊन जाऊ लागले. परिणाम असा झाला की लेक्चर्स देताना ते फुटाण्या-सारखे टणाटण उडू लागले. आणि मुलांना त्यांच्या लेक्चर्सची काही दिवसपर्यंत मजा वाटू लागली. वर्षाच्या सुरुवातीला गच्च भरलेल्या प्रा. सान्यांच्या

वर्गात दुसऱ्या टर्ममध्ये मात्र कुत्रंदेखील फिरकत नसे. आपण एवढं जीव तोडून शिकवतो तरी विद्यार्थ्यांना त्याचं काहीच नाही याबद्दल प्रा. साने मनातून खट्टू होत आणि वर्गात मुलांपुढं द्यायचं लेक्चर ते स्टाफमध्ये मुलांवर झोडू लागले. त्यामुळं स्टाफातल्या प्रोफेसर्सचीही करमणूक होऊ लागली. आणि प्रा. सान्यांनी ऑफर केलेल्या सिगरेटीच्या मोबदल्यात ते प्रा. सान्यांची मुलांवरची लेक्चर्स रसिकपणानं ऐकू लागले.

प्रा. साने आपला चकणा डोळा सिगरेटीच्या टोकावर ठेवून ती ओढत असल्याने ते अधिक भयकारी दिसत. आपला चकणा डोळा लोकांना दिसू नये म्हणून घराबाहेर ते गॉगल वापरीत. त्यामुळं त्यांचा चकणा डोळा जरी लोकांना दिसला नाही तरी लोक त्यांना दिसत. प्रा. साने अतिशय सावध असत आणि सावध नजरेनं सभोवताली पाहात. आपल्या भोवताली असलेला प्रत्येकजण आपला शत्रू आहे अशा संशयानं ते इतरांकडं पहात. त्यामुळं ते धूर्त आणि चाणाक्ष दिसत. या त्यांच्या दृष्टिकोनातून त्यांची स्वतःची बायकोदेखील सुटली नाही. नशीब विचारीचं.

आता गॅलरीत आरामखुर्चीत सम्राटा-सारखे स्थानापन्न झालेले आणि शहेनशहाच्या हुक्क्याप्रमाणे रुबाबात सिगरेटी ओढणारे साने. परत न केलेले मुलांच्या परीक्षेचे पेपर त्यांची पोरं टराटरा फाडत होती. दोन किंवा तीन पुरेत या कुटुंबनियोजनाच्या घोषवाक्याप्रमाणं प्रा. साने तिनांपर्यंत येऊन पोचलेले. धाकटं उभं राहू लागलेलं नि मोठ्यांना मदत करू लागलेलं. प्रा. सान्यांना मनातून खूप चीड आली. मुलांनी सारा केरकचरा घरात करून ठेवलेला. थोरल्यानं एक पेपर फाडला आणि डाळीच्या पुड्याचा दोरा त्याला बांधून पतंग केला. मधला निष्कारण आपला पेपर फाडतच होता. आणि कॉलेजातल्या पोरापोरींची नशिबं घडवीत होता. सान्यांनी हेतुपुरःसर पेपर परत केलेले नव्हते. कारण त्यांचा उपयोग मुलांचा विधी काढण्यासाठी फार चांगला होई. नाहीतर रद्दीत घुसडवता येत होते. तेवढीच रद्दी अर्धापाऊण किलो वाढत होती. थोरला आता चार वर्षांचा पण समज न आलेला. आधुनिक बालमानसशास्त्र डोक्यात ठेवून प्रा. साने आपल्या डोक्याचा स्फोट होऊ न देण्याचा अत्यंत प्रयत्न करीत पण असला इरसाल-पणा घरात सुरू झाला की त्यांचा संताप ज्वाला-मुखीसारखा उफाळून येई. त्या पोरांच्या परा-क्रमांनी साने कावून बायकोवर कडाडले.

"मी म्हणतो तुम्हांला अक्कल केव्हा येणार ? अं ? पोरांनी घरात सगळी घाण करून टाकली तरी डोळे उघडत नाहीत तुमचे ?"

"मग आवरा की तुम्ही. माझे हात रिकामे असतात का ? घरातली कामं तुमचं कोण येणार आहे करायला ?" बायकोदेखील त्यांच्याच सुरात उसळली. तेव्हा साने तोंडातल्यातोंडातच पुटपुटू लागले. त्यांचा तिरळा डोळा आणखी तिरळा झाला. लग्न झाल्यावर पहिलं वर्ष बायको कशी विल्लयामांजरी-सारखी वागायची. पण पोरं झाली नि जणू तिचा अधिकार वाढला. ती पूर्वी सान्यांपुढं नाचत होती. पण आता प्रा. सान्यांनाच तिच्यापुढं भांगडा करावा लागत होता. प्रा. सान्यांच्या अंगाचा भडका उडाला. ते वसकन् पुढं झाले नि मधल्या पोराचं वकोट धरून त्याला पेपरांजवळून ओरबाडून काढलं.

"अरे सुहास, हज्जारदा सांगितलं तुला ते पेपर फाडू नकोस म्हणून. थापडू का चांगला?" पोरगं बावरलं आणि आईकडं बघत किंचाळू लागलं. त्या एवढ्याशा पोराला हजारदा काय दहा हजारदा सांगितलं तरी कळण्यासारखं नव्हतं. प्रा. सान्यांना वाटायचं प्रत्येकानं शिस्तीत वागलं पाहिजे आणि म्हणून आपली सत्ता ते खेकसून सिद्ध करीत होते.

"मारून टाका पोरं. टाका मारून. फार झालीत तुम्हांला. होण्यासारखं नव्हतं तर केलात कशाला संसार उभा ?" मिसेस साने मुलाच्या मायेनं पिळवटून म्हणाल्या.

"तुमच्याखातर केला. तुम्ही वाट पहात होतात ना आमची." प्राध्यापक म्हणाले.

"हळू ओरडा जरा. ऐकू जाईल गल्लीला. या घरात हळू बोललं तरी पलीकडल्या शेजाऱ्याला ऐकू जातं. किती दिवसांपासून कानीकपाळी ओरडतेय् आप-ल्याला स्वतंत्र ब्लॉक घ्या म्हणून. तर ते नाही होत आणि इथं बायकापोरांवर मात्र दादागिरी करा."

"बापाला का नाही म्हणालात आणखी पाच दहा हजार हुंडा द्या म्हणून. घेतला असता. एक नाही दोन घेऊन टाकले असते. एक तुला न् एक मला." प्राध्यापक ओरडले.

"माझ्या बापाच्या जिवावर नाही केला संसार उभा तुम्ही. तुम्हाला हुंडा दिला तो त्यांनी कर्ज काढून. अजून फेडताहेत ते. तुम्ही भिकारी असतात तर कुणी केलं असतं तुमच्यावरोबर लग्न? मुलगा प्राध्यापक आहे म्हणूनच मी तयार झाले. वास्तविक मला इंजिनियरचं स्थळ आलं होतं."

"ओहोहो. म्हणे इंजिनियरचं स्थळ. आज बसला असतात नुसत्या त्याच्या आराखड्यांकडं बघत."

"हा वादंग पुरे. तुम्हाला मटण लागतं ना? केव्हा जाणार आहात बाजारात?"

"खिशात पैसा कुठाय्? महिनाअखेर आलीय. बँकेत खडखडाट."

"ओढा, सिगरेटी ओढा नुसत्या."

"माझ्या सिगरेटींवर डोळा नकोय्. या महिन्यात किती पातळं झाली तुमची?"

"वर्षाला चार पातळं म्हणजे का जास्त? तीही साधी सुती. त्या तुमच्यां के. एम. च्या बायकोनं परवा दोन मंजीसिल्कच्या आणि तीन पीवर सिल्कच्या साड्या घेतल्या."

"के. एम्. चं आणि आपलं कसं जुळेल? पगार तर येतोच नवराबायकोचा शिवाय खाजगी धंदा करतोय तो मोटरबसचा. वरं ते जाऊ द्या. बाजारचं काय? नाहीतर आज राहिला बाजार."

"मटण तुम्हांलाच लागतं नाहीतरी. मला तुम्ही वळंच खायला लावलंत. अण्णांना हे मुळीच आवडत नाही."

"मला अण्णांशी संसार करायचा नाही. त्यांच्या आवडीनिवडीशी मला काय कर्तव्य? चला पैसे द्या."

प्रा. सान्यांचा सासऱ्यावर रोष. का? तर म्हणे त्यांनी पुरेसा हुंडा दिला नाही. शिवाय प्रा. सान्यांना ब्लॉक हवा होता तोही मिळाला नाही. पण जमलेली सोयरीक त्यांना मोडायची नव्हती. कारण त्यांना बायको देखणी मिळणार होती. नाहीतरी त्यांना स्वतःला पर्सनॅलिटी होतीच कुठं? चकणा डोळा. हातापायांच्या काड्या. फताडे पाय. ढोबळ नाक. शिवाय भरीला काळा रंग.

"घ्या हे पैसे नि कटा एकदाचे. तेवढीच एखादा तास शांतता जिवाला."

"तुमच्या की माझ्या?" हात पसरीत आणि तोंड फाकवीत साने म्हणाले. बायकोने पैसे हातावर आदळले. पिशवी घेऊन ते बाजारात निघाले. "आणि पोरांना आवरा जरा." त्यांनी बायकोला ताकीद दिली. सान्यांनी आपली सायकल बाहेर काढली. खरं तर इतकी वर्ष सर्व्हिस झाली निदानीला स्कूटर घेता आली असती. त्यांच्या मागून लागलेल्या प्राध्यापकांनी स्कूटर्स घेतल्या. आणि बायकांना मागं बसवून ते समुद्र किनाऱ्यावर फिरायला जायला लागले. याची प्रा. सान्यांना मोठी खंत वाटे. स्कूटरवाल्या प्रोफेसरांचा हेवा वाटे. खरोखर सासऱ्याकडून आणखी हुंडा उपडला असता तर. पण चान्स गेला. लग्न होऊन पाच वर्षं हा हा म्हणता उलटली. बँक बॅलन्स कमी कमी होत दोन वर्षांतच दुसऱ्यां-कडून हातउसने पैसे मागावे लागले. आणि संसारही वाढता. बायकोला त्यांनी ऑपरेशन करून घ्यायचा बराच आग्रह केला. तर तीच म्हणाली तुम्हीच करून घ्या. पण हे सान्यांनी पटावं कसं? त्यांचा बायकोवर संशय. न जाणो त्यांनी ऑपरेशन करून घेतलं आणि बायकोनं काही उपद्व्याप केले तर होणारी पोरं स्वतःच्या नावावर खपवावी लागतील याची भीती. म्हणून सानेही चालढकल करत होते. बायकोचा पाळणा तरी लांबचा हवा होता. पण दर दोन वर्षांनी घरात एक तोंड वाढतच होतं आणि सान्यांची चिंता वाढवतच होतं. सगळीकडून दुर्दैव पाठी लागल्यागत साऱ्यांना वाटू लागलं. साने पॅडल रेटत होते आणि सायकलच्या चाकांप्रमाणं त्यांचं विचारचक्र जोरात फिरत होतं.

शिवाय आणखी एक गोष्ट त्यांनी ऐकलेली होती की सरकारनं कुटुंबनियोजन लादून फक्त हिंदूंचीच संख्या खच्ची करण्याचा प्रयत्न चालवलाय. मुस्लीम समाज आणि ख्रिश्चन समाजाच्या बाबतीत सरकार उदारमतवादी होतं. त्यामुळं हिंदूंचीच संख्या कमी होण्याचा धोका होता. हे सान्यांच्या सदसद्विवेक बुद्धीला पटण्यासारखं नव्हतं. हे आपलं मत ते हिरीरीनं स्टाफमध्ये मांडीत. बस्स हिंदूची संख्या घटता कामा नये. (त्यामुळं त्यांच्या नकळत ती त्यांच्या घरात वाढू लागली होती.) कुटुंबनियोजनाचं तत्त्व सरकारनं सगळ्यांना सारखंच का लागू करू नये ? आणि स्टाफातले लोक त्यांचं हे लेक्चर ऐकून गालातल्या गालात हसत. याचमुळं प्रा. सान्यांचं एक मत कुटुंबनियोजनविरोधी होतं.

एके दिवशी बायको रात्रीची त्रासून म्हणाली,

"पुरे झालं. माझ्यानं यापुढं हे कष्ट निभणार नाहीत. आणि बाळंतपणं तर नाहीच नाही. हाडं, कंबर नुसती रात्रंदिवस ठणकतेय्. आता बायकोचा कुठवर जीव घेणाराहात ?"

"टॉनिकं घे ! टॉनिकांना काही कमी नाही ना ? पण हे असं नाही चालणार."

"पण मला मुळीच ह्याची इच्छा होत नाही".

"नसली तरी मला होतेय् ना. मी कुठं जाऊ ?"

'जा मसणात !' हे मनातल्या मनात उच्चारलेले शब्द प्रा. सान्यांना मात्र ऐकू गेले नाहीत. आणि तिची अनुमती आहे असं समजून प्राध्यापक घुसमटले. नंतर बाजूला झाले. खरं तर मिसेस सान्यांना त्यांची ही बळजबरी नकोशी झालेली होती. लोकांचे संसार पाहिले तर किती आटोपशीर आणि सुखाचे. त्यांच्या ओळखीच्यांना सर्वांना स्वतंत्र ब्लॉक. फ्रीजेस. मोटारी. नातलगांना बिल्डिंगा. फ्लॅटस्. मिसेस सान्यांनाही त्यांचा हेवा वाटायचा आणि नवऱ्याचा तिरस्कार. त्या जेव्हा नवऱ्याला हे म्हणाल्या तेव्हा प्रा. साने म्हणाले,

"अगं, ज्याचं त्याचं दैव असतं. आमच्या-सारख्या मास्तरानं मोठमोठ्या आकांक्षा बाळगणं म्हणजे हवेत हवेली बांधणं. आमची उडीच एवढी. त्याला काय करायचं ? माणसानं समाधानी असावं हाच यावर उपाय." आणि प्रा. सान्यांनी सुस्कारा सोडला. वास्तविक त्यांनाच स्वतःला इतरांचा हेवा वाटायचा. पण दुसऱ्यांना उपदेश करण्याची संधी ते सोडत नसत.

प्राध्यापक मटणाच्या दुकानात गेले तर मटणाचा भाव सातवरून दहावर गेलेला. त्यांचे डोळे पांढरे होण्याची वेळ. तिकडं बँक बॅलन्स शून्यावर. शिल्लक फक्त प्रॉव्हिडंड फंड आणि विमा. बायकोच्या बाळंतपणाला प्रॉव्हिडंड फंडावर त्यांनी कर्ज काढलं होतं. त्यांचं मन काही मटण घ्यायला धजेना. वास्तविक बाप अत्यंत सोवळा. आई तर घरात मीठदेखील धुऊन घ्यायची. बापाचं रात्रंदिवस पूजाअर्चा जप-तप चाललेलं असायचं. या अती सोवळ्यानं प्रा. साने अगदी विटून गेलेले होते. कॉलेजात असताना त्यांच्या वर्गातली विद्यार्थी मंडळी मटण, मुर्गी बिर्याणी, आमलेट, सिगरेट याशिवाय बात करत नसत. हॉटेलात गेलं तर इतर विद्यार्थी प्लेटमधले कोंबडीचे पाय तोडताना दिसायचे. बियर प्यायचे आणि सिगरेटी ओढताना दिसायचे. एक दिवस सगळा मनाचा सोवळेपणा झुगारून देत नि बापाला शिव्या घालत त्यांनी बिर्याणीलाच हात घातला. आणि तेव्हापासून जी चटक लागली ती आजवर. तीच सवय आता त्यांच्या मानगुटीला बसू पहात होती. प्रा. साने अगदी निराश दिसू लागले. खर्च एवढा वाढला होता की प्रा. फंडावरील कर्जाशिवाय त्यांना बायकोच्या बाळंतपणाच्या वेळेस प्रा. जाधव आणि प्रा. काळोखेकडून पाच पाचशे रुपये उसने घ्यावे लागले होते. त्याचं भांडवल जाधवांनी केलंच. प्रा. सान्यांनी वेळेवर पैसे परत केले नाहीत तेव्हा प्रा. जाधव स्टाफमध्ये म्हणाले,

"अरे, त्या सान्याला बायकोच्या बाळंत-पणाला पैसे दिले तर त्यानं चांगलेच उपकार फेडले. सहा महिने झाले. तीन महिन्यांत देतो म्हणाला." हे अर्थात सान्यांच्या गैरहजेरीत जरी झालं तरी त्यांच्या कानावर येण्यासाठीच प्रा. जाधवांनी जाहीर रीतीनं त्याची वाच्यता केली. प्रा. सान्यांना जरी मेल्याहून मेल्यासारखं झालं नाही तरी मनातून त्यांनी जाधवांना शिव्यांची

लाखोली वाहिली. मी काय पैसे बुडवायला निघालोय्? आणि यांच्या बायका कधी बाळंतच झाल्या नाहीत का साल्यां? या लोकांना मुळी एटिकेटस्‌च नाहीत. वगैरे वगैरे.

आता मटणाऐवजी बीफ घ्यावं का? असा विचार सान्यांच्या मनात आला आणि ते थोडे दचकले. आपण हिंदू आहोत हा त्यांचा स्वाभिमान जागत झाला. पायरी सोडून कसं चालेल? शेवटी त्यांनी पाव किलो मांस घेतलं. खाटकाला विचारलं—

"हे बकरीचंच ना, हो?"

तर त्यानं बोकडाचं शेपूटच दाखवलं. प्रा. साने परतले तेव्हा दुरूनच त्यांना दिसलं की प्रा. सिंग बायकोबरोबर बाहेरून बोलत होते. प्रा. सान्यांना वाटलं परत माघारी फिरावं. पण तेवढ्यात प्रा. सिंगांनी त्यांना पाहिलं नि त्यांना घरी जाणं भागच पडलं. प्रा. सिंग गोरा, सडसडीत नाकेला. बोलघेवडा. दोन वर्षांपूर्वी हिंदीला आलेला. अजून सडाफटिंग. प्रा. सान्यांच्या मनात लगेच संशय. प्रा. सिंगांची कॉलेजातल्या मुलींशी बरीच लफडी ऐकिवात होती. एका होस्टेलमधल्या मुलीला घेऊन ते पिक्चरला गेले होते. प्रकरण थेट प्रिन्सिपलांपर्यंत. प्रिन्सिपलांची प्रा. सिंगांना तंबी. मग प्रा. सिंग जरा नरम. आणि हा आता त्यांच्या बायकोशी कानगोष्टी करतोय्.

"क्या सिंग साहब क्या काम निकाला?" आपल्या मराठी-हिंदीत प्रा. साने यांनी पृच्छा केली.

"कुछ नहीं जी. आपकी पूछताछ कर रहा था. काम तो बिल्कुल मामुली था"

"आओ अंदर आओ". नाइलाजास्तव प्रा. सान्यांना त्यांना म्हणावं लागलं. कारण मामुली काम त्यांच्या केव्हाच ध्यानात आलं होतं. साने सायकल लावून घरात शिरले तो त्यांचे श्वसूर खाटेवर वर्तमानपत्र वाचत पसरलेले. प्रा. सान्यांच्या कपाळावर नकळत आठया चढल्या.

"आओ. बैठो बैठो" मोडक्या खुर्चीकडं बोट दाखवत प्रा. सान्यांनी सिंगांना विनवलं. आणलेलं सामान आत देऊन हात झटकत बाहेर येत त्यांनी म्हटलं.

"हां, अब बोलो भाई, क्या काम है."

प्रा. सिंग खाटेवर बसलेल्या अभ्यागताकडं बघत चाचरू लागले.

"बोलो बोलो. फिकीर मत करो."

"आ—आपने पचीस रुपिया दो महिने पहले—"

"हां हां, अब आया ध्यानमे—" सान्यांचा अगदी चेहराच पडला. त्यांना वाटलं होतं निदान पाहुण्यांच्या देखत असल्या प्रतिष्ठेच्या प्रश्नाला सिंग हात घालणार नाहीत. पण झालं भलतंच. ते अभ्यागतही वर्तमानपत्रातलं डोकं काढून टवकारून पाहू लागले.

"मुझे याद नहीं रही. देगा. देगा यार." साने खूपच केविलवाणे झाले. आजच मटणाला पैसे नव्हते. याला कुठून द्यायचे? और देखो प्राध्यापक, ये पैसे कभी लिये थे उसकी याद—

"वो उस दिन नटराजमे पार्टी हुई. आपके पास नही थे तो मैंने बिल दिया."

"अरे हां. अभी याद आयी. प्राध्यापक दो तारीख को जरूर वापस करूंगा." साने सासऱ्याकडं तिरकस बघत म्हणाले. त्यांचा चेहरा पार फाटला होता.

"मुझे आज बहुत जरूर था"

"देगा यार. पैसा कहां जाता है क्या?" प्रा. सान्यांच्या प्रतिष्ठेची लक्तरे लोंबू लागली.

"अच्छा तो, मैं चलता हूं. दो तारीख याद रखना." प्रा. सिंग नर्व्हस होऊन उठत म्हणाले. त्यांनाही आशा होती. पैशाची अत्यंत गरज होती असं दिसत होतं. तेवढ्या वेळात प्रा. सान्यांची बायको मात्र कीचनमधून बाहेर आली नाही. कारण परपुरुष घरी आल्यावर त्याच्याशी बोलण्याचीच काय, समोर येण्याचीदेखील सान्यांनी तिला बंदी केलेली होती. अर्थात साने जवळपास असताना ती अत्यंत काटेकोरपणे हा नियम पाळत होती. आपली बायको सुंदर असून चारचौघांचा तिच्यावर डोळा आहे असा सतत संशय प्रा. सान्यांना असायचा. लग्नापूर्वी आपल्या बायकोचं निश्चित काही प्रेमप्रकरण असावं असाही सुगावा त्यांना लागलेला होता. तिच्या ओळखीचं कुणीतरी अजूनही मार्ग काढीत येत होतं. आहे

माझ्या माहेरचा ओळखीचा! म्हणून मिसेस साने त्यांना उडवून लावत असे. पहिला मुलगा प्रा. सान्यांना अवघ्या सात महिन्यांत झाला. आणि प्रा. सान्यांना पहिला धक्का बसला. प्रा. सान्यांनी हळूचकन् डॉक्टरांना विचारलं तेव्हा ते म्हणाले की एखादी स्त्री सात महिन्यांनीही प्रसूत होऊ शकते हो. मग लंपट सान्यांनी फारसा विचार न करता डॉक्टरच्या शब्दांवर भार टाकला. शिवाय तो पहिला मुलगा. त्यांना इतका आनंद झाला की स्टाफमध्ये टणाटण उड्या मारीतच ते गेले. हातात पेढ्यांचा पुडा. आणि सांगू लागले.

"When I reached home in the evening
I found my boy there."

सांगताना त्यांचे चकणे डोळे आश्चर्यानं विस्फारित झालेले. इतके की सान्यांचा तो अवतार बघून स्टाफ मेंबरांचे डोळेदेखील विस्फारले. सात महिन्यांत मूल कसं? हा प्रश्न मनाला टोकरतच होता. एके दिवशी धडा करून त्यांनी बायकोलाही विचारलं.

"इतके कसे हो तुम्ही संशयी? प्रत्यक्ष बायकोबद्दल? जर असा तुमचा स्वभाव होता तर लग्नच केलंत कशाला? सात महिन्यांत मूल होत नाही? अशी मुलं अशक्त असतात. विकासवरून नाही वाटत?" प्रा. साने फक्त गप्प बसले. धरलं तर डसतंय नि सोडलं तर पळतयं अशी त्यांची स्थिती झाली. तीन महिने बायकोच्या माहेरी सुटीला हेलपाटे घातल्यावर साने म्हणाले.

"तीन महिने झाले. आता कुठवर माहेरी रहायचं?"

"तियं कोण आहे मुलाचं करायला? सासूबाई तर ढुंकून बघणार नाहीत."

"प्रत्येक स्त्रीचं सासूबद्दल हेच मत असतं. ते असो. तू येणार की नाही?"

"आणखी तीन महिने तरी नाही. मला घरातलं करायला होणार नाही." तेव्हा प्रा. सान्यांचा तरूणोपाय चालेना. प्रा. सान्यांनी अत्यंत विरही-अवस्थेत ते तीन महिने कसेबसे काढले. नंतर मिसेस सानेही आल्या नि संसारातल्या कटकटीही वाढत गेल्या. मुलं होत गेली. खर्च वाढत गेला. साने मेटाकुटीला आले. तिसरं घरात आलं. एके दिवशी हसत हसत श्वशूर म्हणाले,

"जावईबापू, आता हे इंजिनाचे डबे तोडून टाका. आमच्यावेळी गोष्ट वेगळी होती. सुषमाची तब्येतही खालावत चाललीय्. महागाई वाढते आहे. सरकारही तुमच्या बाजूनं आहे." प्रा. सान्यांना मनातून श्वशूरांचा राग आला. आपल्या खाजगी बाबतीत सासऱ्यांनी तोंड खुपसावं हे त्यांना आवडलं नाही. पण ते तोंडदेखलं म्हणाले,

"तुम्ही म्हणता ते खरे. पण हिंदूंची संख्या काही दशकांत खच्ची होणार आहे आपल्या सरकारच्या धोरणानं. सरकार सर्वांना सारखाच कायदा का लागू करत नाही? मुसलमानांना एक, ख्रिश्चनांना एक, हिंदूंना दुसरा. आपल्या सरकारला काय नुसता उपदेश सुचतो. पुढंमागं हिंदुस्तान हिंदूंचा रहाणारच नाही. सुशिक्षित, सुबुद्ध हिंदू या नियोजनाला मात्र फुकाफुकी बळी पडताहेत." वगैरे वगैरे.

"अहो त्याचा विचार आपण कशाला करायचा? आपल्या फायद्याचं सध्या काय आहे ते पहाना. आपण आपली चिंता करावी. विश्वाची करायला आपण कुठं ज्ञानेश्वर, म. गांधी लागून गेलो आहोत?" प्रा. सान्यांना हेही पटत होतं.

प्रा. सिग गेल्यावर श्वशूरांनी वर्तमान-पत्रातलं डोकं काढलं. ते अस्वस्थ दिसत होते. तर प्रा. साने त्यांच्या आगमनानं अस्वस्थ झालेले होते.

"हं काय म्हणतेय तब्येत जावईबापू?"

"ही काय दिसतेय अशी आहे."

सासरे हो हो हो करूनं हंसत म्हणाले,

"अगं सुषमा, यांच्या तब्येतीकडं तू लक्ष कमी पुरवतेस वाटतं."

"त्यांचं काही विचारू नका अण्णा. दिवस-भर गॅलरीत सिगरेटी फुंकण्याशिवाय आणि दोनवेळ टाच खाण्याशिवाय त्यांना काही काम नसतं."

"मग कॉलेजातली लेक्चर्स काय तू घेतेस ?"

अण्णा ते जाऊ द्या. त्यांना म्हणावं आता नवीन ब्लॉक कधी घेणार आहात ? मला चाळीत रहायची किळस येतेय्. इथली ही काय माणसं ? कुणीही यावं. उसनी पिठं नि मिठं मागावीत. पैसे मागावेत. प्रा. सान्यांना हे ब्लॉकपुराण नेहमीच ऐकावं लागत होतं. दुसऱ्या पोराच्या वेळी ब्लॉक घेत नाही म्हणून बायको तर नऊ महिने माहेरी खुंटून बसली. प्रा. साने तिला आणायला गेले तर ती म्हणाली—

"ब्लॉक घेत असाल तर येते."

"मग ब्लॉकवाल्याशीच का नाही केलंत लग्न ? आं ?"

"मला वाटलं होतं तुम्ही तेवढी धमक दाखवाल. पण हिरा म्हणता गार पदरात पडली".

"माझं तुझ्याबद्दल तेच मत आहे." बायको काही सासरी येईना तेव्हा प्रा. साने घटस्फोटाच्याच गोष्टी बोलू लागले. त्यांनी नोकरीच्या गावाहून चारपाच ताराच ठोकल्या मिसेस सान्यांना. नांदायचं असेल तर लवकर ये नाहीतर घटस्फोटाला तयार हो ! मिसेस सान्यांच्या वडलांना धास्ती पडली.

"अगं सुषमा, असल्या तारा येईपर्यंत तू जाच कशी. मला काही तू जड नाहीस पण जा म्हणून सांगणं आलंय्."

"नाही अण्णा. मला ब्लॉकच हवाय. त्या दरिद्री घरात मलाही सुख नाही नि मुलांनाही नाही."

अण्णा मनातून अस्वस्थ झालेले होते. न जाणो जावयांनी घटस्फोट घेतला तर. शेवटी सुषमा जायला तयार झाली. प्रा. सान्यांना बायको हवी होती कारण ते अजूनही तरुण होते. शेवटी मिसेस साने गणपतीच्या शुभमुहूर्तावर आल्या तेव्हा प्रा. सान्यांचा आनंद गगनात मावेना. बायको-शिवाय नवरा जगू शकत नाही हे तत्त्व त्यांना पटलेलं होतं. आणि बायकोशिवाय राहिला तरी बाईशिवाय तर मुळीच राहू शकणार नाही.

प्रा. सान्यांची काही तत्त्वं होती. मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून त्यांना सुरुवाती-पासून इंग्रजी शाळेत विशेषतः कॉन्व्हेन्टमध्ये घालावं. भाषेत भाषा इंग्रजीच असं त्यांचं स्पष्ट मत होतं. म्हणूनच ते इंग्रजीतूनच एम्. ए. झाले. आणि पीएच्. डी. साठी नाव नोंदवलं. त्यांचा शेक्स-पिअर आवडता लेखक म्हणून त्यांनी शेक्सपिअर सारखे काही दिवस केस वाढवले. तेव्हा कॉलेजात त्यांना लोक शेक्सपिअरच म्हणू लागले. पीएच्. डी. साठी त्यांनी एक अमेरिकन रहस्यकथा लेखक निवडला. पहिली तीन पानं लिहून झाल्यावर त्यांना पुढं काही लिहिणं सुचेचना. पण स्टाफमध्ये त्यांनी एकदम डिक्लेअर करून टाकलं की पीएच्. डी. ची नुसती प्रस्तावनाच पाचशे पानांची लिहून झाली म्हणून. आणि स्टाफातल्या लोकांचे आश्चर्यानं नुसते डोळे पांढरे होण्याची वेळ. सान्यांच्या घराच्या परिसरात सगळे अडाणी लोक होते म्हणून मुलांना बाहेरच्या मुलांच्यात खेळण्याची त्यांनी मुळी बंदी केली. न जाणो त्यांचे घाणेरडे संस्कार मुलांवर होतील.

"हो हो हो ग सुषमा घेतील ब्लॉक. अगं दिवस कसे आलेत ते पहातेसच की ! तूही समंजस-पणा दाखवायला हवा." जावयाची बाजू घेत श्वशूर म्हणाले. आणि प्रा. सान्यांना अगदीच हे वाटू लागलं. आपलं सारं प्रेस्टीज् या म्हाताऱ्याच्या आगमनानं गेलं म्हणून प्रा. सिंगावरोबरच ते सासऱ्यांनाही मनातून शिव्या घालू लागले. प्रा. सान्यांच्या दिवाळखोरीबद्दल प्रा. जाधवांनी अगोदरच स्टाफात डांगोरा पिटला होता, आता हा सिंग आणखी काडी लावील. प्रा. सान्यांना भयंकर मळमळायला लागलं. आपण एवढे सातआठशे रुपये कमावतो ते जातात कुठं ? पैशाला बारा वाटा म्हणतात तेच खरं. दोन वाटा तर उघड होत्या सिगरेटी आणि मटण-फेणी. पण सान्यांना आश्चर्य वाटतच राहिलं.

"बरं ते एक असो जावई, मी सुषमाला दिवाळीसाठी न्यायला आलोय." प्राध्यापकांना मनातून आनंद झाला. पैसे तरी वाचवता येतील. देणी तरी फेडता येतील. पुन्हा मनात संशयाची पाल चुकचुकली. साले तिचे तिथं भडवे आहेत त्यांची दिवाळी होईल. लग्नापूर्वी बायको नोकरीला

होती. तिथं तिचं प्रेमप्रकरण होतं असा प्राध्यापकांना दाट संशय होता.

"मी काय म्हणतोय ?"

"आं ?" सिगरेटचा भपकारा सोडत साने जागे झाले.

"सुषमाला येत्या दिवाळीला माहेरी पाठवा"

"आणि आमच्या दिवाळीचं काय ?"

"जावई, मोठे विनोदी आहात बुवा !"

"मग असा विनोदी जावई कसा पसंत केला तुम्ही ?" म्हाताऱ्याचं वाक्य साऱ्यांच्या नकळत वर्मी बसलं होतं आणि सासरे सहज बोलून गेलेले होते. आपण विदूषकासारखे दिसतो हे प्रा. साऱ्यांना पटणं शक्यच नव्हतं. आपण राजपुत्रासारखे दिसतो. आपण म्हणजे सम्राट याबद्दल त्यांना संशय नव्हता.

"सुषमा उद्याला तयारी कर."

"पण माझी परवानगी ?"

"मला वाटलं आपली संमती आहे." सासरे हसत म्हणाले.

"मला काय येडबंबू समजलात काय ? मला पाठवायचं नाही."

"मी नेणारच. माझी मुलगी आहे ती."

"मीही जाणारच." सुषमा वडलांच्या सहाय्याला धावली.

"माझी बायको आहे ती. माझा तिच्यावर अधिक अधिकार आहे." आपल्या पूर्वीच्या कानडी बॉसच्या तोऱ्यात प्राध्यापक ओरडले. एम्. ए. होण्यापूर्वी ते एका कन्सर्नमध्ये कारकून होते. तिथला बॉस असाच त्यांच्यावर ओरडायचा.

"ओरडू नका कृपा करून."

"मी ओरडत नाही. तुम्हीच ओरडताय्".

"अण्णा मी एका पायावर यायला तयार आहे. या गटारघाणीत मला मुळीच रहायला आवडत नाही." मिसेस साने म्हणाल्या. तेव्हा प्राध्यापक साने खरोखरच तिच्या पायाकडं बघू लागले. त्या तर दोन्ही पायांवर ठाम उभ्या होत्या.

"ती यायला तयार आहे. पाठवा."

"कशाला ? तिकडं नेऊन पैसे कमावण्यासाठी ?"

"जावई हे फार झालं". सासरे ताडकन् उठत म्हणाले. "सुषमा, यापुढं मी तुला न्यायला कधी येणार नाही. तुझ्या पायांनी आलीस तर माझ्या घराची दारं तुला मोकळी आहेत. फिरून या माणसाचं तोंड पहाणार नाही." म्हणत श्वशूर पिशवी घेऊन ताडताड बाहेर पडले.

"अण्णाऽऽऽ" म्हणत मिसेस साने मागं धावल्या. पण अण्णा मागं न पहाता भराभर निघून गेले. मग मिसेस साने कॉटवर पडून ढसासून रडू लागल्या.

प्रा. साने समाधानानं उठले. शांतपणे ते गॅलरीत गेले. आरामखुर्चीवर स्थानापन्न होऊन पायांची अढी टाकली. नि त्यांनी एकदम चार सिगरेटी एकाचवेळी पेटवल्या. आडोशानं भकाभक धूर काढू लागले. श्वशूरांचा पराभव झाला होता. सम्राटाचा अश्वमेध यज्ञाचा घोडा चौखूर पुढल्या प्रदेशाकडं धावू लागला. आणि सम्राट विजयोन्माद झालेल्या समाधानात आपल्याशीच हसू लागला.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

लोणार येथील 'तारातीर्थ' / भाऊ मांडवकर

एकाकी विहरणकाळात मेहकरजवळील लोणार (जि. बुलडाणा, विदर्भ) येथे श्रीचक्रधरस्वामी दोनदा गेले. मेहकरला मुक्काम असताना बोणेबाईंच्या आग्रहाने 'सोमवारी'–पर्वासाठी हे मोनीदेव (श्रीचक्रधर) लोणारला गेले. कुमारेश्वर, दैत्यसूदन आदी मंदिरांच्या परिसरात ते थांबले व लवकरच मेहकरला परत आले.

हे वर्णन डॉ. शं. गो. तुळपुळे–संपादित 'लीळाचरित्र–एकांका'च्या ६९ व्या लीळेत आले आहे. प्रस्तुत लीळेत स्वामींचे 'धारेसी–आसन' झाल्याचे वर्णन आहे. ही जागा कुमारेश्वराच्या मंदिराजवळची पाण्याची धार पडणारी किंवा वरच्या बाजूला 'धारातीर्थ' आहे, ती आहे हे स्पष्ट आहे. डॉ. कोलते यांच्या अलीकडील 'लीळाचरित्रा'त ९९ व्या क्रमांकाच्या लीळेत हे वर्णन आले आहे. ज्या गोमुखातून पाण्याची धार पडते त्या शीलेवर स्वामी जाऊन बसले असे त्या लीळेत लिहिले आहे. तेथे 'धार' असाच शब्द वापरला आहे.

त्यापूर्वी श्रीचक्रधरस्वामी एकाकीकाळात एकदा लोणारला गेले होते, ते वर्णन डॉ. तुळपुळे यांनी संपादिलेल्या 'एकांका'च्या ३९ व्या लीळेत आहे. स्वामी त्यावेळी भैरव मंदिरात वीस दिवस थांबले होते. स्वामींचे धारातीर्थी आसन झाले असे प्रस्तुत लीळेत लिहिले असून, लोणारला कान्हरदेव यादव राजा आला व चक्रधरांशी त्याची धारातीर्थी भेट झाली, असे वर्णन त्या लीळेत आले आहे.

परंतु डॉ. तुळपुळे यांच्या 'एकांका'त 'धारातीर्थी' स्वामींचे दर्शन झाल्याचे वर्णन आहे तेथे 'तारातीर्थी' असे हवे होते. ती छपाईची चूक आहे. कारण 'स्थलसूची' देताना डॉ. तुळपुळे यांनी 'तारातीर्थ' हे स्थान ३९ व्या लीळेत आल्याचे दाखविले आहे.[1] टीप देताना या लीळेच्या संदर्भात डॉ. तुळपुळे लिहितात—"चक्रधरांचा मुक्काम तेव्हा लोणार येथे भैरवाच्या देवळात होता. तेथे तारा (धारा ?) तीर्थावर त्यांची व यादवनृप कान्हरदेव यांची भेट झाली."[2] यावरून तारातीर्थी ही भेट झाली हे डॉ. तुळपुळे यांनी संपादिलेल्या 'एकांका'त स्पष्ट नोंदविलेले आहे, हे लक्षात येईल.

डॉ. कोलते यांनी संपादिलेल्या 'लीळाचरित्रा-'च्या ६१ क्रमांकाच्या लीळेत, कान्हरदेव चक्रधरांना भेटण्याकरिता **तारातीर्थास** आला, असे लिहिले असून स्वामी त्यावेळी **तारातीर्थी** वडातळी बगले होते असेही एका पाठात वर्णन आहे. तारातीर्थी कान्हरदेव व चक्रधर यांची भेट झाली असे या लीळेचे कथन आहे. कान्हरदेवाने देऊ केलेल्या द्रव्यातून धारेचा घाट बांधण्यात आला, असेही या लीळेत म्हटले आहे.

वरील दोन्ही वर्णने वाचताना चुकून **धारातीर्थाचे तारातीर्थ** झाले की काय, अशी कोणालाही शंका यावी. तशी ती डॉ. तुळपुळे यांना आली व त्यांनी एकांकटीपेत प्रश्नचिन्ह देऊन व्यक्तही केली आहे. हे वरील परिच्छेद वाचल्यावर लगेच ध्यानात येते.

या गोंधळात वस्तुस्थिती काय आहे हे पाहणे उचित ठरेल. 'धारातीर्थ' व 'तारातीर्थ' ही दोन्ही नावे यथार्थपणे लीळाचरित्रकारांनी वापरली असून ती दोन वेगळी ठिकाणे लोणार येथे आहेत.

लोणारला जे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. ते तीनचार फर्लांग लांबरुंद असून त्याला 'लवणासुर तळे' या नावाने काहीजण ओळखतात.[3] हे सरोवर फार खोल असून सर्व बाजूंनी उंच डोंगर किंवा मोठाले उंचवटे आहेत. पाणी संपले त्याच्या काठाकाठाने सरोवरातून, खोलगट जागेतून, चाऱ्ही बाजूंनी प्रदक्षिणा घालता येते. या सरोवराच्या दक्षिण कडेला खोलगट भागात पाण्याच्या थोडे जवळच कमळजा देवीचे मंदिर आहे. महानुभावांना ते स्थान 'नमस्कारी' आहे. येथे जवळच भैरव मंदिर होते व तेथे चक्रधरस्वामी मुक्कामाला होते. तेथे एक वड होता. येथेच कान्हरदेव व चक्रधर यांची भेट झाली. कमळजा

---

१. डॉ. शं गो. तुळपुळे, लीळाचरित्र एकांक : पृ. १४८.

२. डॉ. शं. गो. तुळपुळे, लीळाचरित्र एकांक : पृ. १२५.

३. महंत दत्तराज शेवलीकर : स्थानमार्गदर्शक १२५.

मंदिर, वड, भैरवमंदिर, चक्रधर–कान्हरदेव भेटीचे ठिकाण ही 'स्थाने' या सरोवराकाठी, खोलगट भागात आहेत. हा भाग व हे संपूर्ण खोल सरोवर, हे प्रदीर्घ कुंड 'तारातीर्थ' म्हणविले जात होते, अशी 'लीळाचरित्रा'ची माहिती आहे.

या सरोवराच्या उत्तरेकडून, उत्तर-कड्या-वरून, उंच डोंगराच्या (जमिनीला समतल असलेल्या) टोकावरून गोमुख धारेतून एक झुळ-झुळता अखंड प्रवाह दक्षिण दिशेने खाली खाली येतो व तो कुमारेश्वर मंदिराच्या पुढे आणखी खोल भागी जातो आणि पुढे तो सरोवरात शिरतो. सरोवराच्या जलतीरी खोल भागात जी जमीन उपलब्ध आहे तिच्यात या 'धारे'च्या गोड्या पाण्यावर शेती पिकविली जाते.

जेथून धार येते त्याला 'धारातीर्थ' म्हणतात. 'लीळाचरित्रात' या स्थानाला, तेथील गोमुखाला किंवा कुमारेश्वरावरील गोमुखाला 'धार' किंवा 'धारातीर्थ' असे म्हटले आहे.

म्हणजेच लीळाचरित्रकार सरोवर-कुंडाला 'धारातीर्थ' म्हणत नाहीत; 'तारातीर्थ'च म्हणतात. आणि वर जमिनीवर असलेल्या गोमुख-धारेला 'तारातीर्थ' म्हणत नाहीत; 'धारातीर्थ' किंवा 'धार' असेच म्हणतात. याचा अर्थ लोणार मधील खाऱ्या सरोवराला 'तारातीर्थ' व वरच्यां गोड्या पाण्याच्या धारेच्या ठिकाणाला धारातीर्थ म्हटले जात होते आणि या दोहोंमधला फरक सातशे वर्षांपूर्वी 'लीळा-चरित्र'कारास, त्यावेळच्या लोकांना, विद्वानांना निश्चित माहीत होता.

'लीळाचरित्र' हा मराठीतील आद्य गद्यग्रंथ शके १२०० मध्ये लिहिला गेला व 'स्थानपोथी'ची रचना त्यानंतर लवकरच झाली. ही 'स्थानपोथी-' सुद्धा हा फरक स्पष्ट नोंदवते. 'तारातीर्थ' ज्या भागात येते त्याचे 'स्थानपोथी'तील वर्णन असे आहे :—

लोणारीं अवस्थान भैरवीं मांस १ एकी-दीस वीस भैरवांचें देऊळ उत्तराभिमूख ।। कामळजे चौकीं आसन ।। कामळजे पसीम पांडां १० वडु : तारातीर्था दक्षीणे वडु राजया भेटि ।।

राजाची भेट झालेले ठिकाण सरोवरात, खोलगट भागात भैरवाच्या देवळाजवळ कमळजेच्या पश्चिमेला आहे, हे या वर्णनात आहेच; पण तारातीर्थाच्या दक्षिणेला तो वड होता, हेही 'स्थानपोथी' बरोबर सांगते.

सरोवरात प्रत्यक्ष नसलेल्या जमिनीवरील म्हणजे उत्तरेकडील ठिकाणाचे वर्णन 'स्थानपोथी' 'धारातीर्थ' म्हणून करते :—

कुमारेस्वरू पूर्वाभिमूख ।। दारवठे दोनी: एकु पसीमांभिमूख: एकु उत्तराभिमूख: तोचि घाटू ।। धार ।।

हे वर्णन कुमारेश्वराचे म्हणजे सरोवराच्या उंच भागातले, उत्तरेकडचे (मधल्या भागाचे) आहे; तर त्याहीपेक्षा उंच, जमिनीशी समतल असलेल्या स्थानाची माहिती देताना 'धार' असेच वर्णन 'स्थानपोथी' देते :—

ओहळीचां थडीए भोजनंता ।। कुमारेस्वरा वाव्य कोनि घाटू । धारे उत्तरे धारकऱ्यांचे घर ।।

तारातीर्थ व धारातीर्थ यांमधला हा फरक आजच्या विज्ञानयुगाने स्पष्ट केलेला आहे. शास्त्रज्ञांनी अगदी अलीकडे जाहीर केले आहे की, उल्कापाताने भूभागावर पडलेला एकमेव खळगा म्हणजे लोणारचे हे खाऱ्या पाण्याचे सरोवर !

लोणारच्या या सरोवराकाठी जमिनीच्या समतल भागावर पूर्वेस विश्रामगृह असून तेथून पश्चिमेकडे पाहिले असता सरोवराचा खड्डा फारच खोल दिसतो. डोंगरांची व मातीची रचनाही वेगळीच वाटते. या जागी विश्रामगृहाबाहेर एक लेख एप्रिल, १९७५ (एकोणवीसशे पंचेहात्तर) मध्ये लिहिला असून त्यावर पुढील मजकूर आहे :—

The only Hypervelocity Natural Impact Crater In Basaltic Rock In The World.

—*Erected By The Geological Survey of India, April,* 1975.

उल्कापातामुळे म्हणजे तारा पडल्यामुळे हे सरोवर झाले याची निश्चित जाणीव सातशे वर्षांपूर्वी याचा उल्लेख 'तारातीर्थ' असा करणाऱ्या म्हाइंभटांना होतीच होती. निदान त्यावेळच्या लोकांमध्ये 'तारातीर्थ' हे 'विज्ञान-सिद्ध' नाव प्रचारात होते, याची खात्री यावरून वाटते !

⊗ ⊗ ⊗

एंगेजमेंट / ज्योती कस्तुरे

'ठण् ठण् ठण् ठण् ठण्'. मुंबईच्या बोरीबंदर रेल्वेस्थानकावरील मोठ्या घड्याळात पहाटे पाचचे टोल पडत होते. त्याबरोबर एका उंच, तरुण, सुमारे सत्तावीस-अठ्ठावीस वर्षांच्या इसमाने मनगटावरील घड्याळात बघितले नि बारीक डोळे करून दूरवर नजर टाकली. एकाएकी त्याचे अंतःकरण जोरजोराने धडधडू लागले. त्याला एक वेगळीच हुरहूर, अस्वस्थता वाटू लागली. जी संपूर्ण रात्रभर त्याला वाटत होती तीच. पण आता तिचे प्रमाण कितीतरी पटीने वाढले होते. आणखी फक्त वीस मिनिटे! फक्त वीसच मिनिटे! बरोबर पाच-वीसला गेले वर्ष दीड वर्ष त्याचे अंतरंग व संपूर्ण जीवन व्यापून राहिलेली त्याची प्रियतमा त्याला भेटणार होती. त्याचे जीवन-सर्वस्व बनलेली प्रिया तो आज पहिल्यांदा बघणार होता. डोळे भरून हो पहिल्यांदाच. कारण अजून त्याने तिला फोटोतसुद्धा बघितले नव्हते. पण तिची असंख्य-प्रेमपत्रे. या पत्रांमुळेच तो तिचा फक्त तिचाच बनला होता. कायमचा. आता त्यात अंतर पडणार नव्हते.

अभय सिन्हाला तिची पत्रे, त्यातील मजकूर पुन्हापुन्हा आठवू लागला. आयुष्यात एकामागून एक येणाऱ्या अपयशामुळे तो खचून गेला होता. आई-वडील बालपणीच वारले होते. हाल-अपेष्टांना हिंमतीने सामोरे जात त्याने शिक्षण पूर्ण केले होते. पण नंतर आ वासून उभ्या असणाऱ्या भयंकर बेकारीने त्यालाही ग्रासून टाकले. जवळ-जवळ वर्षभर तो नोकरीसाठी वणवण भटकला. अपमानाचे, पराजयाचे फटके खात! अखेर त्या दिव्यातूनही सहीसलामत बाहेर पडला. चांगली नोकरी मिळाली. चार मित्र जोडले. जीवनात स्थिरता आली. पण मग त्याला एकटेपणा खूप जाणवू लागला. आतापर्यंत काही तरी मिळवायचे होते. चालत जायचे होते. आता तेही संपले. चौकटीचे जीवन वाट्याला आले. त्यासाठीच तर तो धडपडत होता. चार-चौघांसारखा बनण्यासाठी. मनाला स्वास्थ्य तरीही लाभले नव्हते. एकाकीपणा संपत नव्हता. अशातच एका प्रसिद्ध मासिकात 'आम्हांला हवे तरी काय?' या नावाचा एक वैचारिक लेख त्याच्या वाचनात आला. तो एका स्त्रीने लिहिला होता. त्यात त्याच्यासारख्या असंख्य तरुणांची हीच समस्या मांडली होती. मोठमोठ्या शहरात, मोठ्या हुद्यावर नोकरी करणाऱ्या, प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या पण तरीही अत्यंत एकाकी व मनातून एकटे असणाऱ्या अनेक तरुणांचा विचार त्या लेखात सर्व बाजूंनी केला होता. पुरुषांचे अंतःकरण इतक्या सूक्ष्मतेने, इतक्या हळुवारपणे जाणणारी ती स्त्री कोण असावी याचे त्याला मोठे कुतुहल उत्पन्न झाले. लेखावर तिचे नाव व पत्ता होता. त्याने तिला एक पत्र लिहिले. तिचेही तत्परतेने उत्तर आले.

त्यानंतर पत्र-व्यवहार वाढतच गेला. अनेक विषयांवर, ग्रंथांवर जटिल समस्यांवर ते दोघेही पत्रांद्वारे विचारांची देवाण घेवाण करू लागले. अनेक बाबतीत त्यांच्यामध्ये कमालीचे मतैक्य होते. एका पत्रात तिने त्याला लिहिले होते, 'एवढे विचारसाम्य, समान विचारसरणी दोन व्यक्तींत असू शकते यावर सुरुवातीला माझा विश्वासच बसला नाही. तुमचे अनेक विषयांवरील विचार, अनेक बाबतीत तुम्ही दिलेली मते मला पूर्णपणे पटली. नव्हे ती जणू माझीच होती म्हणा ना! आपली ही वैचारिक समानता दो नेत्री एक पाहणे, दो ओठी एक बोलणे याप्रमाणे आहे असे नाही का तुम्हाला वाटत?' त्याचे पत्र बरेच दिवसांत गेले नाही तर तिच्या पत्रात अस्वस्थता व्यक्त होई. त्याच्याही मनात तिचे पत्र वाचताना आता पुढचे पत्र केव्हा येईल हेच विचार

घोळू लागले. लवकरच दोघांनाही कळून चुकले की आपण परस्परांच्या प्रेमात पडलो आहोत.

आणि आज त्याला तिचे प्रत्यक्ष दर्शन होणार होते. तिचे बोलणे, तिचा आवाज तो ऐकणार होता. आता फक्त दहा मिनिटे बाकी होती. तो समोरच्या बाकावर बसला. सिगरेट पेटवून झुरके घेऊ लागला. धुरांच्या वलयां-बरोबर स्मृतींची वलये निर्माण होऊ लागली– सुखावणारी, हवीशी वाटणारी, संपू नयेसे वाटणारी.

'तुझा फोटो पाठव', म्हणून त्याने तिला एका पत्रात विनंती केली. त्याच्या या मागणीला तिने सौम्य पण स्पष्ट शब्दांत नकार दिला. नकारा-सोबत कारणही मांडले. मोठे मार्मिक होते ते पत्र. 'तुम्हांला माझ्याविषयी काय वाटतेय हे मी केव्हाच जाणले आहे. मनाने आपण खूप जवळ आलोय्, खरे ना? पण माझ्याबद्दल तुम्हांला हे जे वाटतेय ते जर नैसर्गिक नि खरे असेल तर फोटोवाचून काय अडणार आहे! असं बघा, समजा मी सुंदर असले तर मला सारखे वाटत राहील, तुम्ही माझ्या सौंदर्यावरच भाळला आहात. आणि मला फक्त सौंदर्यामागे धावणाऱ्या भ्रमरवृत्तींच्या पुरुषांचा मनस्वी तिटकारा आहे. जगात स्त्री-सौंदर्य हाच एक प्रेमाचा विषय आहे का? मी जर सामान्य, चारचौघींसारखे असले तर मला वाटेल तुम्ही एकटे व एकाकी आहात म्हणून केवळ वेळ घाल-विण्यासाठी, मनोरंजनासाठी माझ्याशी पत्रमैत्री ठेवत नसाल ना? तेव्हा कृपा करून फोटोचा आग्रह धरू नका. त्यापेक्षा एक सुचवू का? माझ्याशी प्रत्यक्ष भेटू शकाल? आपण एकमेकांना बघू आणि मगच काय ते ठरवू. अशा बाबतीत घाई नको, नाही का?'

पाच-वीसला आता फक्त चार मिनिटे उरली होती. बरोबर पाच-वीसला या तारखेला त्याने स्टेशनवर यायचे. याच प्लॅटफॉर्मवर उभे राहायचे, तिने अंगावर लाल शाल नि हातात पांढरी पर्स घेऊन यायचे. त्याने खुणेसाठी पांढरा रुमाल हलवायचा. अशा बारीक सारीक खाणाखुणा त्यांनी पत्रातून ठरविल्या होत्या. त्यानुसार तो आज झाला होता. धाड्धाड् करीत ट्रेन राइट-टाईम आली. तसे त्याचे मन आणखीच धडधडू लागले. ती खरोखरच येईल ना? ती दिसायला कशी असेल? तिचे वय काय असेल? इ. प्रश्न जे आतापर्यंत अनेकवेळा मनात डोकावून गेले होते तेच पुन्हा एकदा नव्याने उभे राहिले. तो उठून उभा राहिला. तोंडातली सिगरेट शेवटचा झुरका घेऊन त्याने फेकून दिली. न जाणो तिला सिगरेट ओढणे आवडते की नाही. फेकून देणेच चांगले. असा विचार करून. तो उतरणाऱ्या प्रवाशांकडे बघू लागला. उत्सुकता शिगेला पोहचली होती.

ट्रेनमधून एक बावीस-तेवीस वर्षांची तरुणी उतरली, नि समोरून येऊ लागली. त्याच्या कल्पनेप्रमाणेच ती मोहक नि आकर्षक होती. खास सुंदर नसली तरी तिचे उंच कपाळ व त्यावरील मोठे लाल कुंकू यामुळे ती एकदम उठून दिसत होती, अनेक प्रवाशांमधून. ती डौलदारपणे एक-एक पाऊल टाकीत येत होती. जवळ-जवळ येत होती. एखाद्या प्रसन्न देवतेप्रमाणे. तिच्या चेहऱ्यावर मंद स्मित होते. डोळे स्वप्नाळू होते. पण नजरेत आत्मविश्वास होता. तो अधिर झाला. तिच्याकडे वळण्यास त्याने पाऊल उचलले. पण तो दचकला. नि जागच्या जागीच उभा राहिला. कारण तिच्या अंगावर लाल शाल नव्हती आणि हातात पांढरी पर्सही नव्हती. त्याच्या जवळून जाताना तिने त्याच्याकडे बघितलेही नाही. एखाद्या तिऱ्हाइताप्रमाणे ती निर्विकारपणे आली आणि आली तशीच झर्कन् पुढे निघून गेली. अभय सिन्हा मात्र तसाच उभा होता. इतक्यात ट्रेनमधून आणखी एक तरुणी बाहेर पडली.

पण तिच्याकडे बघताच तो थंड झाला. ती तरुणी बरीच उंच, किडकिडीत बांध्याची, सावळया वर्णाची होती. डोळ्यांवर चष्मा होता. ती हळूहळू त्याच्या दिशेने येऊ लागली. तिचा चेहरा निस्तेज होता. कपाळ चिंचोळे होते. चाल संथ होती. आणि मुख्य म्हणजे तिच्या अंगावर लाल शाल नि हातात पांढरी पर्स होती.

अभय सिन्हा गांगरून गेला. क्षणभर त्याचे मन विचलित झाले. त्याला वाटले जावे

निघून असेच परत. ओळख न देता. ती रूपाने इतकी सामान्य असेल असे त्याला कधी वाटलेच नाही. इतके प्रभावी व सुंदर विचार असणारी तरुणी इतकी म्लान, इतकी 'पेल'. त्याचा विश्वासच बसेना. तो पार नर्व्हस झाला. पण जागचा हालला नाही. त्याने समोरच्या त्या प्रौढ तरुणी-कडे परत एकवार बघितले, 'असेना का तिचा चेहरा उतरलेला. पण तशी ती प्रेमळ व शांत दिसते. असेना का वयाने थोडी प्रौढ, रूपाने सामान्य. पण विचार तर कुरूप नाहीत ना? चेहरा सुंदर असण्यापेक्षा मन कुरूप नसणे जास्त चांगले. आपल्याला ही तरुणी नक्कीच समजून घेईल. प्रत्येक बाबतीत सहकार्य देईल. त्याने मनाची समजूत पटवली आणि तो त्वरेने पुढे झाला.' निश्चयपूर्वक त्याने तिच्यासमोर जाऊन ओळखीसाठी पांढरा रुमाल हलविला. किंचित स्मित केले. निराशेचा कडवटपणा गिळून टाकला. मनापासून म्हणाला, 'मी अभय सिन्हा. तुम्ही मिस् कामतच आहात ना? ठरल्याप्रमाणे आपण आलात, मला मोठा आनंद झाला. चला आपण आधी गरम-गरम कॉफी घेऊ. नंतर माझ्या घरी जाऊ. मी आपलीच प्रतीक्षा करीत होतो'. त्या स्त्रीच्या चेहऱ्यावर वेगळेच हास्य पसरले. ती म्हणाली, 'अहो, काय गडबड आहे मला काही कळत नाही. आता थोड्याच वेळापूर्वी जी तरुणी येथून गेली ना, ती मला म्हणाली की कृपा करून माझी ही शाल व पर्स तुम्ही थोडा वेळ सांभाळा. पांढरा रुमाल हातात असलेला कुणी तरुण पुरुष तुम्हांला बघून घरी चालण्याचा आग्रह करू लागला तर त्याला माझा निरोप सांगा की त्याची वाट बघत मी समोरच्या हॉटेलमध्ये बसले आहे. मात्र तो तुमच्याशी काही बोलला नाही तर तुम्हीही त्याच्याशी काही बोलू नका.' ही काय भानगड आहे? काय गौडबंगाल, आहे? मला नका गुंतवू तुमच्यामध्ये. तुमचे तुम्ही बघून घ्या' असे काही तरी ती पुटपुटत होती. अभय सिन्हाचे तिच्या पुढच्या बोलण्याकडे लक्षच नव्हते.

(रीडर्स डायजेस्ट, मे १९५१ मधील 'अपॉइन्टमेंट विथ लव्ह' या मूळ कथेच्या आधारे).

⊗ ⊗ ⊗

एकाकी / मंगल देसाई

कुठल्यातरी एका कवीच्या एका कवितेचा भावार्थ वारंवार मनाला हळुवार स्पर्श करीत असतो. कवीचं नाव आठवत नाही हा माझ्या स्मरणशक्तीचा दोष. पण त्याचा भाव माझ्या मनात घर करून राहिल्यामुळं त्या कवीचं नाव आठवण्याइतकं श्रेय मला मिळावं असं वाटतं. कवीनं तिन्हीसांजेचं इतकं सुंदर चित्र रेखाटलं होतं.. घराकडं परतणाऱ्या पाखरांचे थवे निळयाभोर आकाशातून उडता उडता एक वेगळाच किलबिलाट करीत होते. अंधाराची पुसटशी रेखा पूर्वेकडून उमटू लागली होती. पश्चिम क्षितिजावर अस्त पावलेला सूर्य आपल्या अस्ताच्या गौरवशाली खाणाखुणा मागं ठेवून गायब झाला होता. अशावेळी एक अनामिक अशी हुरहूर नायिकेच्या मनाला लागते. तिला एकाकीपण, एकटंपण जाणवू लागतं. तिचे डोळे पाणावतात, मन कुठंतरी तंद्रावतं, तिची ती तंद्रापूर्ण पाणावलेली भावावस्था प्रत्येकाच्या प्रत्येक 'माणसा'च्या भावुक मनाचं एका विशिष्ट दशेतलं जणू चित्र असतं असं मला वाटतं.

मग आठवतात मिसेस् आयजॅक.

मिसेस् आयजॅक ह्या आमच्या गावातल्या प्रसिद्ध कान्वेंटमधल्या जुन्या टीचर. एकदा रिटायर्ड झाल्यावर पुन्हा नोकरी करायला लागल्या होत्या. कित्येक वर्षांपासून त्यांच्याकडं दुसऱ्या यत्तेचे वर्ग दिले जात होते. आमच्या फादरनं पण त्या पुन्हा रुजू झाल्यावरही दुसरीशी जडलेलं त्यांचं अतूट नातं तोडलं नव्हतं.

आयजॅक तशा बोलक्या होत्या. पण आपल्या नवऱ्याच्या खिस्तवासानंतर त्यांचं बोलणं बरंच कमी झालं होतं. नवऱ्याच्या मत्यूनंतर ॲलिसचं– आपल्या मुलीचं लग्न त्यांनी एका देखण्या अँग्लोइंडियनशी करून दिलं. ॲलिस नवऱ्याबरोबर ऑस्ट्रेलियाला गेली अन् मग आयजॅकच्या संथ वाहाणाऱ्या एकाकी जीवनाची सुरुवात झाली.

"मी अँग्लोइंडियन आहे" असं त्या अभिमानानं सांगत. माझी अन् त्यांची पहिली भेट झाली ती आमच्या कन्यारत्नामुळं. 'प्लीज् सी मी' अशी 'नोट' पाहिल्यावर मी धावत पळत त्यांना भेटायला गेले होते, मला ठाऊक होतं की सगळीच मुलं त्यांना 'व्हीप्' अर्थात् 'मारकुट्या' बाई म्हणतात. त्या दृष्टीनं मला त्यांची धास्तीच वाटायची. कारण आमच्या कन्येचं 'होमवर्क' आमच्यासाठी मोठं 'वर्क' असायचं. नाहीत 'पनिशमेंट' ही ठरलेलीच !

मुश्किलीनं पाच फूट उंची असावी त्यांची. कानापर्यंतचे कापलेले तेलकट, विरळ झालेले केस; काळ्या रेषांच्या भोवऱ्यांतून चमकणाऱ्या त्यांच्या डोळयांवरचा जाडजूड चष्मा; गुडघ्यापर्यंतचा स्वस्त, डिझाइनच्या चिटाचा साधा फ्रॉक आणि नजरेत चटकन् भरणारं नकटं नाक, त्यांचे कान खरोखरच विधवेप्रमाणं अनलंकृत होते. शाळेत बसलेल्या खुर्चीवरून त्या कधीच उठत नसत. पण आपल्या वारसागत संस्कारामुळं रक्तात. भिनलेल्या शिष्टाचारांनाही त्या विसरत नसत.

कन्यारत्न आमच्याप्रमाणंच भयंकर आळशी व शिकण्याच्या बाबतीत अगदीच बेदरकार असल्यामुळं आयजॅक बाईंनी काळजीचा सूर काढला. मग त्यांचीच शिकवणी सुरू केली. आधी त्यांनी फारच आढेवेढे घेतले. मात्र मनधरणीनंतर होकार दिला.

एक दिवस ट्यूशनसाठी कन्यारत्नाला सोडायला मी स्वतः गेले. मग आयजॅकची व माझी ओळख वाढली.

"तुम्ही महाराष्ट्रीयन का ?" त्यांनी मला विचारलं.

मी एकदम विचारात पडल्यासारखं दिसताच त्या चटकन् म्हणाल्या—

"नव्हे, म्हणजे तुम्ही मुलांशी इंग्रजीत बोला. घरी सारखं मराठीत किंवा दुसऱ्या भाषेत बोलल्यावर त्यांना शाळेत समजणं किंवा समजावणं जरा जड जातं."

त्यांचा जो प्रश्न मला आधी विचित्र आणि काहीसा भाषावादी वाटल्यामुळं मला आश्चर्य अन् रागही आला होता, त्यातील 'पंचायती' च्या स्पष्टीकरणानं मी हसले व म्हटलं—"नाही, आम्ही गुजराती आहोत. पण. मी गुजराती नाही."

त्यांच्या बारीक डोळ्यांनी चकित होऊन माझ्याकडं पाहात म्हटलं. "म्हणजे? तुमचं प्रेमलग्न का?"— काहीतरीच फार 'पर्सनल' विचारल्यामुळं आपणच शरमिंदं झाल्यासारखं करून त्यांनी चौकस सुरात विचारलं. वर आपलं लग्न कसं झालं, आपण 'फरो' कुटुंबातली चौथ्या नंबरची मुलगी असूनही ट्रेन ड्रायव्हरच्या प्रेमात पडल्यावर आधीच सनातनी असलेल्या आई-बापांनी कसाकसा गोंधळ घातला, राग आणि त्रास बाईंना कसा सहन करावा लागला हे सर्व त्यांनी आत्मीयतेनं सांगितलं."

नवरा अचानक वारला होता. तो बंगला व काही इस्टेट मिसेस आयजॅकांच्या नावावर नव्हती. खरं पाहता त्यांना हे गाव आवडत नव्हतं. पण नवरा आणि ॲलिस या दोघांची उत्कट इच्छा ती डावलू इच्छित नव्हती. "आम्हांला म्हणजे माझ्या नवऱ्याला आणि मला वाटायचं की माझा नवराच जास्त जगेल. कारण आमच्या कौटुंबिक आयुर्मर्यादेचा इतिहास पाहिला तर त्याच्या कुटुंबातली सगळीच जास्त जगतायत. माझ्या कुटुंबातील कमी. आमच्या 'प्लॅन'मध्ये चूक झाली. फिलीप गेला. मी राह्यले. ॲलिस ऑस्ट्रेलियाला गेली मी मात्र एकटी राह्यले. फादरनं नोकरीला बोलावलं. या मुलांच्या 'निमित्तानं' माझा जीव रमतो. वेळतरी जातो. 'मूड' आला—खास म्हणजे कुणी आलं तरच स्वयंपाक करते. नाहीतर एरवी आमलेट आणि ब्रेड आहेच. कुणासाठी करायचं? ही सगळी प्रॉपर्टी माझ्या आणि ॲलिसच्या नावावर करून घेतली तेव्हा कोर्टकचेऱ्यांचा इतका वैताग आला की. . .ॲलिस नसती तर कदाचित मी ती धर्मादाय" करून भाड्याच्या खोलीतच राह्यले असते.. "

आयजॅक बोलत गेल्या आणि मी ऐकत राह्यले. बोलता बोलता थांबून ओशाळलेल्या चेहऱ्यानं त्या म्हणाल्या : "बोअर झाला ना तुम्ही? थांबा हं, फोटो दाखवते." अन् मग कौतुकानं आपल्या लेकीचे, नातीचे परदेशात स्थायिक झालेल्या भावावहिणींचे फोटो दाखवले. मला वाटलं की भावनेच्या भरात अेकलेपणाला कंटाळलेल्या जीवाला ओकायचं होतं ते त्यांनी ओकून टाकलं. पण चेहऱ्यावर कुठंही भाव किंवा चलविचल नव्हती. अगदी स्थिर चेहरा ठेवून आपलं दुःख सांगणं किती कठिण असतं!! हे कसं जमतं या बाईला असं मला वारंवार वाटत होतं.

"तुम्ही पिक्चर पाहता?"– हा आयजॅकनं नवीन विषय काढला. "मी प्रत्येक हिंदी पिक्चर पाहते— 'लाइट ऐंटरटेन्मेंट!' डोक्याला 'टेन्शन' नाही. आधीच वैतागलेल्या जीवाला पैसे खर्चून कुठं जास्त वैताग आणायचा?" दोन्ही हात मांडीवर दाबत त्या बोलल्या. "आणि दुसरं म्हणजे कुठं गेलं तर, 'इथलं तिथं अन् तिथलं इथं' करण्याशिवाय आपण बायका दुसरं काय करतो?" खरंच होतं त्यांचं म्हणणं. त्यांच्या मोकळेपणाचं आणि 'मारकुट्या' 'इमेज' मधलं काहीतरी वेगळंच रूप मला इथं दिसत होतं.

डिसेम्बरला 'ख्रिसमस' का येतो असं त्यांना वाटे. कारण सर्वांना 'ग्रीटिंग' पाठवलं नाही तर बरं दिसत नाही. पण पाठवायला गेलं तर एक 'मोठ्ठी नोट' कुठं केव्हा संपते ते कळत नाही. आणि मग 'बजेट'ला चांगलाच मार बसतो. त्यामुळं हा शिष्टाचार पाळू नये. नातेवाईकांच्या भावना तर असतातच. मग त्यासाठी शिष्टाचाराचं 'कागदी बंधन' कशाला असं त्यांना वाटायचं.

गप्पा संपल्या नाहीत. अर्थात त्या एकतर्फीच होत्या. तरीपण जीवाला रमवणाऱ्या, रमवून घेणाऱ्या 'एकाकी आत्म्याचं' घडलेलं दर्शन मला भारावून टाकायला पुरेसं होतं, मिसेस आयजॅकची 'इमेज' आज माझ्या नजरेत बदलली होती.

⊕ ⊕ ⊕

काही संत एक विचार / विमल भालेराव

ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, रामदास, महात्मा गांधी व गाडगे महाराज ही मंडळी थोर म्हणून सर्वज्ञात आहेत. आपल्यासारखीच ही माणसे ! मानव या एकाच कुळातील ! मानवता या एकाच गोत्राने शिक्कामोर्तब असलेली ! एकाच मातीवर पोसलेली ! वाढलेली ! तरी ती असामान्य का ? चार चौघांपेक्षा वेगळी का ? अशा प्रश्नांचा कल्लोळ आपल्या मनात उपस्थित होतो. परंतु थोडा विचार केला तर त्यांच्यातील व आपल्यातील फरक लक्षात येतो. त्यांच्या आणि आपल्या कृती-उक्तीत महदंतर असल्याचे जाणवते. त्यांचे जीवन चंदन आणि मेणबत्तीच्या जातीचे असल्याचे निदर्शनास येते.

ज्ञानेश्वर, रामदास आपल्याला परिचित आहेत ते संन्यासी म्हणून ! रूढ अर्थाने ते संसारी नाहीत. परंतु निरीक्षणांती त्यांच्या संसाराचा अथांग व्याप असल्याचे जाणवते. नामदेव, तुकाराम, महात्मा गांधी व गाडगे महाराज ही मंडळी संसारी आहेत. परंतु त्यांचा संसार सर्वसामान्य माणसासारखा चार भिंतींत आकसलेला नाही तर तो एक विश्व-पसारा आहे. सर्वांच्या भल्यासाठी 'निःस्वार्थ तळमळ' हे त्यांचे जीवनध्येय आहे. "ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभाविण प्रीती।" अशी त्यांच्या प्रेमाची रीत आहे. हेच त्यांचे आपल्यापेक्षा वेगळेपण आहे आणि यातच त्यांचे मोठेपण साठविलेले आहे.

ज्ञानेश्वरी हा ज्ञानदेवांचा वाङ्मयीन अक्षरदेह ! या अमीट कलाकृतीत गीतेचे तत्त्वज्ञान दिलखुलासपणे सांगून झाल्यावर ज्ञानेश्वरांनी शेवटी विश्वात्मक चेतनेस 'पसायदान' मागितले आहे. परिस्थितीच्या वणव्यात पोळलेला हा जीव सूड-बुद्धी मनात बाळगत नाही. मला छळणाऱ्यांचा तू असाच छळ कर असा दावाही दाखल करीत नाही तर—

"खळांची व्यंकटी सांडो।
तया सत्कर्मी रती वाढो।
भूतां परस्परें जडो।
मैत्र जीवाचे ।।९५।।
दुरितांचे तिमिर जावो।
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।
जो जे वांछिल तो ते लाहो।
प्राणिजात ।।९६।।"

अशी प्रार्थना करतात. 'सत्कर्मी रती वाढो' असे निर्मत्सर वृत्तीने म्हणतात. सर्वांचे एकत्व चाहतात. 'प्रत्येकाला त्याचे इच्छित मिळू दे.' या शेवटच्या चरणाशी त्यांनी आपले मागणे संपविलेले आहे. ज्ञानदेवांनी विशाल अंतःकरणाने अखिल प्राणिमात्रांसाठी केलेली ही आराधना आहे. त्यांच्यासाठी पसरलेला हा पदर आहे.

सर्वसामान्य माणसाची अवस्था यापेक्षा फार निराळी आहे. सामान्य माणूस देवाजवळ, "जो जे वांछिल तो ते लाहो।" असे कधीच मागणार नाही कारण असे मागणे त्याच्या स्वभावातच बसत नाही. त्याची बुद्धी कधी 'स्व'च्या चौकटीबाहेर सरकतच नाही. हा त्याच्या बुद्धीचाही दोष नाही. तिला कधी तसे शिक्षणच मिळालेले नसते. चॉकलेटचा पुडा व चार भावंडे भोवती पाहून 'सगळी चॉकलेट मलाच मिळाली तर किती बरे होईल' असे 'स्व'केन्द्री धडेच तिने बाळपणापासून गिरविलेले असतात. आणि या संकुचित विश्वातच ती लहानाची मोठी झालेली असते. शेजारच्या मुलाला नोकरी व आपल्या मुलाला नाही ही वस्तुस्थिती सामान्यांची बुद्धी पचवू शकत नाही. त्यांच्या दृष्टीने सर्वगुणसंपन्न असलेले त्यांचे 'रत्न' मागे राहावयासच नको. 'बरे झाले हं ! तुमच्या बाळाला नोकरी मिळाली. देवा ! असेच

सर्वांचे भले कर'. असे वरपांगी म्हणणारे असंख्य महाभाग रोज नजरेस पडतात. त्यांचे बोलणे फार वरवरचे असल्याचे आपसूक निदर्शनास येते. कारण कुठूनना कुठून ते स्वत:हूनच फुटत असतात. आवरून सावरून धरलेले मन कसे ना कसे बाहेर पडतेच ! कधी त्यांच्या तोंडचा एखादा शब्द ही ठसठस बाहेर टाकण्याचे काम करतो तर केव्हा त्यांची एखादी कृती आतले गरळ बाहेर टाकण्यास मदत करते. ओठ आणि पोट उकलून दाखविते. आपल्या आत्मकेन्द्री बुद्धीला स्मरून ती देवाजवळ मागेल—'देवा ! मला पैसा दे. कीर्ती दे. मुलगा होऊ दे. मुलाला नोकरी मिळू दे. मुलीचे लग्न होऊ दे.' वगैरे वगैरे. हे मागणे न संपणारे आहे. ज्ञानेश्वर आणि सामान्य माणूस यांच्या दृष्टीने तौलनिक विचार केला तर सामान्य माणसाच्या तुलनेत ज्ञानेश्वर अलौकिकच म्हणावे लागतील. चारचौघांपेक्षा वेगळे ! असामान्य ! हा त्यांच्या लेखणीचा किंवा वाचेचा बडेजाव नाही तर त्यांची वागणूकही या विचारांना पेलून धरणारी आहे.

ज्ञानेश्वरांनी रेडयाच्या तोंडून वेद वदविले ही एक भाकडकथा समजली जाते. तिला फिदी-फिदी हसण्यात रस घेतला जातो. छे ! हे कधी शक्य आहे काय ? असे त्या घटनेला तिरस्काराने शिक्कामोर्तब केले जाते. या घटनेचा अर्थ प्रतीकात्म घेतला — रेडा म्हणजे निर्बुद्धतेचे प्रतीक मानले तर— निर्बुद्धाला वेद म्हणायला लावणे हे कर्तृत्व वंदनीय ठरणार नाही काय ? 'केल्याने होत आहे रे' किंवा 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता' या उक्तीचे हे दृश्यरूप म्हणता येणार नाही काय ? आपल्या थोडी कमी बुद्धी असलेल्या मुलाला चार पैसे मिळविण्याइतपत (टायपिस्ट, कारकून) शिक्षण मिळाले म्हणजे आपले ईप्सित साध्य होते. आपल्या इच्छाशक्तीचा मुक्काम तेथेच संपतो. परंतु मोठ्यांची ओढही मोठीच असते. झेप अफाट असते. का येत नाही ? कसे येत नाही ? प्रयत्न केला तर साध्य होते ही त्यांची जीवननिष्ठा असते. हा त्यांचा माणसाच्या बुद्धीवरील गाढ विश्वास असतो. या दृष्टीने विचार केला तर निर्बुद्धाला वेद म्हणायला लावणे हे ज्ञानेश्वरांचे समाज-प्रबोधन नव्हे काय ? या समाज-प्रबोधनातच त्यांचे मोठेपण साठविलेले आहे. ज्ञानेश्वरांसारखीच नामदेवांची जीवनरीतही असामान्यच आढळते.

ज्ञानदेव जातीने ब्राह्मण आहेत. तत्कालीन वर्णभेदानुसार विचार केला तर— इतर परिस्थिती सोडून जन्मजात ब्राह्मण्य पाहिले तर ब्राह्मण म्हणून सुसंस्कृतपणाचा काही ना काही वारसा त्यांच्याकडे येणे अपरिहार्य आहे. परंतु नामदेवांना हा जन्मजात आधारही नाही. त्यांचे घराणे प्रतिष्ठित नाही तर शिंप्याच्या घरी अशिक्षित आईबापाच्या पोटी त्यांचा जन्म झालेला आहे. जात निकृष्ट ! शिवाय कोणतीही सामाजिक प्रतिष्ठा नसलेली ! शिंप्याचे कपडे शिवण्याचे काम जीवनावश्यक खरे परंतु त्या काळात तरी शिंप्याला सामाजिक प्रतिष्ठा शून्यच होती. जन्मजात असे कुठलेही भांडवल पाठीशी नसताना नामदेव अमर झाले ते स्वत:च्या कर्तृत्वाने !

"नामा म्हणे मज आदि अंतु एकु ।
जननी आणि जनकु पांडुरंग ।"

अशी नामदेवांची अवस्था सदाचीच विठ्ठलमय झालेली आढळते. या विठ्ठलवेडामुळे समस्त परिवार त्यांच्यावर नाराज होता. परंतु नामदेवांनी या नाराजीला न जुमानता विठ्ठल-प्राप्ती करून घेतली. रंजल्यागांजलेल्यांना मदत करणारा, सासू आणि नवरा दोघांच्याही छळाने त्रस्त झालेल्या जनीला दळू, कांडू लागणारा विठू—मानवतेचे एक प्रतीक वाटतो. ज्ञानदेवांनी अद्वैताला साद घातली तर नामदेवांनी सर्वसामान्यांसाठी विठ्ठलाच्या निमित्ताने मानवता जवळ केली. नामदेवांचा विठोबाचा ध्यास म्हणजे मानवतेचा ध्यास. ही मानवता नामदेव-चरित्रात उमटलेली दिसते. कोरडी पोळी आपल्या घशाखाली उतरत नाही तशीच ती कुत्र्याच्याही उतरणार नाही म्हणून कुत्र्यामागे तुपाची वाटी घेऊन धावणारे नामदेव निश्चितपणे चारचौघांपेक्षा वेगळे ठरतात. मानवतेने विठ्ठलतेने ध्यासलेले नामदेवांचे अंत:करण

विठ्ठलप्राप्ती करून घेते. परंतु त्यांचे थोर मन तेथेच तृप्त झालेले दिसत नाही. आपले जीवनध्येय साध्य झाले. आता आपल्याला काय करावयाचे आहे ? हा विचारही त्यांच्या मनाला स्पर्शत नाही. त्यांची पुढची झेप चकित करणारी आहे. त्यांचे थोरपण उलगडून दाखविणारी आहे. त्यांच्या शिरावरची अखिल प्राणीमात्रांची काळजी प्रकट करणारी व त्या निमित्ताने त्यांचे समाजप्रबोधन दर्शविणारी आहे.

"अवघाची संसार करीन सुखाचा
जरी जाला दुःखाचा दुर्धरू हा"

ही नामदेवाची जन्मशपथ आहे. येथे नामदेव 'स्व' च्या चौकटी बाहेर निसटलेले दिसतात. 'स्व'चा विचार सोडल्याशिवाय माणूस दुसऱ्याचा विचार करू शकत नाही.

नामदेवांनी कितीतरी जीव सन्मार्गी लावले. विठ्ठल चिंतनाच्या निमित्ताने मानवतेच्या चिंतनाचे धडे लोकांना दिले. लोकांकडून ते गिरवून घेतले. हे नामदेवांचे समाज-प्रबोधन होय. पंढरीच्या विठ्ठल मंदिरातील नामदेवाची पायरी याची साक्ष आहे. नामदेव-कर्तृत्वाला ही लोकांची मानवंदना आहे. हेच नामदेवांचे अमरपण होय.

"दुष्काळे आटिले द्रव्य नेला मान।
स्त्री एक अन्न अन्न करिता मेली।
कोपला पाटील गावचे हे लोक।
आता काय खावे कोणीकडे जावे।"

अशी सर्वस्वाने उध्वस्त करणारी विपत्ती तुकारामाच्या जीवनात आली. संपूर्ण गावानेच त्याला झिडकारले. पण तुकारामाने आपला तोल सावरला. आपल्या हातांनीच आपले जीवन घडविले. या विषयी स्वतः तुकारामच सांगतात—

आरंभी कीर्तना करी एकादशी।
नव्हते अभ्यासी चित्त आधी।
काही पाठ केली संतांची उत्तरे।
विश्वासे आदरे करोनिया।

या अभ्यासाने तुकारामाच्या जीवनात परमार्थ अंकुरला आणि त्यांच्या जीवनाने कूसच बदलली. मानवतेचे प्रतीक असलेल्या विठोबाचे ते भक्त बनले. त्यांनी आत्मस्वीकार केला. ही तुकारामाची फार मोठी मनःक्रांती होय. या या आत्मस्वीकारामुळे एक अनोखी कलाटणी त्यांच्या जीवनाला मिळाली. त्यांचे जीवनध्येय बदलले. लोककल्याण हे त्यांचे जन्मकारण ठरले. ते स्वतः सांगतात—

"आम्ही वैकुंठवासी आलो याची कारणासी।
बोलले जे ऋषी साचभावे वर्तावया।"

"बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले", "सुख पाहता जवापाडे दुःख पर्वता एवढे" ही जीवन-तत्त्वे तुकारामाने चालता बोलता मांडली. स्वतःचा तोल सांभाळून तोल जाणाऱ्याला, संकटात असणाऱ्याला एक मानव म्हणून हात देणे हा मानवधर्म तुकारामाने स्वीकारला व आचरणात आणला, त्यातून लोकक्रांती साधली. आजही तुकारामाची ही वचने जगण्यास मदत करतात. कारण बाह्य परिस्थिती बदलली असली तरी मानवी मने तशीच आहेत. हे तुकारामाचे समाज-प्रबोधनच होय.

नामदेव आणि तुकाराम यांची मानवता रामदासांनी अधिक डोळस केली. चार-चौघां-सारखा संकुचित संसार नको म्हणून या महात्म्याने विवाहच नाकारला. संसारात पडल्याने स्त्री असो अगर पुरुष असो त्याचे जीवन आकसते, त्याला मर्यादा पडतात हे वास्तव रामदासांनी ओळखले. त्यांनी संसाराचे आकसलेपण नाकारले पण संसार मात्र नाकारला नाही. तर त्यांनी संसाराला भरघोस प्रोत्साहन दिले. संसाराचा खरा अर्थ लोकांना समजावून सांगितला.

"संसार करावा नेटका।
मग घ्यावे परमार्थ विवेका।"

अशा प्रशस्त सल्ला रामदासांनी दिला. संसाराचे नेमके तत्त्वज्ञान लोकांच्या गळी उतर-विणारा हा पहिला मराठी संत होय. सर्वसामान्य माणसाची कुवत त्यांनी ओळखली. त्याला झेपणारा, तोलणारा, पेलणारा व सोसणारा मार्ग त्यांनी सांगितला. आपला संसार सोडून देऊन परमार्थाच्या मागे लागणाऱ्यांची 'देव देवळात अन्

चित्त खेटरात' अशी अवस्था होते. धड प्रपंच नाही व धड परमार्थ नाही अशी त्यांची रस्सीखेच सदानीच सुरू असते. या निरीक्षणातून रामदासांचे प्रपंचविषयक तत्त्वज्ञान जन्मले.

रामदासांनी मानवतेला देव मानले. ही त्यांची फार मोठी उत्क्रांती होय. बोलाचीच कढी अन् बोलाचाच भात ही अवस्था रामदासांच्या बाबतीत कधीच झाली नाही. 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले' हे तुकारामांचे वचन रामदास जगले. त्यांच्या कृती-उक्तीत कधीही अंतर पडलेले दिसत नाही. आपले बोल आणि आपली चाल यांचा त्यांनी सतत तोल सांभाळला.

"जाणावे पराचे अंतर।
उदासीनता निरंतर
दुसऱ्यांचे अभिष्ट जाणावे।
बहुतांचे बहुत सोसावे
सदासर्वदा तत्पर परोपकारासी।"

स्वत:संबंधी उदास राहून, दुसऱ्यांचे मनोगत ओळखून, धरित्रीची सहनशीलता बाळगून रामदासांनी लोकांना परोपकाराची शिकवण दिली या शिकवणीप्रमाणेच तेही वागले. दुसऱ्याला सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वत: मात्र कोरडे पाषाण असे त्यांच्या बाबतीत कधीच झाले नाही. दुसऱ्यांसाठी झिजून झिजून हा आत्मा ब्रह्मलीन झाला.

ही मंडळी बारा ते पंधराव्या शतकातील आहेत. आता जग बदलले आहे. सतत तोल जाणाऱ्या परिस्थितीवर स्वत:चा तोल सावरणे अतिशय कठीण होते. मग दुसऱ्यांचा विचार करणार तरी कसा'? असा 'स्व' समर्थनार्थ सूर निघू शकतो. पण अगदी अलीकडे – एकोणविसाव्या, विसाव्या शतकातही अशी उदाहरणे दाखविता येतात. मानवता अजूनही जागी असल्याचे ते चिन्ह होय.

पूज्य महात्मा गांधी आयुष्यभर देशासाठीच खपले. घरादाराची पर्वा न करता अंगावरचा पंचा आणि नेसूचे धोतर एवढी लज्जारक्षणार्थ वस्त्रे सोडली तर या महामानवाने कधी तिसरे वस्त्र वापरले नाही. आपल्यापैकी किती लोकांना हे शक्य आहे? आपल्या कर्तृत्वाचा कधीही अहंकार नाही. 'मी'चा बडेजाव नाही की कधी 'मी'चा गाजावाजा नाही. अनेक दीन-दुबळ्यांचा भार या राष्ट्रपित्याने आपल्या खांद्यावर वाहिला. या राष्ट्रपित्याची प्रार्थना स्वत:साठी कशी असणार? संसारी असले तरी त्यांचा संसार स्वत:पुरता मर्यादित नव्हता. राष्ट्राचे पितृत्व त्यांनी स्वीकारले होते. परमेश्वराजवळ ते प्रार्थना करतात—

"रघुपती राघव राजाराम।
पतीत पावन सीताराम
ईश्वर अल्ला तेरे नाम।
सबको सन्मती दे भगवान।"

सर्वांसाठी सन्मती मागणारा हा आत्मा थोर नव्हे काय? देशातील बहुसंख्य लोकांना अंगात घालायला पुरेसे कपडे मिळत नाहीत ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन तेही आयुष्यभर विनासदऱ्याचेच राहिले. सर्वांमध्ये सारखेपणा-एकी निर्माण करण्याचा हा प्रयत्न म्हणजे मानवतेचा स्वीकार वाटतो. हे गांधीजींचे प्रबोधन म्हणता येईल. अगदी अलीकडचे उदाहरण द्यायचे झाल्यास गाडगे महाराजांचे देता येईल.

संत नामदेवांसारखेच गाडगे महाराजांनाही जन्मजात असे कुठलेही पाठबळ नाही. एका धोब्याच्या पोटी जन्मलेले हे पोर! पोराचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्यांच्या असामान्यत्वाच्या खुणा पोरपणापासून उमटलेल्या दिसतात. स्वत:लाच नीट सावरता येत नाही तरी काट्यातून जाणाऱ्या बकरीला 'काटे रुततीलनं' म्हणून सावरणारा लहानसा डेबू, मरीआईचा नैवेद्य भुकेने व्याकूळ झालेल्या आजीबाईना प्रेमाने खाऊ घालणारा डेबू चारचौघांपेक्षा वेगळाच म्हणावा लागेल! रामदासांचा मानवता धर्म यांनी अधिक सोपा केला. देशाच्या कानाकोपऱ्यात पोचविला. 'स्वत:वर विश्वास ठेवा. दगडाच्या नादी लागू नका' असे लोकांना कळकळीने

समजावून सांगितले, शिकविले आणि ते स्वतःही जगले ते एक मानव म्हणूनच !

"भुकेलेल्यांना--जेवण
तहानलेल्यांना--पाणी
गरीब मुलामुलींना—शिक्षणाला मदत
बेकारांना—रोजगार
बेघरांना—आसरा
अंध, पंगू, रोग्यांना—औषध
पशू, पक्षी मुक्या प्राण्यांना--अभय
गरीब तरुणतरुणींचे--लग्न
दुःखी– निराशितांना—हिंमत"

ही गाडगेबाबांची शिकवण आहे.

ज्ञानेश्वरांचे 'जो जे वांछिल ते तो लाहो प्राणिजात', नामदेव व तुकाराम यांच्या विठोबाच्या निमित्ताने मानवतेचा स्वीकार, रामदासांचा मानवता धर्म, महात्मा गांधी यांचे 'सबको सन्मती दे भगवान', गाडगेमहाराजांचा मानवतेचा स्वीकार वेगळा नाही. ही त्यांच्यातील आंतर-संगती होय. कारण सर्वांचे ध्येय सारखे आहे. सूर एकच आहे. आविष्करणाच्या पद्धती मात्र भिन्न आहेत. त्या निमित्ताने प्रत्येकाने समाज–प्रबोधन साधले आहे.

या सर्वांचे वैशिष्ट्य असे की, या मंडळीने आपल्या कर्तृत्वाला कुठेही आवाज दिलेला नाही. कुठेही गोडवे गायिले नाहीत. सामान्य माणूस उपकार उचकून काढल्याशिवाय राहात नाही. "मी अमक्याला 'फी' ला पैसे दिले. त्याला नोकरी माझ्यामुळेच लागली" असे गाऊन गाऊन सर्वांना सांगत असतो. आणि या उपकृतांकडून थोडी जरी हेळसांड झाली तरी त्यांचा 'अहं' दुखावतो. 'पाहिलं कसा कृतघ्न आहे' असा त्याच्या नावाचा टाहो सुरू होतो. त्याच्याकडे पाहण्याची दृष्टीच बदलते. त्याचे गुण दोष ठरतात. त्याच्या नावावर वाटेल त्या गोष्टी खपविल्या जातात. असा फरक आहे वरील मंडळीत आणि आपल्यात ! त्यांच्या तुलनेत आपण सदाच मागच्या रांगेत उभे आहोत.

निरनिराळ्या जातीची ही मंडळी आहे. जातीवर काहीही अवलंबून नाही हे त्यांनी सिद्ध केले आहे. प्रत्येकाने स्वतःच्या समाज–प्रबोधनाचा वेगळा ठसा उमटविला आहे. अशी सुंदर मने जगात आहेत म्हणून व्यवहार चालला आहे. हे जीव दुसऱ्यांना उमलवितांना स्वतः कोमेजत जातात. दुसऱ्यांना घडविताना स्वतः आतल्या आत मोडत जातात पण स्वतःचे कोमेजलेपण किंवा मोडलेपण याकडे त्यांचे लक्षच नसते. माणसे झपाटून टाकण्याची किमया त्यांच्यात असते कारण त्यांना स्वतःला काहीच नको असते. ही निर्लोभ सेवा असते. इतरांना सुगंध देताना आपले अस्तित्व संपत आले आहे याचा कधी उद्वत्ती विचार करीत नाही किंवा जगाला प्रकाश देताना आपण सरत आहोत असे कधी मेणबत्तीला वाटत नाही. म्हणून या अंधारलेल्या जगात सुगंध आहे, प्रकाश आहे व समाज–प्रबोधन घडत आहे.

⊕ ⊕ ⊕

मराठीतील नकार-वाङ्मय / विश्वास कानडे

गेली काही वर्षे प्रकाशित होणारे एका विशिष्ट प्रकारचे वाङ्मय बरेच अस्वस्थ करणारे आहे.

एखादी कलाकृती ज्यावेळी मनावर खोलवर परिणाम करते आणि आपल्या मनोविश्वात फार मोठी खळबळ उडवून देते, उलथापालथ घडवून आणते त्यावेळी एक अस्वस्थता निर्माण होते. इलियटच्या 'वेस्टलँड'ने किंवा जॉईसच्या 'युलिसिस' ने अशी अस्वस्थता निर्माण होते. ऑसबर्नच्या 'लुक बॅक इन अँगर' ने अशा प्रकारची अस्वस्थता निर्माण होते. जी. ए. कुलकर्णींच्या काही कथांनी अशी अस्वस्थता निर्माण होते. अलीकडील जे वाङ्मय इथे अभिप्रेत आहे ते या प्रकारचे नाही, हे आधीच स्पष्ट केलेले बरे. ते दुसऱ्या प्रकारचे आहे.

ह्या दुसऱ्या प्रकारच्या वाङ्मयाला आपण तात्पुरते नकार-वाङ्मय असे नाव देऊ. तात्पुरते अशाकरता की नकार-वाङ्मय म्हणजे काय, नेमकी कोणती पुस्तके हे अ‍ॅकेडेमिक व्याख्येप्रमाणे सांगणे कठीण आहे. पुष्कळदा व्याख्या न करणे हेच सोयीचे असते. विशेषतः एखादी घटना (Phenomenon) ज्यावेळेस नुकतेच रूप धारण करू लागलेली असते त्यावेळी व्याख्येच्या भरीस न पडणेच इष्ट असते.

म्हणून माझ्यासमोर जरी काही पुस्तके असली आणि त्यांचा मी उल्लेख करणार असलो तरी माझ्या निवेदनाचे मुख्य लक्ष्य काही प्रवृत्तींवर राहणार आहे. ह्या प्रवृत्तीच नकार-वाङ्मयाच्या व्यवच्छेदक लक्षणांपैकी महत्त्वाच्या म्हणून ठरतील असे मला वाटते.

नकार आणि होकार ही जोडी सापेक्ष आहे; परस्परविरोधी आहे. ज्यावेळी आपण एखादी गोष्ट नाकारत असतो त्यावेळी आपण इतर अनेक गोष्टींमधून ती निवडत असतो. इतर गोष्टी आपल्याला चालतात, ही चालत नाही. हिला आपला मनातून विरोध असतो. इतरही अनेक गोष्टी नको असताना एखाददुसरीच आपण नकारासाठी निवडतो. त्यावेळी तिला आपला अधिक विरोध असतो, ती अधिक नकोशी असते. पण येथे आणखी एक सूक्ष्म भेद करणे आवश्यक आहे. एखादी गोष्ट नाकारणे ही केवळ मानसिक प्रक्रिया / वृत्ती असू शकते; एखाद्या गोष्टीला विरोध करणे ही कृती असते. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर नकार हा मुळात वृत्तीपर असतो, विरोध कृतिपर असतो. ती एक (Positive) गोष्ट असते. म्हणजेच, नकार म्हणजे विरोध नव्हे. नकारात विरोधाची बीजे असतात हे खरे. पण जसे बी म्हणजे कळी नव्हे व कळी म्हणजे फूल नव्हे, तसेच नकार म्हणजे विरोध नव्हे. आणि जसे सगळयाच बियांची फुले होत नाहीत, तसेच सगळ्या नकारांना विरोधाची प्रतिष्ठा प्राप्त होत नाही.

नकारापासून विरोधाकडे जायचे तर एक प्रवास करावा लागतो. एक जिवंत अतिशय कष्टप्रद प्रवास करावा लागतो. तो सगळयांनाच जमतो असे नाही. मराठीतील सध्याचे नकार-वाङ्मय हे (एखाद दुसरा तुरळक अपवाद सोडला तर) केवळ नकार-वाङ्मयच आहे. त्याला निषेधाचे/विरोधाचे वाङ्मय (Literature of protest) म्हणणे यथोचित नाही. पण हे वाङ्मय नेमका हाच बुरखा घेऊन आपल्यासमोर येते आणि भाबडया रोमँटिक मध्यमवर्गीय मनाला त्याची भूल पडते. हे सगळे असे स्पष्ट करण्याचे कारण असे की मुळात जे वाङ्मय बळींच्या अंध आक्रंदनाचे वाङ्मय आहे, भयग्रस्त पराभूतांचे वाङ्मय आहे, दुर्बलांच्या मरगळीचे वाङ्मय आहे त्यालाच निषेधाचे, विरोधाचे, बंडखोरीचे वाङ्मय (Literature of protest) म्हणून गौरविण्यात येते.

ही नुसतीच अस्वस्थ करणारी बाब नसून शोकाचीही गोष्ट आहे.

ज्या प्रकारच्या वाङमयीन प्रवृत्तीबद्दल हे विवेचन आहे— ज्याचा ह्या प्रकारच्या नकाराशी घनिष्ठ संबंध आहे, त्या प्रवत्तींचा आढळ विशेष प्रकर्षाने तेंडुलकर, एलकुंचवार, अनिल अवचट, भालचंद्र नेमाडे, चिं. त्र्यं. खानोलकर, चंद्रकांत खोत, वसंत आबाजी डहाके, किरण नगरकर, दीनानाथ मनोहर इ. च्या वाङमयात होतो. ही यादी अर्थातच पूर्ण आणि नेमकी नाही. त्यांचे सगळेच वाङमय तसे आहे असेही नव्हे.

ह्या वाङमयाचा एक विशेष असा सांगता येईल की हे अधःपतनाचे वाङमय आहे. मानवाचे अधःपतन हा याचा विषय आहे. हे आपण सोयीकरिता म्हणायचे. पण मानवाचे म्हणता यावे येवढे व्यापक य.चे स्वरूप नाही. येवढेच नव्हे तर आपल्या असे लक्षात येईल की ते 'मानवाच्या' पातळीवर मुळी वावरतच नाही; वावरण्याचा प्रयत्नही करत नाही. त्याचा विषय असतो व्यक्ती, एक मनुष्य. फार तर आणखी एक व्यक्ती. आणि विषय असतो या व्यक्तीचे विचार; तिचं.मन; तिचं अंतर्मन: आभास असा असतो की ती 'साक्षी' म्हणून हे अधःपतनाचं दृश्य पाहात असते. आपल्याला जाणवत राहते ते ह्या व्यक्तीचे एक मत—जजमेंट. ते म्हणजे मानव, मानवी समाज अधःपतित आहे हे. अधःपतन हे त्याचे अखंड संचित आहे, तो त्याचा गाभा आहे, ते त्याचे भविष्य आहे.

मानवाच्या पातळीवर वावरू शकणाऱ्या कलेचे भान फार मोठे असावे लागते, ते फार व्यापक आणि व्यामिश्र असते. ही व्यापकता भौगोलिक स्वरूपाची किंवा ऐतिहासिक तथ्यांच्या समग्र ज्ञानाच्या स्वरूपाची अर्थातच नसते. पण तिच्या मानवी जीवनाच्या आकलनात व्यक्ती ही केन्द्रस्थानी राहात नसून सामाजिक मानव तिथे असतो. ह्या आकलनात त्याची भौतिक अभिव्यक्ती कितीही सीमित असली तरी मानवी निष्ठांचे, मूल्यांचे एक अभंग भान असते. (आपल्याकडील उदाहरण द्यायचे तर विश्राम बेडेकरांच्या 'रणांगण'चे देता येईल).

पण नकारवाङमय हे विलक्षण व्यक्तिकेन्द्री असल्यामुळे त्याच्यामुळाशी असल्या जाणिवेचा लवलेशही आढळत नाही. उलट ह्या अभावाचा परिणाम म्हणून एका भोळ्या अतार्किकतेला तत्त्वज्ञानाची प्रतिष्ठा प्राप्त होते. मुळातच समाजाकडे डोळेझाक केल्यामुळे व्यक्ति-व्यक्तींमधील पारस्परिक संबंधाचे ताण-तणावे आणि त्यांचे भौतिक सामाजिक, भावनिक, तात्विक व आध्यात्मिक अर्थ हे आकलनाचा व नंतर अभिव्यक्तीचा विषय बनण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सारे नाटक, सारी कादंबरी ही एका गृहीत कृत्याचा अंतहीन, कंटाळवाणा विस्तार बनून जाते. कुणाच्या नाटकात बटबटीत क्रौर्य आणि हिंसा, कुणाच्या कादंबरीत शिवणयंत्रातल्यासारख्या बुद्धीच्या सुईचा नाच, कुणाच्या एकांकात हळव्या संधिप्रकाशातलं हुकमी अबोल दुःख किंवा वासनांचा खडकाळ प्रवास--ह्या साऱ्यांच्या मुळाशी एकच एक नकारात्मक तत्त्व भरलेले असते. ह्यांची वेदना हा त्यांचा एक षौक असतो; त्यांच्या यातनाघरांमधून कुणालाही राहायला आवडावे इतके ते सुरक्षित असते. उघड्यावर पडलेल्या लिअरने आत्म्याच्या वेदनेने टाहो फोडून उत्तर न देणाऱ्या आकाशावर डोके फोडून घेणे निराळे, आणि बराच वेळापासून हवा असलेला सेक्स न मिळाल्यामुळे (किंवा मिळूनही) असमाधानी राहणाऱ्या वेदनेला मखरात बसवून तिचे लिंगार्चन करणे निराळे. अशा वेदनेला गंभीर विलापिकेचे परिमाण कसे लाभू शकेल? अस्तित्ववादाच्या उसन्या प्रमेयाचा ऊठ-सूठ आधार घेऊन लेखनाला तात्त्विक 'महात्मता' देऊ बघणाऱ्या लेखकांच्या वाङमयात अस्तित्ववादातील मूलभूत 'Angst' अभावानेच आढळते. हे लक्षणीय नाही का?

ह्या वाङमयाला आपण निषेध-वाङमय (Literature of protest) कसे म्हणू शकतो? ह्या वाङमयाचा तोंडवळा कुठल्याही निषेध-वाङमयाशी जुळत नाही. इब्सेन, शॉ, गाल्सवर्दी, ऑसबर्न किंवा आर्थर मिलर यांना आपण बाजूला ठेवू या. पण स्व. मोहन राकेश तर दूरचे नाहीत ना? त्यांचे 'आधे-अधुरे' या नाटकातल्या Protest चे स्वरूप मराठी-

तल्या तथाकथित Protest वाङ्मयापेक्षा किती भिन्न आहे! ह्या नाटकात तसे पाहिले तर विस्कळित व विघटित होणाऱ्या आजच्या कुटुंबाचे वास्तव चित्रण आहे. त्यात तसा प्रकट प्रोटेस्टचा सूर नाही. पण ज्या पद्धतीने हे नाटक हाताळण्यात आले आहे त्यात ती प्रोटेस्ट स्पष्टपणे जाणवल्याखेरीज राहात नाही. ती प्रोटेस्ट ही एक गंभीर जीवनसापेक्ष मूल्याशयातून जन्म घेते. ह्याच्या अगदी उलट परिस्थिती मराठीतल्या प्रोटेस्ट वाङ्मयाची आहे. मुळाशी मूल्याशयाचा अभावच जाणवतो. किंबहुना, तिथे जाणवते ती पतनाच्या प्रवाहाशी केलेली हलचल हातमिळवणी, तडजोड. खरे तर समर्थन. प्रोटेस्ट म्हणजे एक प्रकट अप्रकट ठोस निरोगी उत्तर असते. असायला हवे. मग ती सामाजिक पातळीवरची असो वा आध्यात्मिक पातळीवरची.

ज्या पातळीवर व ज्या शैलीत वरील नकार-वाङ्मय अभिव्यक्त होते त्याच पातळीवर व त्याच शैलीत 'सात सक्कं त्रेचाळीस' ही कादंबरी आहे. पण तीत, अपवादात्मकरीत्या का होईना, नकारावर मात करणारे सत्व आहे, हे आवर्जून सांगितले पाहिजे. हा उल्लेख, अर्थातच अशा वाङ्मयाच्या होकारात्मक शक्यता कशा प्रकारच्या आहेत ह्याचा ओझरता निर्देश करण्यासाठी आहे. (याच संदर्भात 'कोसला' व दीनानाथ मनोहर यांच्या 'रोबो' या कादंबऱ्यांचाही उल्लेख करता येण्यासारखा आहे).

किरण नगरकरांची शैली Clinical, clean, beautiful अशी आहे. संवादाच्या नव्या नव्या सीमा नगरकर गाठू शकतात. त्याकरता भाषेला ते सुरेख ताण व पीळ देऊ शकतात. मानवी संबंध एका अखंड अलिप्ततेने तमेच गाढ ममतानतेने चित्रित करताना त्यांचा हात कधी कापत नाही, मन चळत नाही, पापणी हलत नाही. आणि तरीही मधूनच त्या पापण्यांच्या आड क्षणभर प्रगल्भ कारुण्य साकळून जाते आणि त्वरित वाफेसारखे विरून जाते. हा सेकंदाएवढा चिमुटभर अश्रू घातक आत्मप्रेमी आत्मकरुणेचा नसतो तर पसायदानासारख्या भावनेतील सर्वव्यापी गहिवराचा असतो. नंतर पुन्हा सारे स्वच्छ, सारे अटळ, सारे खरे!

जीवनाचा टणक ताण नगरकरांपाशी आहे. एक वेगळा खोल तळाचा जिवंतपणा आहे. It affirms life, while condemning it by responding to its pulsations.

त्यांच्या कादंबरीत रक्ताभिसरणाचा दाब जाणवतो, व्यथेची धार जाणवते; स्पंदन, संवेदना-सारे एका तीव्र लयीत सतत 'गाजत' राहते. जीवनानुभवाच्या अनेक पातळया कधी थरथरत्या तर कधी भक्कम हातांनी सतत तिच्यात उलगडत राहतात.

आणि असे असले तरी तिच्याभोवती असलेल्या नकारात्मकतेच्या वेढ्यातून ती पूर्णपणे मुक्त होत नाही. ह्या मुक्तीचा शोध ही आजच्या मराठी लेखकाची ऐतिहासिक गरज आहे.

⊕ ⊕ ⊕

सूर्यकांत खांडेकर : एक सश्रद्ध कवी / अक्षयकुमार काळे

द्वितीय महायुद्धानंतर साहित्याच्या सर्वच प्रकारांत प्रचंड उलथापालथ झाली. मराठी काव्याचा तर चेहरामोहरा पूर्णपणे बदलला. आशयाभिव्यक्तीची नवनवीन दालने कवीकरिता जसजशी खुली होत गेली तसतसा जुन्या परंपरांचा, प्रवाहांचा, संप्रदायांचा बोलबाला कमी होऊ लागला व काही संप्रदायांकडे जुन्या वळणाची कविता म्हणून दुर्लक्षदेखील करण्यात आले. पण या स्वातंत्र्योत्तर काव्याकडे सूक्ष्मपणे पाहिले असता जुन्या प्रवाहांना चिकटून असणारी किंवा जुन्या परंपरांमध्ये राहून कविता लिहिणारे काही कवी दिसतात. सूर्यकांत खांडेकर हे असेच अत्याधुनिक प्रवाहांपासून कटाक्षाने अलग राहणारे कवी होते. त्यांच्या सावली (१९५४) छुमछुम (१९६२) पानफूल (१९७३) या काव्यसंग्रहांतून जुन्या काव्यवैशिष्टयांची छाया स्पष्टपणे दृग्गोचर होते.

सश्रद्धता हा त्यांच्या काव्याचा महत्त्वाचा विशेष आहे. परमेश्वराच्या अदृश्य रूपाशी त्यांच्या काव्यातून हृदयसंवाद साधला जातो. परमेश्वराचा साक्षात्कार त्यांना नभाच्या निळसर रंगातून, वायूच्या गीतातून, मानवाच्या अंतरातून, वादळाच्या घोर स्वरूपातून होतो. ते विचारतात,

> त्या फुलाच्या गंधकोषी सांग तू आहेस का ?
> त्या प्रकाशी तारकांच्या ओतिसी तू तेज का ?

इतकेच नव्हे तर बालकाच्या हास्या-पासून कष्टकरी जनतेच्या कष्टातून त्याला परमेश्वराच्या चिरंतन स्वरूपाचे दर्शन घडले आहे. परंतु आपल्या अचपळ मनामुळे त्यांना हे दर्शन अपुरे वाटते व भव्यतेच्या ध्यासात ते उद्गारतात,

> हे असेच अचपळ मन । आजवरी वेध कण्हते
> तव शाश्वत - भव्य रूप । जाणाया झुरमुरते.

ही सश्रद्धता केवळ परमेश्वराशी संवाद साधतानाच दृग्गोचर होते असे नाही. प्रेम, समाज, राष्ट्र या या सगळयांबद्दल त्यांच्या मनात उठणाऱ्या प्रेमोर्मी अशाच सश्रद्ध, उत्कट आणि भावूक झाल्या आहेत.

त्यांची प्रेमकविता साफल्याची आहे. त्यात जिव्हारी लागणारे विद्वेषाचे कडवट रंग नाहीत. अथांग तृप्त समाधान सगळ्या काव्याला व्यापून उरले आहे.

> तुझे मन माझे मन । दोन मने भाव एक
> तुझे डोळे माझे डोळे । प्रतिबिंबि एकमेका

या ओळींवर 'नाडि माझी तव करी वाहताहे। हृदय माझे तव उरी हालताहे' असे केशवसुतांच्या ओळींचे किंवा तांब्यांच्या 'कुणि कोडे माझे उकलिल का ? या कवितेची छाया असली तरी या ओळी अनुकरणप्रियतेतून निर्माण झाल्या नाहीत. पत्नीच्या सामर्थ्याचे, प्रेमाचे, शरणतेचे अतिशय उत्कट वर्णन त्यांनी सातत्याने केले आहे.

> तुझे नि माझे प्रेम शुभांगी ।
> अविनाशी शिव सत्य मनोहर

या श्रद्धेतून त्यांच्या प्रेमाची सुरुवात झाली. प्रेमातील अभिजात सौंदर्याचा आणि उत्कटतेचा प्रत्यय त्यांच्या काव्यातून सातत्याने येतो. ही विवाहोत्तर प्रेमकविता प्रणयाकडे झुकते पण वासनांचे गंध तिला परके आहेत. वासनांच्या धगधगत्या, फुलविणाऱ्या तर कधी विझवून टाकणाऱ्या विखारापासून ती कटाक्षाने अलिप्त राहिलेली आहे.

> इतके सोसलेस इतके सोसलेस,
> केवळ एकटया माझ्यासाठी
> सावली होऊन पावलोपावली
> फिरलीस सदा माझ्यापाठी
> एका माझ्या शब्दासाठी कष्ट
> सोसलेस किती अपार
> ग्रीष्माच्या ग प्रखर उन्हात
> संतत धरलीस श्रावणधार

पत्नीच्या दवासारख्या गोऱ्यापान अंग-कांतीपेक्षा, तिच्या पारिजातकाच्या स्पर्शापेक्षा तिच्या भावूक डोळ्यातील करुणामय स्तोत्र त्यांच्या तना-मनातून झिरपत गेले आहे. जीवनातील उदात्ततेवर, मांगल्यावर प्रेम करण्याच्या वृत्तीतून ही सश्रद्ध कविता जन्मास आली आहे. हीच सश्रद्ध खांडेकरांच्या निसर्ग-प्रेमातही दिसते. निसर्गाचे अनिवार वेड त्यांच्या काव्यातून जागोजाग प्रकटते. उसळता अथांग सागर, रानझरे, हिरव्या राईतील सांध्यगायनी रमणारे पक्षी, लुकलुकणाऱ्या तारका पाहून तो उद्गारतो;

सळसळणारी हिरवीगार।
पायाखाली भूमी आहे
गर्द निळ्या सावलीचे।
डोईवर आभाळ आहे
खरंच जगण्यात मौज आहे.

त्यांच्या निसर्गकवितांकडे वरवर जरी दृष्टिक्षेप टाकला तरी प्रतिमांची एक लांबच लांब रांग आपल्या डोळ्यांपुढे झळकून जाते. शुभ्र ढगांचे पक्षी, पवनाचे मिटणारे फूल, उन्हात भिजणारी पायवाट, गगनफुलाशी हितगूज करणाऱ्या चांदण्या, उन्हाचे उमलून येणारे फूल, शेवंतीला हळच धक्का देणारा रानझेंडू, एकान्तात झुलणारी बाभूळ अशी किती उदाहरणे द्यावीत?

प्रतिमांबरोबरच विविध रंगांची अनिवार आसक्ती खांडेकराच्या काव्यात आढळते. रंगांची किमया पाहून त्यांच्या मनाची कलिका उमलू लागते. त्यांची प्रतिमासृष्टीही नेहमीच रंगीबेरंगी शेला पांघरून अवतरते. कभिन्न काळे मेघ, पांढरी उन्हे, आश्विनातली पिवळी धरती, लाल जांभळे मेघ, शुभ्र निळी घनकमळे, फिकट जांभळी तृणपुष्पे असे रंगासक्त वर्णन सातत्याने त्यांच्या कवितेत आढळते.

त्यांची निसर्गप्रीती केवळ कलावंताची नाही त्यात सामान्य माणसाची निसर्गाबद्दल असलेली प्रगाढ आस्था आणि कृतज्ञताही व्यक्त झाली आहे.

अन्नब्रह्म तू धरतीमाते
अनंत हस्ते दान अर्पिसी
सकल सुखास्तव झिजवून जीवन
तू रत्नांच्या भरिसी राशी.

अभावानेच आढळणारी त्यांची ही निसर्ग-दृष्टी इतर निसर्ग–कवींहून त्यांचे पृथकत्व सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

पण कधी कधी त्यांची ही निसर्गप्रीती त्यांना खुलवू शकत नाही. जीवनाच्या विखारी वणव्यात कवीचा जीव होरपळून निघतो.

अजुन दाट हे धुके, धुके धुकेच जीवनी
भरभरून ये फिरून अश्रुपूर लोचनी
सरुनि जाय स्वप्न, एक दिवसरात्र जे उरी
मी निराश मी उदास झुरत या वनान्तरी

पण कवीची ही निराशा व्यापक नाही. ती काहीशी अनुकरणात्मक आणि क्षणिक आहे. प्रेमातून तर ती मुळीच आली नाही. ती क्षणकाल अस्वस्थ करणारी जीवननिराशा आहे. जीवना-तील शुचितेवर आणि समृद्धतेवर प्रेम करणाऱ्या कवीला ही निराशा कुठवर अस्वस्थ करणार? प्रेमावरचा आणि त्यागावरचा विश्वास कवीला सदैव आशावादी ठेवतो.

त्यांच्या या आशावादातून आणि जीवन-प्रेमातून काही राष्ट्रीय कवितांचीदेखील निर्मिती झाली आहे.

हिंदभूमिचे पाइक आम्ही
सारे एक करा निर्धार.
शिवरायांची पुन्हा गाजवू
पराक्रमी तलवार.

किंवा—

आज इथे रणकुंड पेटले
स्वातंत्र्यावर संकट आले
आक्रमकांना दूर लोटता
रक्त पडे बलिदानी

पण या कविता प्रासंगिक स्वरूपाच्या आहेत. त्यात कवीच्या हृदयीचे हार्द नाही. बोरकर–पाडगावकरांच्या अंतर्मुख परंपरेचेच खांडेकर पायिक आहेत. बहिर्मुख उन्मेषशाली प्रज्ञेच्या कुसुमाग्रजांशी त्यांचे नाते जुळणे केवळ अशक्यच होते. म्हणूनच ह्या अनुकरणशीलतेचा हव्यासही खांडेकरांनी फारसा धरला नाही व या बाह्य प्रलोभनापासून मुक्त होण्याचा प्रयत्न केला.

आपल्या प्रतिभेच्या विकासाची आणि तिच्या गतिरुद्धतेची बौद्धिक पातळीवर वाजवी जाणीव होण्याच्या वेळीच कवी कायमचा मूक व्हावा हा मात्र दैवदुर्विलास !

⊕ ⊕ ⊕

नाते शून्याचे ! नाते अनंताचे / निरंजन घाटे

पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाविरुद्ध ताठ उभं राहायची धडपड करणाऱ्यांचा मृत्यू लौकर होतो. साहेबांपुढे ताठ मान करून वावरणाऱ्यांच्या आशाआकांक्षांचा मृत्यू लौकर होतो. असे अप-मृत्यू टाळायचे असतील तर आपण पृथ्वीच्या किंवा साहेबाच्या कक्षेबाहेर तरी पोचायला हवं म्हणजे तिथे यांचा जोर पोचणार नाही किंवा जन्मभर खाली मान घालून, शक्य तितकं वाकून यांच्या जोराशी न झगडता जगायला हवं. या दोन्ही गोष्टींचे आपापल्या दृष्टीने फायदे आहेत. पहिल्या गोष्टीत आपण अजर, अमर असे होण्याची शक्यता असते तर दुसऱ्या प्रकारात आपण मेलेले कुणाच्याही लक्षात येत नाही आणि अजरामर माणसंही कालांतराने विसरली जातातच की ! म्हणजे गोळाबेरीज शून्य.

अनंतास कशानेही गुणले, कशानेही भागले, कितीही त्यात मिळवले, कितीही वजा केले तरी उत्तर अनंतच राहाते. त्यामुळे आपण जे जे अनंतात मिळवतो, जे जे वजा करतो, ज्याने ज्याने अनंताला गुणतो, ज्याने ज्याने अनंताला भागतो ते सर्व शून्यच ठरते. शून्य ही गुळगुळीत गोल छान संख्या मात्र किती उत्तम. यातून वजा होते किंवा यात मिळवले जाते. गुणाकार भागाकार मात्र होत नाही, कारण अनंताला वाटायला नको आपण मोठे म्हणून.

हा अनंता कोण? तो अनंता नव्हे. ते अनंत जेव्हा सगळ्या भानगडी करून आपण मरतो आणि ज्यात विलीन होतो ते अनंत. सुंदर अनंत, छान अनंत नि तितकेच चांगले शून्य. महिनाअखेरीस आपल्या खिशात असते. बायकापोरं गमावल्यावर मनात असते. ताठ मानेने जगून लाथ बसल्यावर आपल्या नजरेसमोर ह्यात असते ते शून्य. शून्य ही जाण आहे, शून्य ही जाणीव आहे. अनंत माया आहे. अनंत मिथ्या आहे. शून्यात सत्य दडलंय. मला शून्यात विलीन व्हायचंय कारण मी स्वतःच शून्य आहे.

शून्य म्हणजे मृत्यू, शून्य माझा बाप, शून्य माझा शोक, शून्य जगाचे भोक. शून्यात सत्य वसते. या जगाच्या भोकाला वंदन करतात लोक. आणि म्हणतात मी शून्यातून विश्व निर्माण करतो. राजे हो ! मला अेक शून्य द्या.

'मी अेक शून्य, तू दोन शून्य किंवा अेक शून्य झेलू बाअी दोन शून्य झेलू' अशी गाणी करतात आणि म्हणतात. अेका शून्याचा शून्योबा ! शून्योबा शून्योबा भागलास कां ? लिंबोणीच्या झाडामागे दडलास कां ? लिंबोणीचे झाड झोपले भोकाचे गणित चुकले !

म्हणजे मग आता आवाज येअील. आता किल्ल्यांचा आवाज येअील आता भांड्यांचा आवाज येअील म्हणजे आता बाहेर पडायला मिळेल म्हणजे आता खायला मिळेल. आता वॉर्डन येअील नि कपडेही धुवायला नेअील. खोली डेटॉलच्या पाण्याने धुतली जाअील. मग खेळायला सोडले जाअील. त्यात बाहेर कुणीतरी भेटायला येअील.

कोण बरं भेटायला येअील. मुलं ? नि आअी ? आअी कुणाची त्यांची ? ती तर अनंतात विलीन झाली. मात्र खूप धडपडली पण चांगली अनंतात जायची संधी आलेली; म्हणाली 'नको, नको। माझ्या मुलांसाठी तरी मला जगू द्या हो ! मी तुमचं काय केलंय हो ! कां मला मारता हो' ! खुळी तिला कोण मारणार? तिची धाव किती छोटी पण झेप किती मोठी. जन्म आणि मरण. मरण ते सरण. दारिद्र्य आणि मरण यातून मरण बरे वा दरिद्रता खोटी ! मरणांतानि वैराणि ! किती सुभाषितं ? शेवटी 'माझ्याचेने आता हे सहन होत नाही' ! हे बोलही तिचेच पण जेव्हा दोन हातांचे होते शून्य आणि

पकडते मान तेव्हा डोळ्यात येतात करुण भाव आणि तोंड म्हणते धाव ! धाव !

लोक धावतात पण मरण चुकलंय् ? छे ! उलट आलेल्या लोकांना ती जीभ बाहेर काढून वेडावत म्हणते "धावलात ना ? 'मी म्हणायचं नि जगानं धावायचं' हेच तर आतापर्यंत घडलं !" अजून आहे अंग गरम, आणि शरीरही नरम ! तेव्हा बहुधा नुक्तीच झालीय थंड नि याचे डोळे पंढ.

"कां रे बाबा ! अरे बरी होती की रे ! नि तू साहेबाच्या तोंडावर थुंकलास नि त्याने तुझ्या बुडावर लाथ मारली तेव्हा हिनेच तुला पोसला !"

नि छोटी दोन पोरं गोंडस गोजिरवाणी. हो त्यातलंच अेक दुपारी गेलं ! कायमचं राहायला मामाकडे कारण तो निपुत्रिक. आणि यालाही द्यायचं होतं काकाकडे. अपुऱ्या पगारात मी तरी किती करणार ? तुम्ही नाही काही करणार नि कोपऱ्यात बसून असेच झुरणार.

तो नाही त्याचा बाप चूक कबूल करील.
तो पाया पडत माझ्याकडे येअील म्हणेल.
मिस्टर, मी तुम्हांला लाथ मारली पण सॉरी म्हटलं नव्हतं ! ते अेवढं मनावर घ्यायचं नव्हतं.

फार तर घ्यायची लीव्ह् बीव्ह्. पण राजीनामा म्हणजे अतीच नाही कां ? पण तो हे– सुद्धा नव्हता म्हणला तो म्हणाला, "गुंड रिडन्स ! ऑफिस जरा स्वच्छ होअील".

मग जग कां बरं अस्वच्छ ? पण लोकांचे कानच तीक्ष्ण. नि अशा गोष्टीला वेळ लागू देऊ नये असं वृद्ध लोकांनी म्हणून ठेवलेलं.

"अरे बापरे पोलीस पळा पळा ! नाहीतर हातात बेड्यांच्या माळा !" दोरी, फास, आत्महत्येचा विचार मेंदूवर परिणाम. काळ्या कोटाचा वकील नि काळारोम मॅजिस्ट्रेट.

"साहेब ! आरोपीने पत्नीचा खून करून नंतर आत्महत्या करायचे ठरवले असावे !"

बरं झालं असतं, तेवढाच अेक खटला कमी, पेपरला बातमीही कमी नि वकिलाला फी ही.

"साहेब ! गुरुत्वाकर्षणाविरुद्ध. "

"तुम्ही बोलू नका हो ! यांना पोचवा मेंटलला !"

"बरं वकील साहेब, यांच्या जागेचं काय झालं ? आमचा मेव्हणा यायचाय बदलून त्याला होअील".

"आमच्या जावयासाठी ती आम्ही आधीच घेतली साहेब खून झालेल्या जागेत जावअी राहाणार का तुमचा ?"

"हो ! शांती करून घेतोय परवा !"
"अरे, यांना घाला गाडीत !"
यांना घाला गाडीत, गाडीत घाला यांना
शून्याकडून अनंताकडे बसला मारीत ताना
हे तुमचे बाबा !
नमस्कार करा त्यांना
अेके काळी हुशार होते.
दाढीवर जाऊ नका पण फार मानी होते. म्हणून सांगतो आपल्या परिस्थितीत मान खाली घालून वागावे. अरे अरे ! रडला बिचारा.

मग त्याने काय करावे ? वाढलेल्या दाढीस खाजवत खाली मान घालून जगणाऱ्यांवर थुंकावे ? की शून्याचा अनंताशी मेळ घालून जगायची खटपट करणाऱ्यांना हसावे ?

चला वेळ संपली. बाबांना नमस्कार करा ! काही त्रास ? काही हवंय !
कामातून गेला बिचारा !
त्याला कशाला विचारा !
दहाची बस सुटली तर साडे अकरापर्यंत नाही बस, साडे नअू वाजलेत चला लौकर, काका आज बागेत पिअू या रस !
अेक शून्य दोन शून्ये. दरवाजाचे गज
डोक्यात घालून काढा मगज.
माझी पोरे, माझी पोरे
कशाला वाढता; कशाला जगता !
पुढे होणार नको रे !
यांचा बाप वेडा खुनी
आई कै. सौ. अमूक रे !
यांना संभाळले ते संभाळले
आता काही नको रे !
माझ्या पोरांनो तुम्हाला नाही कळायचं गणित.
शून्यात अनंत मिसळून जगाचं होतं भरीत.

अनुक्रमणिका

हे असंच चालणार, असंच जग फिरणार !

दर महिन्यात अेकदा तुम्ही मला भेटणार कशाला ?

नि मला नमस्कार करणार नि बाबा म्हणणार कशाला ?

शून्याला शून्याने गुणले तर खाली काय उरणार पोरांनो ! तुम्ही बापाच्या मरणानेच रे जगणार. देवा असशील तिथे असशील तिथून मला पंचत्वात विलीन कर !

मेला ! साली काय ताकत, गज वाकवले नि चौथ्या मजल्यावरून उडी मारली या वेडयाचं काही सांगता येत नाही.

डॉक्टर, तुम्ही या हॉस्पिटलात...

डॉक्टर ! तुमच्या पंचवीस वर्षांच्या कारकीर्दीत सांगण्यासारखे प्रसंग बरेच असतील, नाही ?

थँक्स फॉर द अिंटरव्ह्यू डॉक्टर !

नि फोटोही छापतो.

गुडबाय !

तरी शेवटी मूळ प्रश्न अनुत्तरितच.

अनंत आणि शून्याचे नाते काय ?

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

प्रतिकार / योगेन्द्र मेश्राम

अमृत बाजूच्या अंधाऱ्या खोलीत एकटाच.. अडगळीत पडलेल्या जुन्या संदोकातील बापाच्या पुस्तक-पोथ्या मघापासून तो सारखा उल्टत पाल्टत इकडे तिकडे करत काहीतरी धुंडाळत असतो. पण त्या जीर्ण झालेल्या वह्या-पोथ्या-ग्रंथ पाहात असताना त्याला हवं ते नेमकं विसरून बापाचीच आठवण ऊरभर दाटून येते. अगोदर आठवलेलं पुन्हा पुन्हा तो आठवून पाहातो, पण निसटून जाते. त्याला काय आठवलं होतं हेच नेमकं आठवत नाही; जशी मेंदूवर परतीवर परत चढलेली. कशाचं काय काही गवसत नाही. मनात बापाचीच आठवण जोर धरते. दुःखाने संतापाने छाती खदखद भरून येते.. .पोथ्यापुस्तके तशीच अगराबगर ठेवून तो बाहेर व्हरांड्यात येतो.'

वहिनी रंज काढून लेकरांवरं बोलत असते– "आता काय माझे हातपाय तोडून रांधून दिऊ ?"

"आमी नाइ, आमाले भूक लागली न वो, देनं वो माय"– भूकेचा आसारी मोठा मन्या पोटाला हात लावून बोंबलतो.

"चने भुजून दे." वैनी. "हो दे—" तानी,

"आरे आरे देवा, ओयरन भर जवारी-लाकोरी घरात नाइ तं चणे कोठून येतील बाप्यायनो !" ती मग स्वतःशीच तळतळू लागते–

'पोरावारायचे हाल वगून होत नाय रे देवा ! आरे आरे, दुस्मनायनं होत्या जिनगानीचा सत्या-नास केला. होत्याचं नोहतं केलं न् भिकीचे ढोवरं लावले. .माजे वेटे नासीक ! तसेच सडोत रोगानं. मुर्न्हाह्याची मुराभाजी निसंतान होवो ! मायकोरीवाणी ·मुरोत पन वाहाडो नोकोत ! रिटाचा दिवा नोको राय !' आता रडू लागलेल्या पोरांना समजावत ती म्हणते– "ठयरा लेकरानू, तुमचा बाप येईल येवढ्यात, येतच असल. आणलन् तशी करून दिन. आता घडी-भर ढिवसा धरा. जा खेळून या."

पण पोरं कसचे आयकतात– "नाय नाय, आमाले काईबी खावाले दे— पन दे. आता देऽ," म्हणत वैनी, तानी व लहान्या जोरजोराने रडू कलकलू लागतात. आता लेकरायचा हा रडा कळवळा तिच्यानं पाहून होत नाही, "काय डोक्स कपाळ फोडू तुमच्यापायी !" ती बडबडतच आता लहान्याला कडेवर घेते. "चला आक्सूच्या घरी. काई असल त् मांगून देतो." मग ती सासूला उद्देशून बोलत बोलत जाते— 'हे माय मार्जीतं सव्तः चुटराले जाते. लंगलंग..इकड् जाईल. तिकड् जाईल. पन एक्या लेकराले नेईल तं—? नाव नोको ! ' वहिनी वैताग काढत निघून जाते. जन्या-मन्या, तानीगिनी सर्व तिच्यामांगं कोकलत जातात.

अमृत बघत असतो,...घरात भुकेचा हा हरदमचा कंगाळा ! त्याला अत्यंत वाईट लागते. बापाच्या आठवणीतून 'ज्वाला'च्या लाव्हाप्रमाणे उफाळून आलेले दुःख आता त्याच्या गडद निराशेच्या वैतागवाण्यात विरून जाते. आता आत ढगाळ ढगाळ. .पण कोरड्या आभाळासारखा तो भन्नाट, भकासलेला सुन्न-उदास. त्याला काही सुचत नाही. मोंदरेजल्या अंगानं व्हरांड्यात बाजूची भिंतीची खाट गलंडून तो आंग टाकतो. खिन-भरानंच आणखी उठतो. भिंतीच्या आलमारी-वजा कोनाड्यातून आपले एक पुस्तक काढतो. चाळतो. लक्षच लागत नाही. उगाच भरभर पानं पलटवतो. त्यात एक अंतर्देशीय आढळते. वाचलेले असते–पुन्हा वाचतो. मजकूर ताजात-वाना होतो. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव अदलत-बदलत जातात. मग तो त्या पत्रास काळजी-पूर्वक तिथेच ठेवून पुस्तक परत अल्मारीच्या कोनाड्यात ठेवून देतो. अन् हाताच्या कोपरावर मान ठेवून तो एका कडेवर खाटेवर कलंडतो. ..आता त्याच्या सुन्न-भकास अंतःकरणाच्या

वाळवंटात कसलातरी भलताच गहन विचार वावटळ होऊन उठतो. तो रन रन उन्हाळू लागतो. कणा कणाने.

आणि पुढून माय येता दिसते, तोंडात काही चापलत चापलत. इकडे तिकडे पाहात घरात जाते. मडक्यातलं लोटयानं घटाघटा पाणी घेते. इकडे तिकडे डोकावून पाहाते. घरात कोणीच दिसत नाही. सपरीच्या थडीवर येऊन कपाळावर हात देऊन बसते. ..चेहऱ्यावर चिंतगा. झुर्‍या. डोळे खोल गेलेले. गालाची हाडं निघालेली. वाळलेल्या काडीसारखे हात. पालवीची माया सरल्यामुळे ती खर्राटाच झालेली...फारशी लेकराशी – कुणाशीच बोलत नाही. तिचं हासणं बोलणंच सरलेलं. काहीबाही पुटपुटत राहाते. नाहीतर तोंडातला पुटपुटा रडयात बदलून ती सदान्कदा वितलेल्या दुःखाचं गाणं गात राहाते. आताही ती रडू काहाडते का काय. .पण येवढया-तच सामोरून मन्या, बैनीगिनी धावत येतात.

'वुढीमाय' तू कोठं गेल्तीसवं सकाळीसनं ? काय 'जिवन' आन्लीस तं देनं वो आमाले.. दाकव दाकव तुजा वटा. वटयात ठिवून राकते आजी आमासाटी ! मले दे. मले दे...!' पोरं तिच्या पदरात हात घालून चाचपून पाहतात. एकमेक ओढझिक्कार करतात. त्यामुळे तिचं जुनेरं तणावून त्याला भोगदाडच पडते....मुटमूट पाहात असलेली माय आता पदर झाकत पोराइवर कालवतच उठते. "चला सोवरानो, मढं गेलं तुमचं. चाला, आता माजं मढं चारतो— माजसंगं !" म्हणून माय परत घराबाहेर पडते. तिचा हात-पदर धरून पोरंपण तिच्यासंग जाऊ लागतात.

लंगलंग लेहळच्या गाईवाणी हिंडतच राहाते. चिंचात. बोरीत, नाहीतर खेतावर. वहुधा तिकडेच. तुरी-लाखाच्या सेंगा आणण्यासाठी कोणी तोडू दिल्या तर. नाही दिल्या तर परभारे आपल्याच तुकडयाच्या धुऱ्यावर जाऊन टकटका बसून उगी रडत भुकत राहाते....

पाठमोऱ्या मायकडे बघता—विचार करता करताच त्याला दुसरेच काहीतरी आठवल्यासारखे होते. परत मनात मघाचा तो कुंद उकाळा पेटतो. खडखद डांबरासारखा. भाजणारा वैताग-संताप.. तो खाटीवरून उठून आठवणीसरशी लगेच त्या आपल्या खोलीत जातो अंधाऱ्या. त्याच संदो-काच्या आतल्या एका आडव्या कप्प्यातून एका मोठ्या लाल रुमालात गुंडाळून असलेली काही 'चीज' बाहेर काढतो. चाचपून बघतो. पुन्हा ठेवतो. पुन्हा उभा काही विचार करत. मनाशी काही ठरवतो. मग ती लाल रुमालाची गठळी परत संदोकाच्या आतल्या कप्प्यात जपून ठेवतो. आणि बाहेर येतो.

आता वहिनी मजला जनार्दन व लहान्यास घेऊन आतोच्या घरून आलेली असते. पोरं अशातशावर राहून भूक मरून गेल्यामुळे आता विरल्यासारखी शांत मलूल दिसतात. जेवणाची वेळ टळून गेलेली. मामाकडून 'पोटगा' आणायला गेलेला दादा अजूनपावेतो गावाकडून आलेला नसतो. आता दुपार कलंडलेली. ती नवऱ्याची एकसारखी वाट पाहात असते.

काय करायचं-काय नाही, त्याला काही सुचत नाही. वस्तीतही असं कोणी नसतं जीव करमायला. सगळे कुठे ना कुठे कामावर गेलेले. घरात तेच ते. मनात सारखा विचार. त्याला कंटाळवाणं होते. तो अंगात पायजाम्यावर कुर्ता घालून घराबाहेर पडतो.

वेटाळाच्या तिकडयावर गेल्यावर डावीकडे वळतो. उदमीपुऱ्यातून बाहेर जातो. गावाबाहेर वाडयाच्या दिवारी पल्याड चिंचबनात पोरांना घेऊन माय दिसते. मन्या दगड-गोटे-झोडपे फेकत असतो, न् माय वटयात जमा करत मचामच चिंचा खात. बैनी-तानी एका चिंचेवर दोघी झडपून एकमेकीवर किचावतात. मग आजीच्या मांगं रूंगरूंगा लावतात....मायला खायखायरी सुटल्याली. तिची बूदच फिरलीये. .काय करल, लय दुःख सोसलन् बिचारीनं. पोटच्या तीन चार गडदा भरल्यान् न् शेवटचा डोंगरही पडला, जीवाचा आसरा. आनं तिचं डोस्कंच फिरलं. काय करल..

अरेपण त्या 'दुतोंडया' वाल्या खोताच्या चिंचबनात ही कशाला आलीये मरायला– लेकरं-वाळं घेऊन ? तो तिला घरी जा म्हणून

सांगायला तिकडे वळतो. पण तिचं आधीच लक्ष पडून पोरगं रागेजल म्हणून ती अवाटीच्या रस्त्याला लागते. खातखातच. पोरांना देत. पोरं पिकल्या भोरडेल्या गारा तिच्यामांगं रुंगून मागतच असतात.

अमृत पुढे चालू लागतो. थोड्याने वळून बघतो.. पण माय अमृतचा डोळ चुकवून–पोरांना घेऊन गावात न जाता पल्याडच्या हिरव्याहिरव्या शेत-मळयाकडे जात असते. हे एखाद् दिवशी गावात आणल तितुंधा आंगावर. तिचं लक्षणच बिघडलं. भलतीच बह्याळावाणी वागते. कायले दुसऱ्याच्या धुऱ्यावर जावा? आधीच गावचं वातावरण रोगेलं. आपली ओसाली सहन होत नाही तिथे. जाऊ दे. मरू दे...हं!

अमृत खालच्या मानेनं जात असतो. मागून कोरकोर कोंबड्यांचा आवाज येतो. दहापाच जन त्यात भोयराचा भोजू पहिलवान आपलं तुर्रेबाज कोंबडं घेऊन त्याच्या पांखा पसारत– घाईघाईने निघून जातात. तो रस्त्याच्या बाजूच्या टेकाडावर येऊन मान उचलून बघतो. बांधाच्या अल्याड वडाच्या पाराखाली लोक घेर करून जमलेले, सटीच्या हाटाच्या जागी.. .कोऽर-टोऽर आवाज. कोंबडबजार का काय आज. .कोंबड्यांची झुंज असल. .तो जागीच रेंगाळत पाहात उभा.

झुण झुण-झुण... एक चाफेची खाचर-गाडी वाहेरून गावाकडे येता दिसते. जवळ येते. खाचऱ्या नवखाच कोणी. ओलांडून जाते. आत पाठीमागं एक हिरवीकच साडी ल्यालेली तरुणी बसलेली. तो पहातो. ती सुद्धा...अमृतकडे डोकावून डोकावून डोळे विस्फारून पाहाते. ओळखते. हात करून हंसते. तिच्या संत्र्याच्या फाकीसारख्या कोवळयालाल ओठातले सुंदर स्मित बघून तो आनंदतो.. गाडी डोळ्यांआड होते.

गावच्याच वातुरामच्या वडल्या भावाची– तुकाराम खोताची ती लिली. वातू खोत खऊट व जेवढा कारवाईखोर होता तेवढाच तुकाराम सीधा साधा सरळ मनाचा सज्जन माणूस होता. लिलीपण बापासारखी. पुन्हा शिक्षणाचे संस्कार. पण एक वर्षांत ती किती बदलली, रंगारुपानं. संवयीनं. पूर्ण शहरी. 'सीटी अँड्स ब्युटी' म्हणतात त्याप्रमाणे ती आणखीन सुंदर होऊन आलीये. पिवळी झण्ण! ओळखू येत नाही एकदम. थोराड पण झाली. हं, पोटूशी होऊन आली असावी इतक्या लवकर? .खवरं पीक!

दोघंही मिळून शिकलेली. लहानपणा-पासून. कॉलेजातसुद्धा ती त्याच्या बरोबर होती. तो हुशार देखणा तरतरा. सावरग्या गव्हाळ रंगाचा.. .समजू लागल्यापासून ती त्याच्यावर मरायची, इतकी की तिचे चालले असते तर त्याला घेऊनच पळाली असती. सेकंड इअरला असतानाच तिचे कुठे जुळल्याचे समजले. ती लवकरच कॉलेजला. त्याला सोडून जाणार होती. त्याला सोडून जाण्याच्या कल्पनेने खूप नाराज झाली होती.. निरोप घेण्याच्या आदल्या दिवशी कॉलेज लायब्ररीच्या मागील बगीच्यात संध्याकाळच्या निवांत वेळी तो एकांती आडोशाला बसून अभ्यास करीत असताना तिने त्याला गाठले. आणि पाठीमागून येऊन एकदम मिठीच मारली. पण तो चटकन् सोडवून भीतीने बाजूला सरला. उभा. इकडे तिकडे पाहिले. आता अंधारत होते.

"तू बुद्धू आहेस, डरपोक आहेस!"

"हं."

"कारे, तू नेहमी असा दबल्यासारखा, बुजऱ्यासारखा का राहतोस– वागतोस?"

"नाही तर...काही नाही, हं .असाच लिली, तुला ठाऊक आहे— मी कोण, तू कोण, तू—"

"मी काय, अरे मी ही एवढी. .तुझ्या-साठी... मी कितीवेळा तुला...पण तुझ्या-सारखा तूच.. नो रिस्पॉन्स! मख्ख!" मग ती ओल्या हुरहुरल्या चेहऱ्याने त्याच्याकडे टक लावून पाहात म्हणाली, "अमृत, ए— तू कसा आहेस हे तुला कळतं तर! अरे तू समजतोस तसा तू नाहीयेस."

"लिली, मी कोण–कसा आहे, काय आहे– हे मला अजून कळत नाहीये. एवढं कळतं, की हा जमाना वाईट आहे, छळणारा. भेदभाव मानणारा."

"मी मानत नाही ना ? अं . काय ? अमृत, तुझ्यासाठी की नाही. हे शेवटचं. मी मी तुला—" तिचे ओठ थरथरले. तिने त्याच्या खांद्यावर दोन्ही हात घट्ट ठेवले, आणि पायाच्या टाचा उंचावून.

तोही मग ढळत चळचळत गेला... तिचा कोवळा सुंदर रसरशीत चेहरा आता. भरलेला धुंद ! "अमृत, तू खरेच देखणा पुरुष आहेस, किती चांगला आहेस रे ! " आणि ती अंग ढिले सोडून त्याला बिलगून गेली... सोडलेच नव्हते...

त्याला तिचा तो पहिला सुखस्पर्श वगैरे. सगळं आठवून जाते. तरंगतच जाऊ लागतो, लिली खोताच्या आठवणीत. .खाचराबरोबर .घरापर्यंत. आणि वासुराम खोताची तिच्या चुलत्याची आठवण वीज चमकावी तशी त्याच्या अंतःकरणात गडगडून जाते. क्षणापूर्वी त्याचं फूललेलं गोड मन आता कडू कडू होते. चेहरा आकडतो. तो कोंबडचांची झुंज पहाण्याकरिता वळलेला, पण आता तिकडे न जाता एकीकडे वळतो, गावरानाच्या बोडीकडे.

त्या घटनेपासून तो गेलाच नव्हता. जाऊंस वाटेना. आता नकळत तिकडेच जातो... बोडीच्या खालवनात रानातल्या पडितीतून काढलेला सरकारी एकरभर तुकडा. बापाभावानं रातदिवस खपून त्यास उपजाऊ केलेला. यंदा धानाची पुंजकीही पडली होती. तिच्या जागलीला बाप रात्री खेतावर जाऊन झोपायचा.. एके राती मोठा हाःहाकार झाला. तो पहाटेला जळून तन्नाचाभण्णा होऊन राहिला. आणि होती नव्हती धानाची पुंजकीपण जळून खाक... सत्यानाश !

मग रिपट झपट. .पंचनामा झाला. पण काही उपयोग झाला नाही. खळयाच्या बांधीतली पडवी... जळालेल्या बास बल्ल्या... काळसेल्या अजूनही काही आडव्या तिडव्या रूंडक्या होऊन पडल्या होत्या.... हालोहाल बापाला कुटिल दुष्टांनी गळा दाबून मारला न् मग तणस व सारीच्या सारी पुंजकी धडकवून त्यात त्याला जिवंत जाळला होता.

आता त्याला—तो सकाळी काय ढुंढत होता, याची लख्खण् आठवण होते. त्याला बापाच्या पोथीत असला तर जादूचा 'मंतर' हवा होता. .हो, आता जाणून जादूचा चेळा फेकावयाचा होता.

वातुराम खोताला रक्तपितीचा रोग झाला होता. तो बापानं जादू करून पेशला म्हणे. खोताच्या मनात असा संशय धडकत होता. बापानं कधी कुणाचं वाईट केलं नव्हतं. तो गावात जळीमुळीची दवादारू करत असे. सुजल्याखुपल्यावर इलाज करून सुधरवीत असे. 'मोहोतरेपणा' करी. गावोगावला लोक त्याला लग्न लावायलाही नेत. तिथे तिथे समाजजागृतीच्या व संसारिक ग्यानाध्यानाच्या गोष्टी तो सांगायचा. सुधरवायचा. पण. वरं करा तिथे ब्रह्महत्या !

अमृतला बापाला पुन्हा पहायलाच मिळाले नव्हते. तो तार गेली तसा दुःखाने हादरून नागपूरहून रातोरात गावास गेला. पण दहनाला बापाचा देहच उरला नव्हता. तो मरणाशिवाय आधीच मेला होता. ..असा खाक झालेला हाडाचा सांगाडा पहात तो खळयावर दोन दिवस रडत राहिला होता. समोरील जळत्या बल्ल्याफाटचाचा पेट त्याच्या डोळयांतही धडकू लागलेला. सूडाच्या ज्वाळा. .मध्ये एकदोन वेळा तो शहरास–गेला–आला. पण तो शिकायला म्हणून काही गेला नाही. लक्षच लागेना. त्याचं हे फायनलचं वर्ष होतं. पण आता अभ्यासातून परीक्षेतून मनच उडालेलं..भन्नाट !

त्या घटनेला दीड दोन महिने होत आले, पण तो शांत होण्याऐवजी उकळतच राहिला.. सूड-सूड. .बापाचा उट्टा काढायचाच ! .त्याने ठरविले होते. तो प्रयत्न म्हणूनच तो शहराला गेला होता. एका बंगाली मित्राला जाऊन भेटला. मित्राने एक नामी पण भयंकर अस्त्रउपाय सुचविला होता. प्रयोगासाठी त्याच्याजवळ दिलाही होता. प्रथम

अमृत भयचकित झाला. 'आपली हिंमत होणार नाही, तू स्वतः येऊन प्रयोग कर' म्हणाला होता. हप्त्यापूर्वी मित्राचे-येणार म्हणून पत्रही आले होते. आणि इकडे याच्या मनात गोंधळ सुरू झाला होता.

"अंधश्रद्धा! भूतबाधा, जादूटोणा, नवस व्रत. जोखाई-सटवाई मरीमाई. त्यांच्यापुढं माणूस काही नाही. एक बळी! त्यांचा कोप झाला तर सर्वनाश! किंवा संकट, रोगबिमारी, दुष्काळ, जरामरण-व्याधी, आदी. 'शनी'ची 'साडेसाती' तर माणसाला उठूच देत नाही म्हणे. 'करणी'–जादू टोण्यानं म्हणे माणसाला रोग होतो आणि त्यानं व 'बाबां'च्या सिद्धीनं रोग बराही होतो. सिद्धीस आलेल्या साधुबाबांच्या कृपाप्रसादाने तर इस्करोग, नसंतान-रोग, आंगरोग वगैरे सगळे रोग-भोग 'स्पर्श' होताच पळून जातात म्हणे! तर मग ह्या डॉक्टर दवाखान्यांची, आरोग्य-विज्ञान शास्त्राची-शोधाची मानवाला गरज तरी काय आहे? हा वेडाचार हे सारं खूळ माणसात कोणी शिरवलं–कोणी? त्याला साफ आंधळं करून ठेवलं, ते कोणी? हा समाज सारा डंवरला–नासलाय!"

या अवडंबरानं. अंधश्रद्धेनंच बापाचा बळी घेतला.

रक्त-घाम गाळून पिकवलेलं, तोंडाशी आलेलं सगळं अनाजधान्य दुष्टनिष्ठुरांनी जाळून खाक केलं न् घरात अवदशेला धाडलं....आईची वेडी दशा. वहिनी-भावाचे. त्यांच्या लहान लहान पोरांचे भुकीने मचलेले हाल..

नाही नाही, त्या अघोर आंधळयांना धडा द्यायलाच पाहिजे! हा अत्याचार कुठवर साहायचा? कुठवर. शेपटी घालून–नामर्द बनून राहायचं?

'तसं राहायचं नाही, पण. विचार करता करताच त्याचे मन मग सुलटे फिरू लागलेले, पण धडा आंधळयांना, की त्यांना आंधळे करणाऱ्याला शिक्षा? सूड कुणाचा? पुन्हा तो दुष्ट रोगानं सडत-मरत आहे. त्याचा तो त्याला दुसरं काय मारायचं? मारून. आता बाप फिरून येणाराय का? सूडाचा अस्त्र शस्त्राचा शेवटी उपयोग काय? त्यांचा उपयोग निव्वळ नाशासाठी की नाश वाचविण्यासाठी. प्रतिकारासाठी? अन्यायाचा, अत्याचाराचा प्रतिकार!

आपल्याला आपलं शिक्षण पुरं करायचंय, पुढं शिकायचं. त्याने अगोदर समर्थ व्हायचं, झाल्याशिवाय—

जळलेल्या अन्न धान्याची पसरलेली राख; लाकूडफाटयांचे काळशेले थोटक; काळीठिक्कर जमीन...हे सगळं पाहात आणि राखेत राख मिसळून मातीत मिळालेल्या जन्मदात्याची आठवण करीत अमृत कितीतरी वेळचा अंतर्दुःखी होऊन धुऱ्यावर बसलेला असतो.. .दिवस बुडतीला येतो तेव्हा तो उठतो.

रस्त्याने काहीजण झुंजीमध्ये कोंबळे जिंकून व काही हारून आलेले आता घराकडे जात असतात. कान्हू चांभाराचा लढाईत 'परख्यात' कर्न्हाट कोंबडा कातीचा ऐन छातीत मार खाऊन आता तो भोज वस्तादच्या हाती थरथरत असतो, मरायसाठी! पाहून अमृतला कसेसेंच वाटते. तो मनात चुकचुकत जातो.

आता माशीअंधार पडत चाललेला. अमृत वेशीत शिरतो. दुरूनच त्याला कुठेतरी पोरामाणसांचा गोहळ मचल्याचा आवाज ऐकू येतो, खोतपुऱ्याकडे तो थबकत जातो. उदमी-पुऱ्यातले काही माणसं. .पोरं त्याच्याकडे विचित्र तऱ्हेने पाहात पाहात तिकडेच धावत जातात. पण त्याचं लक्ष आता कुठेच नसते.... रात्री सर्वांनी मिळून तुरीच्या शेंगा न् मोव्हा उकळून खाल्ल्या होत्या. तेव्हापासून ..त्याच्या पोटात आता भूक पेटून उठली होती. म्हणून आपल्यात.. दिवसभर भुकेजून असलेल्या पोरांकडे, भाऊ पोटगा घेऊन आला की नाही–याकडे आता त्याचं सारं अवधान गेलेलं....

तो आपल्या वेटाळात शिरतो. म्हतारे-कोतारे व दामा, सोमा-नाना वगैरे इकडे तिकडे तवल तवल करत त्याच्याकडे न बोलताच भयभीत नजरेने पाहू लागतात. त्याचा मतलब अमृतला

काही उमजतं नाही. पण काहीवाही आशंकांनी त्याचे मन भरू लागते. घरापाशी येतो... एवढ्यातच सामोरच्या गल्लीतून जना, बैनी तानी दमादाटत धावत धावत जवळ येतात. त्याचा हात धरून घाईत घायबरल्या सुरात मन्या व बुढीमायच्याबद्दल घडलेलं सांगतात, इपरीतच— 'काका-काका, चाल-चाल लौकर. आगुदर'—

ऐकून अमृत पार तडकतो. पण तो तिकडे न जाता घरात जातो, त्या खोलीत. संदोकातील ती लाल रुमालाची फुगीर गठळी काढून पायजम्याच्या खिशात घालतो. आणि तत्क्षणी लाही लाही करत अगीनवारा होऊन तो पळतच जातो. मागोमाग दामा-सोमा-गिमा पण धावत जातात.

विरानीपासून जीवाचा तमाशा चालवलाये. वातुरामच्या वाड्याच्या पुढील चावडीसामोर काही माणसं व खोंडी पोरं जमा झालेली. दोन्ही बाजूला घेर करून उभी. रस्त्याच्या मधोमध एक गाढव. आणि त्या गाढवावर बुढीमाय. गध्याच्या पोटाला धरून तिच्या तंगड्या बांधून बसविलेली. तिच्या पाठीमागं वडल्या मन्यालाही आवळून बांधलेलं त्याला तिला वंगण गेरू व हांडीची 'मस' वगैरे लावून बेरूप केलेलं. ओळखू येत नव्हती. तिच्या छातीवरून लुगडं पण दूर केलेलं. चोळी टरकवलेली. तिला अशी हीन-दीन-कुरूप विद्रूप करण्यात आलेले.

मघापासून शिव्या-सराप देत असलेली.. ओरडत किंचाळत असलेली बुढी आता जिरून विरून लुस्त होऊन असलेली. घायवरून सूधबुद हारपून गेल्यासारखी. बेसुध. डोळ्यांची निस्ती मूटमूट टक. मागं-पुढं. झापत. नातवाचीही तीच गत. त्याला मागून गुड्घ्याचे रट्टे देऊन चूप केलेले.. त्या अकरावारा वरसाच्या लेकूरबुध पोराला असोस असा मार खाऊन सुद्धा ओरडता रडताही येत नव्हते.

दोघातिघा झणाच्या हाती जळते टेंभे. मागं-पुढं.. दोन्ही वाजूला आपापल्या अंगणात उभे राहून पोरं बायका माणसं ती 'गमतीची पंढरी' दिवाळीसारखी साजरी करत-पाहात होती. पाहून हंसत-खिदळत-मस्करत होती.

'हां, आता जमली.. चाला-चालारे आता. अबे रस्ता सोडानं बे पोराहू ? चला हटा ! चल, धोंड्या-पांड्या, अबे पायता काय, हाकला-न गांडीकून ? बोला, जय भवानी ! जय जय भवानी ! जय.

अन् तेवढ्यात तुका खोताची लीला हा प्रकार लक्षात येताच तिथे आलेली, चिडत-कलकलाट करतच. "काय चालवलंय तुम्ही लोकानं हे ? काही लाजशरम. छी; छीः छीः, सोडा-सोडा तिला ?"

"काव्हून सोडा, असं कसं सोडाचं ? ह्या धेडनी बुढीनं आमच्या खेतातून वटाभर सेंगा चोरून आन्न्यान् तं— ?" एक.

"आन् वरतून शिव्यागाळीपन कस्या कस्या देते. सिदरं पडल अशा. मंते इच्या त्या जादुखोर बुढचाले आमी लोकायनं जारलं मारलं. आमावर ह्या अपजार आण्ते. उद्या सरकारात ठावं झालं तं जेहेल कोनाले व्हईल सांगा." दुसरा.

"मग पुन्हा असा अघोरी प्रकार करून तुम्ही गुन्ह्यापासून वाचणार म्हणता काय ?"— लिलीने खडसावले.

"ते पुढचं पुढं वगून घिऊ. धाकटं मालीक असल्यावर... सारा गावलोक जाण्ते का त्या बुढचाच्या 'करणी'नं मारल्या पल्लं ते. त्यायचा जीव का लागत असन् !"

"आन् ह्या खेडूची करणी तं तुमीनं पायलीच नाइ बाईसायेव,. पापस्टीची !"

."असं काय केलं हिनं ?"

"इचारा तिलेच.. आवं अज इनं आम. लोकाची इहीर बाटवली. इहीरीवर चढूनशानी सोताहाच्या हातानं आमच्याच गुंड बाल्टीतलं पाणी पेली. पोरान्ले देल्लं. या मन्याले इचारा. काबे, खरा बोल. नायतं मूत रे त्येच्या तोंडात !"

"काय तुम्ही लोक, छी–छी–छी ! तुम्ही माणसं आहा का हैवान ?"

"तरीबी तुमी आमालेच बोलता ? इनं यवढा मोठा गुना करून– पाप करून सुदा?"

"म्हय बाईसाव, ह्या खरा हाये. अजकाल मांग म्हारं अस्मानात चढलं हायीत. अस्सी धिंड काहाडून त्यायची खोंय जिरवल्याविगर ते बदाचें नाय."

"वारे वा शहाणा, म्हणे हा गुन्हा ! तहान लागल्यावर माणसानं विहिरीचं पाणी पिणं हा गुन्हा होतो काय, पाप होते ? अरे मूर्खांनो, हे लोक काय माणसं नाहीयेत तुम्हा आम्हासारखी ? ढोरडुकरंसुद्धा पाणी येऊन पितात तुमच्या तळ्या-विहिरीचं. ते चालतात. कारण तेच तुमचे साथी. . गावंढळानो, तुम्हाला काहीच कशी लाज वाटत नाही ? तुमच्या माय बहिणीची कोणी अशी इज्जत आब्रू खराब केली तर तुम्हाला काय वाटेल ? . . काही शहाणपण धरा. सोडा-सोडा विचारीला ?"

पण त्या लोकांच्या डोक्स्यात पक्कं भूत चढलेलं. ऐकेनात. 'जय भवानी – जय भवानी !' करत त्यांनी आता थयथयाट करून एकच गलका सुरू केलेला. पाहून आता लिलीचा राग अनावर होतो—'शैतान, सोडता का नाही ? ती थरकापत मोठ्यान् ओरडते. आणि मग गर्दीला हटवत ती त्या बुढीमायला मोकळे करण्यासाठी जवळ जाऊ लागते.

.एवढ्यातच अमृत धावतच येतो, गर्दीला चिरत. मध्यभागी. त्याचा 'अवतार' बघून काही लहानगी पोरं घाबरून पळतात. पण त्याला आलेला पाहून अधिकच उमसाळलेल्या तरुण पोरांची व मस्तेजल्या माणसांची झुंड त्याचा खुर्दा पाडण्यासाठी अंगावर सरसावू लागते. आणि त्याचवेळी तो जागच्या जागी वेगवान होऊन तरवार फेरल्याप्रमाणे हवेत हात विहरतो व तत्क्षणी—'पाजी माणसांनो, पहा—आता ही जादूऽ— जादू पहाऽ रेऽऽ—' म्हणत भिरकावतो. धडाड्... मोठ्ठा आवाज होतो. स्फोटच ! आणि झुंडीतले काही खोंड पोरं माणसं सापडून जमीनीवर आडवे पडून जागच्या जागी विदरताना दिसतात.. .पुन्हा दुसरा तसाच आवाज. ! कुणाला काहीच सुधरत नाही.. वाचलेले व पुनः स्फोटात न सापडलेले सर्व आता पळून जातात पडत उठत भयाने भांबावून ते व इतरही तेवढ्या घराघरातले लोक आता गावाबाहेर पळून जातात, पहाता-पहाता. आता तिसरा एक हात परत उंचावून हवेत फिरतो. त्याचे 'लक्ष्य' समोरील वाड्याची माडी असते.... आणि फेकतो... तसाच मोठा स्फोट. झारच होतो. पण..

पण क्षणापूर्वीच्याच डोळ्यांपुढील त्या रौद्र-दृष्याने तो हात करुण झालेला. दुःख पाहून डगमगलेला. भीतीनेही काहीसा विचकलेला—दचकलेला. उद्या सकाळी किंवा रात्रीलाच येणार असलेली पोलीसाची गाडी त्याच्या या कृत्याचे 'पारितोषिक' म्हणून त्याला नेणार असेल. कदाचित त्याला कायमचे तडीपारही ती पोचविणार असेल त्याच्या जीवनाचेच 'स्वागत' उद्या व्हावयाचे असेल ... होईल ! आणि हे कल्पनाचित्र त्याच्या डोळ्यांपुढे . . .

'गोळा' त्या माडीच्या ठिकरीवर न पडता तो अलीकडे समोर आवारात अंगणात जाऊन पडलेला असतो. कारण लिलीने पावसाच्या दळदळ सरीसारखी येऊन ऐनवेळी अमृतचा हात अडवलेला असतो. भीतीने ती त्याचा हात आता घट्ट पकडूनच राहते. आणि त्याच्या त्या अचाट 'धाडसाला' मनच्या मनी दाद देत निःशब्द प्रेमाने—दुःखाने भरून भय-विस्मयचकित नजरेने ती त्याच्याकडे बघत पुतळ्यासारखी जागीच उभी असते.

ते आवाजाने बुजाडून पळालेलं गाढव आता शेजारच्या सुन्या घरात माणसाच्या जागी जाऊन विधास आपल्या कर्कश आरोह-अवरोहात सूर लावून गात असते...गाढव !

मन्या व माय मघाच लिलीद्वारे मोकळे झालेले असतात. मन्या अजूनही भेदरल्यासारखा डोळे भिरभिरत उभा असतो, कधी अमृत काकाकडे तर कधी लिलीकडे विचकत बघत.

मायच्या चेहऱ्यावर—ती फुटारल्यासारखी होऊन अमृतकडे पहात असताना गेल्या दीड-दोन महिन्यांपासून आज पहिल्यांदा हसू उमटलेले दिसते. कोण आनंदाने वेडीला तो क्षण युगा-युगाचा वाटतो ! पोराकडे पाहून तिचे हृदय एका समाधानाने अभिमानाने उलसारते. लुकलुक डोळ्यात बिजली पेटू लागते.

आणि अमृतचं अंतःकरण असीम दुःखाने भरून येते.

⊕ ⊕ ⊕

अनुक्रमणिका

संतसाहित्याचा लोकतत्त्वीय अध्ययनदृष्टीने केलेला अभ्यास / प्रदीप भा. विटाळकर

डॉ. रा. चिं. ढेरे हे संतवाङ्मयाचे महाराष्ट्रातील मान्यवर अभ्यासक आहेत. 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य' या ग्रंथात त्यांनी संतसाहित्य आणि लोकसाहित्य यांच्यातील अनुबंध साधार व विस्तृत मांडला आहे. लोकतत्त्वीय अध्ययनदृष्टी लक्षात घेऊन संतसाहित्याचे अंतरंग उलगडून दाखविण्याचा एक आगळा प्रयत्न केला आहे. त्याचे स्वरूप संशोधनात्मक आहे, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. संत-साहित्यावर लेखन करणारे जे उपेक्षित लेखक होते त्यांचा मोठ्या हळुवारपणे ढेऱ्यांनी आढावा घेतला आहे. या ग्रंथाच्या पूर्वार्धात लेखकाने लोकतत्त्वीय अध्ययनदृष्टीबद्दल लिहून तिचे महत्त्व अभ्यासकांपुढे मांडले आहे. हाच दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून लेखकाने प्रस्तुत ग्रंथ आकाराला आणला आहे.

संतसाहित्यातील लोकतत्त्व : 'बुडती हे जन देखवेना डोळा' अशा कळवळ्याने लोकांपर्यंत जाणारे संत आपले भावानुभव व विचारानुभव लोकमाध्यमातून व्यक्त करीत राहिले. संतांनी आपले विचार केवळ देशी भाषांतून मांडण्याचे क्रांतिकारत्व दाखविले, एवढेच नाही तर लोक-संस्कृतीतील विविध संस्था, विविध देवता, विविध कलाक्रीडा यांचा अभ्यास करून व त्यांचे बाह्यांग स्वीकारून अंतरंगात अध्यात्म भरले. संत-साहित्यात हेच लोकतत्त्व व्यापक प्रमाणात आहे. त्यांनी लौकिक छंद वापरले, लोकगीतांचे माध्यम स्वीकारले. लोकसंस्थांची परिभाषा आत्मसात केली, आणि जे सूर ऐकताच लोकांचे कान टवकारले जातात, त्याच सुरात आपला परम आशय भरला. भल्या पहाटे 'धर्म जागवित' येणारा अरुणाचा प्रतिनिधी पांगूळ, सूर्योदयाच्या वेळी अलगूज घुमवून कृष्णाची गीते गाणारा वासुदेव, संबळ वाजवून देवीच्या नावाने गोंधळ घालणारा गोंधळी, डमरूच्या साथीने मुरळीबरोबर खंडोबाचे लीळा-चरित्र गाणारा वाघ्या या सर्व भूमिका संतांनी स्वीकारल्या. ते कधी भांड बनले, बहुरूपी बनले, शाहीरही बनले. अशा नानाविध भूमिकांतून त्यांनी संतसाहित्याची रचना केली. संतांचे विचार ग्रंथप्रामाण्यवादी नसून प्रतीतिप्रामाण्यवादी असल्यामुळे सामान्यातिसामान्य आणि शूद्रातिशूद्र समजल्या जाणाऱ्या जातीजमातींनाही आत्मोन्नतीचे आश्वासन लाभले. संतसाहित्याच्या अध्ययनाची लोकतत्त्वीय दृष्टी वापरून त्याचे अंतरंग दाखविण्याचा हा मराठीतील प्रथम प्रयत्न आहे.

जातिव्यवस्थेवर आघात करणारा ग्रंथ : जन्मजात ब्राह्मण्यावर कठोर आघात करणारा 'वज्रसूची' अथवा 'वज्रसूचिकोपनिषद्' नावाचा एक ग्रंथ इ. स. च्या ९ व्या शतकात लिहिला गेला. त्याचा कर्ता अश्वघोष. नावाप्रमाणे खरोखरच या ग्रंथातील विचारांना वज्राची कठोरता लाभलेली आहे. जीव, देह, जाती, ज्ञान, कर्म वा धार्मिकता यांपैकी कशानेच ब्राह्मणत्व सिद्ध होत नाही तर ते केवळ आत्मसाक्षात्कारानेच सिद्ध होते, हा विचार पद्धतशीरपणे त्यांनी प्रतिपादन केला आहे. 'ब्रह्म जानातीति ब्राह्मणः' या ब्राह्मणाच्या आदर्शवादी व्याख्येशी हा विचार सुसंगत आहे. इतक्या वर्षां-पूर्वीच्या या ग्रंथात परंपरेला तडा देणारे क्रांतिकारक विचार आलेले आहेत हे पाहून नवल वाटते. "जन्मजात श्रेष्ठतेचा भाव हा अज्ञानमूलक आहे आणि म्हणूनच तो दूर करण्यासाठी अज्ञानांध समाजाला ज्ञानाचे नेत्र लाभले पाहिजेत. . खऱ्या ब्राह्मण्याचा संबंध साऱ्या स्थिरचराशी एकात्मता साधणाऱ्या परमानुभूतीशी जोडला. . . खरे ज्ञान म्हणजे आत्मज्ञान होय" हे 'वज्रसूचिकोपनिषदा'चे मुख्य सूत्र आहे. संतांना सामाजिक व्यवहारांचा जाच फारच मोठ्या प्रमाणावर सहन करावा

अनुक्रमणिका

लागला. हा त्रास सहन करूनही त्यांनी श्रेष्ठतेच्या गंडाने पछाडलेल्यांचा द्वेष केला नाही. त्यांनी उभ्या समाजाचे ज्ञानचक्षू उघडण्याचा प्रयत्न केला. ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी खुली केली. संतांच्या या कार्यामुळे जाती मोडल्या नाहीत परंतु विषमतेचा जाच मात्र काहीसा कमी झाला. वज्रसूचीत गुरुबाजीवरही आघात केलेले आहेत. वज्रसूचीने प्रवर्तित केलेला विचार व संतविचार यात बरेच साम्य आढळते. वहिणाबाईंनी वज्रसूचीवर भाष्य केलेले आहे. वज्रसूचीचा अभंगात्मक अनुवादही प्रस्तुत ग्रंथात दिलेला आहे. तसेच आदीनाथ भैरव, महानुभाव संप्रदाय, राममोहन रॉय, सावरकर इत्यादींच्या विचारांवर आढळणाऱ्या वज्रसूचीच्या प्रभावाचा परामर्श पद्धतशीरपणे त्यांनी घेतला आहे. एकंदरीत वैचारिक आंदोलनाला वज्रसूचीचे कसे साहाय्य झाले याचे मार्मिक विवेचन त्यांनी केले आहे.

संतसाहित्य आणि सत्यक्रिया : संत साहित्यातील सत्यक्रियांची ओळख काही निवडक उदाहरणे देऊन लेखकाने करून दिली आहे. सत्यक्रिया म्हणजे सत्य उच्चारून दिलेली परीक्षा. सत्यक्रिया हा एक आकर्षक ठरलेला कल्पनाबंध आहे. त्याची विलक्षणता आणि स्मरणीयता प्रतीत झाल्यामुळे लोकमानसाने पारंपारिक कथनात त्याचा पुनःपुन्हा वापर केला आहे. सत्यक्रिया संतांच्या जीवनातही झगझगीत स्वरूपात पावली आहे. त्यामुळे संतचरित्रे ही सत्यक्रियांची भांडारे आहेत असे लेखकाचे प्रतिपादन आहे.

चोंभाचे उखाहरण चोंभाचे उखाहरण हे २५०० ओव्यांचे कथाकाव्य इतिहास-पुराणांच्या परंपरेतील लोकगाथासरणीचे काव्य आहे. या काव्याचा विषय पुराणातून कवीने घेतला आहे. चोंभाच्या या काव्यात लोकतत्त्वीय प्रकृतीच्या अनेक स्पष्टीकरणकथा आढळतात. लोकवाङमयातही अशा कथा विपुल प्रमाणात आढळतात. ढेऱ्यांनी लोकवाङमयातील कथांशी साम्य असणारी या काव्यातील अनेक स्थळे दाखवून त्यातील सौंदर्य स्पष्ट केले आहे. नागविषयक समजुती, पृथ्वीविषयक धारणा, गुप्तनिधीची श्रद्धा, लंकेत सोन्याचा डोंगर, सापांना पाय नसणे, मोराचा निळा कंठ, शकुन संकल्पना इत्यादी पारंपारिक लोकतत्वीय स्पष्टीकरणकथा या काव्यात देऊन कवीने या काव्याला एक वेगळा दर्जा प्राप्त करून दिला आहे. चोंभाचे हे काव्य म्हणजे आख्यान-काव्याची गंगोत्री आहे, हे लेखकाचे मन अत्यंत चिंतनीय आहे.

गुरुगौरवाचे गूढ : या प्रकरणात लेखकाने गुरुदीक्षेशिवाय परमार्थातले परमरहस्य आकळत नाही या श्रद्धेचा मूलस्रोत शोधण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच 'सगुरा' आणि 'निगुरा' या-विषयीच्या पारमार्थिक भावना त्यांनी शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

गुरुसंस्थेचे क्रांतिकार्य संतांनी गुरु-संस्थेच्या द्वारा क्रांतिकारक कार्य केले आहे. वेदाध्ययनाचा अधिकार नसलेला, ज्ञानप्राप्तीचा अधिकार नसलेला, उपनयनाचा अधिकार नसलेला, अब्राह्मण वर्ग समाजात फार मोठया प्रमाणात होता. मराठी संतांनी गुरुदीक्षेतून जाणारी परमार्थाची वाट शूद्रातिशूद्रांना मोकळी करून दिली. प्राचीन मराठी वाङमयातच नव्हे तर मराठी संतसाहित्यातही उपनयनपात्र जनांसाठी 'चोख' ही संज्ञा वापरलेली आहे आणि उपनयनास अपात्र ठरविलेल्या अतिशूद्रांसाठी 'मैळ' ही संज्ञा वापरलेली आहे. चोख म्हणजे पवित्र आणि मैळ म्हणजे मलिन. चोख हा ब्राह्मणांचा बोध घडविणारा शब्द तर मैळ हा शब्द महार या अर्थाने वापरला जात होता. संतांनी समाजात जे मैळ होते त्यांनाही देव-द्विज-वंद्य बनविण्याची आकांक्षा उराशी बाळगली होती. त्यांच्या या क्रांतिकार्याची उत्कृष्ट फलिते म्हणजे चोखोबांची आणि तुकोबांची जीवने. ज्ञानदेवांनी उपनयनदीक्षेला गुरुदीक्षेचा संप्रदाय-दीक्षेचा बलिष्ठ पर्याय समाजाला दिला आणि अदीक्षित बहुतांनाही ज्ञानाचा मुक्तलाभ व्हावा म्हणून 'मराठीचिये नगरी' ज्ञानाची गवांदी घातली. ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. स्त्री-शूद्रांना संतांनी नवा दिव्य जन्म प्राप्त करून दिला, प्रतिष्ठा प्राप्त करून दिली, याचे मार्मिक चित्रण ढेऱ्यांनी केले आहे.

(पृष्ठ १११ वर पहा)

प्रादेशिकता आणि नागर पार्श्वभूमी / म. पां. कुलकर्णी

काही समीक्षकांनी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे मराठी प्रादेशिक कादंबरीच्या संदर्भात नागर पार्श्वभूमीचा अंतर्भाव प्रादेशिकतेत करावा असा विचार मांडलेला आढळतो. नागर पार्श्वभूमी असलेल्या 'झोपडपट्टी' कादंबऱ्यांच्या नव्या प्रवाहाचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करावा असा हा विचार आहे. 'माहीमची खाडी', 'चक्र', 'वासुनाका', 'हातभट्टी', 'वावर' इत्यादी झोपडपट्टीचे जग रंगविणाऱ्या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने हा विचार पुढे आला.

विशिष्ट भू-प्रदेशाचे किंवा ग्रामाचे तेथे वास्तव्य करणाऱ्या व्यक्ती व लोकजीवनाचे, भूगोल व निसर्ग यांसह सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे सामूहिक रूपाने चित्रण करण्याचे, त्या ठिकाणच्या लोकसमाजाच्या समस्या, चालीरीती, रूढी, परंपरा सणवार व उत्सव, जत्रा व मेळे, अंधश्रद्धा, भूतप्रेत-विषयक कल्पना देवदेवस्की आणि अन्य लोकतत्त्वे इत्यादींचे तसेच नवजागृतीचे, स्थानिक बोलभाषेद्वारे अथवा प्रमाणभाषेद्वारे सामग्र्याने वास्तवपूर्ण चित्रण करण्याचे कार्य प्रादेशिक कादंबरी करते. प्रादेशिक कादंबरीचे हे कार्य लक्षात घेता नगराशी संबंधित अथवा नागर पार्श्वभूमी असणाऱ्या कादंबऱ्यांना 'प्रादेशिक' संबोधता येणार नाही. कारण वैचित्र्यपूर्ण स्वच्छंदी व्यवहार व सुसंस्कृततेच्या दोषापासून मुक्त असलेला मनुष्य हीच प्रादेशिक कादंबरीची केन्द्र-वस्तू आहे. प्रादेशिक कथा ही ग्रामकथा असते तसाच तिचा क्षेत्रीय जीवनाशीही संबंध असतो. उपेक्षित व अस्पर्श जीवनाचे लोकसंस्कृतीसह पुनःप्रस्तुतीकरण हे कार्य प्रादेशिक कादंबरी करीत असते. प्रदेश-संस्कृतीला मर्यादा असते. तर 'नागर' संस्कृतीला ती नसते. ती मध्यवर्ती असते.

आमच्या देशातील विशिष्ट प्रदेश व प्रांतभाग पारंपारिक भारतीय संस्कृतीची प्रतीके आहेत. शहरांनी भारतीय संस्कृती कधीही प्रभावित केली नाही. ग्रामीण सहज व उन्मुक्त प्रवृत्तीची नक्कल कदाचित शहरांनी केली असेल पण संस्कृतीचा उगम तेथे होत नसतो. त्यामुळे प्रदेश-जीवनाचे अस्सल स्वरूप प्रादेशिक ग्रामीण कथावस्तूतच उपलब्ध होते.

'झोपडपट्टी' जीवन रंगविणाऱ्या कादंबऱ्यांची पार्श्वभूमी शहरी-नागर आहे. हे जीवन म्हणजे शहरांना लाभलेला शाप आहे. विकास आणि प्रगतीची संधी असूनही शोषणातून दारिद्र्य व दारिद्र्यातून बकालपण वाढत आहे. त्यातून उभे झालेले बकाल जीवन ह्या झोपडपट्टीतून जगले जात आहे. हे जीवन उपरोक्त कादंबऱ्यांचा विषय झाले आहे. या जीवनाचा संबंध आहे शहरी अर्थव्यवस्थेशी तेथल्या उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेशी. त्यामुळे ह्या जीवनावरील कादंबऱ्या नागरी-सामाजिक जीवनाच्या कादंबऱ्या आहेत. त्यांची प्रवृत्ती प्रादेशिक ग्रामीण जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांहून वेगळी आहे. या कादंबऱ्यांमधील समस्या प्रदेश जीवनाच्या समस्या नाहीत. त्यातील समस्या नागरी सामाजिक जीवनाच्या समस्या आहेत. त्यातील जीवन प्रादेशिक जीवनाहून भिन्न, विषम व घाणेरडे आणि बहुतांश गलिच्छ वस्त्यांशी संबंधित आहे. याउलट प्रादेशिक कादंबऱ्यांमधील जीवन पारंपारिक, नैसर्गिक व स्वाभाविक असे बहुतांश आढळते. प्रगत जीवनाचा परिणामही प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये रंगविलेला आढळतो. प्रदेश जीवनातील निसर्ग, लोकसंस्कृती इ. चे दर्शन अशा कादंबऱ्यांमधून घडविलेले आढळते. म्हणूनच झोपडपट्टी जीवनावरील कादंबऱ्यांचा समावेश प्रदेश पार्श्वभूमी असलेल्या कादंबऱ्यांमध्ये करणे अयोग्य ठरते. त्यामुळेच "ह्यात (प्रदेशात) नागर विभागही अंतर्भूत आहे". "झोपडपट्टी कादंबरी ही देखील एका अर्थाने प्रादेशिक कादंबरीच" आहे.

"झोपडपट्टी कादंबऱ्यांच्या रूपाने 'माहीमच्या खाडी'ने प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये एक पुढचा टप्पा गाठला आहे" इत्यादी विधाने वस्तुस्थिती लक्षात घेता विसंगत वाटतात.

प्रा. भालचंद्र फडके म्हणतात, जयवंत दळवी यांची 'चक्र' आणि मधु मंगेश कर्णिक यांची 'माहीमची खाडी' या कादंबऱ्या झोपडपट्टीतल्या जमात जीवनाचे चित्रण करणाऱ्या आहेत. औद्योगिक भरभराट झालेल्या शहराच्या अंगावरील क्षतांसारख्या या झोपड्या वाढत व चरत जातात अशा आशयाचे विधान ना. ग. गोरे यांनी केले आहे. हे जीवन, साऱ्या वकाल मामर्थ्यानिशी आणि अगतिक कारुण्यानिशी शब्दचित्रांकित करण्याचे काम या कादंबरीकारांनी केलेले आहे." प्रा. फडके यांनी केलेले हे विधान सर्वच झोपडपट्टी कादंबऱ्यांना लागू आहे तसेच अशा नागर पार्श्वभूमी असलेल्या कादंबऱ्यांचा प्रादेशिक कादंबऱ्यांत का अंतर्भाव करू नये या प्रश्नाला उत्तर देणारेही आहे.

⊗ ⊗ ⊗

(पृष्ठ १०९ वरून)

नाममहतीचा मूलस्रोत या प्रकरणात वेदमंत्र आणि नाममंत्र यांची तुलना करून नाममंत्राचा महिमा अधिक असल्याचे प्रतिपादन केले आहे. वेदवंचित समाजाला वेदमंत्राचा नाममंत्र दिला. एवढेच नाही तर नाममंत्र वेदांहूनही श्रेष्ठ आहे; किंबहुना नाम हे देवाहूनही मोठे आहे असा नामाचा महिमा जनसामान्यांच्या हृदयात बिंबविला. मुले जगत नसली म्हणजे तुच्छवस्तुनिदर्शक नामांचा वापर केला जातो, तसेच कुलदेवता अथवा उपास्य देवता यांच्या नावावरून नावे ठेवण्याची प्रथा आढळते. तसेच पुरुष अपत्यांसाठीही देवनामे ठेवतात. या सर्व सूक्ष्म संकेतांचा निर्देश करावयास लेखक विसरले नाहीत. संतांनी आपला परम उपास्याच्या नामाखेरीज अन्य नामांची प्रतिष्ठा मानली नाही. 'माझे नामरूप हारपो' हीच त्यांची व्यक्तिनामांच्या बाबतीतील दृष्टी होती.

प्रस्तुत ग्रंथाचे अंतरंग हे असे असून तो अभ्यासकाला नवीन दृष्टी देणारा आहे. संतांनी साहित्यमूल्यांचे निकष पूर्वसूरींपासून न घेता स्वतःचीच साहित्यविषयक मूल्ये निर्माण केलीत—आणि लोकतत्त्वाची जोपासना करून त्यात सौंदर्य ओतले. संतांनी परंपराउच्छेद केला नाही तर त्यांचा निश्चित अर्थ लावला अशा प्रकाराची ठोस विधाने प्रस्तुत ग्रंथात लेखकाने केलेली आहेत. परंतु संतांनी परंपरा मोडल्या नाहीत हे लेखकाचे प्रतिपादन संपूर्णपणे बरोबर नाही. तसेच, "लोकतत्त्व ही संज्ञाही मी 'लोकसाहित्या'चा पर्याय म्हणून वापरली आहे. 'पुरातत्त्व' ही संज्ञा जशी 'पुराणवस्तुसंशोधनशास्त्रा'-साठी आता सर्रास रूढ झाली आहे. तशीच 'लोकतत्त्व' ही संज्ञाही 'लोकसाहित्या'साठी रूढ व्हायला हरकत नाही," या लेखकाच्या निष्कर्षाशी सहमत होणे अवघड आहे. तरीसुद्धा संतसाहित्याचा वेगळ्या दृष्टिकोनातून त्यांनी केलेला अभ्यास निश्चितच अभ्यासकांना उपयुक्त ठरणारा आहे.

संतसाहित्य आणि लोकसाहित्य रा. चिं. ढेरे, श्री विद्या प्रकाशन, पुणे, जुलै, १९७८, पृष्ठे २१६, किंमत रु. २५.

⊕ ⊕ ⊕

प्रलयकाल : एका क्रांतिवीराची कथा / मृणालिनी देशपांडे

श्री. ह. वि. दातार यांच्या 'प्रलयकाल' पौराणिक ऐतिहासिक कादंबरीची प्रथमावृत्ती १९७८ साली प्रसिद्ध झाली. आपल्या सभोवताली दैनंदिन घडणारे अन्याय, अत्याचार व जुलूम यांमुळे सामान्य माणूस भरडला जात असतांना, सामाजिक जाणीवा ठेवण्यास, लेखक, स्वतः व्यथित होऊन जगाला काही सांगू इच्छितो अशा समाजाभिमुख लेखकांमध्ये श्री. दातार यांची निश्चितच गणना करावी लागेल.

'प्रलयकाल' कादंबरीचे कथाबीज प्राचीन कालच्या हूण आक्रमणाच्या ऐतिहासिक पार्श्व-भूमितून घेतले गेले आहे. इतिहास, शौर्य, पराक्रम, स्वातंत्र्य, स्वदेश राष्ट्रप्रेम इत्यादी मौलिक गुणांची जोपासना करायला शिकवितो आणि त्यांतूनच 'मी या देशाचा नागरिक आहे आणि माझ्या देशाचे प्राणपणाने रक्षण करील' ही अस्मिता जागृत होते. या कथा-बीजाचा अंकूर लेखकाने संपूर्णतः कल्पना, भावना व विचार या त्रयीने फुलविला आहे.'

या कादंबरीतील कथा एका क्रांतिवीराची कथा आहे. मंदार देशाचा महामंत्री रविवर्मा हा हुकुमशहा बनून व स्वतःच्या अधिपत्याखाली सर्व प्रदेशाचा ताबा घेवून त्याच्या रक्षणाकरितां परकीय हूण सेनापती रूद्रदामन याची मदत घेतो. त्याचबरोबर राज्यात जुलमी पाशवी राज्य सुरू होते. रविवर्मा स्वतः कुशल व पराक्रमी असून स्वतःचे राज्य शत्रूच्या हातात देतो. त्याचा प्रतिकार म्हणून संघटितशक्ती ही कलीयुगी लोकांचे सामर्थ्य ठरते. त्या शक्तीतून 'नरेन्द्र' या क्रांतिवीराची व्यक्तिरेखा साकार होते. नरेन्द्र हा कथेचा नायक असून प्रगल्भ बुद्धिमत्ता, लोकांना मोह पाडणारी वाणी, असामान्य सौंदर्य, अनुपम शौर्य या गुणांनी महाभारतातील 'धनंजया'प्रमाणे भासतो. जनतेचे अपार प्रेम हीच त्याची शक्ती ठरते.

व्यक्तीपेक्षा राष्ट्र मोठे असा आदेश देणारा जनता जनार्दनाचा वाली असणारा असा नरेन्द्र आजच्या राज्यकर्त्यांनाही आदर्श ठरावा. नरेन्द्राचे हे राष्ट्रहिताचे विचार रविवर्म्याचा मुलगा उदयादित्य यालाही पटतात. स्वतः उदयादित्य अनेक विद्यांत पारंगत असून शूर, भावनाप्रधान, पराक्रमी, आक्रमक असून अन्यायाला तोंड देणारा दुष्टांचा कर्दन काळ आणि सज्जनांचा त्राता ठरतो. नरेन्द्र आणि उदयादित्य यांच्या प्रयत्नाने मंदीर स्वतंत्र होतो. पण नरेन्द्राच्या प्रेमाला मुकलेली सौदामिनी ही त्याच्या विरुद्ध आग ओतून सूडाच्या भावनेने राज्यात दुफळी उत्पन्न करते. आपले वडील रविवर्मा याच्या मरणाचा सूड घेण्याला आता स्वतः व भाऊ उदयादित्य याला ती प्रवृत्त करते. पण शेवटी नरेन्द्राच्या विशाल हृदयाची किंमत पलटून पश्चातापदग्ध होते. पुढे सौदामिनी व उदयादित्य यांचे शुद्ध अंतःकरण व राजनिष्ठा पाहून नरेन्द्र त्यांना राज्याधिकार देवून स्वतः परावृत्त होतो. नरेन्द्राच्या कार्याशी सहमत असलेली पत्नी 'कुंडला' कोमल मनाची चारूमती या सर्वच व्यक्ती निरनिराळ्या विचारधारांचे प्रतिनिधित्व करतात.

कथानकातील संवाद प्रसंगनिष्ठ असून लालीत्य आणि नाटय उत्पन्न करणारे आहेत. लेखकाची भाषा अत्यंत साधी पण ओघवती आहे. क्रान्तीच्या गर्जनेत तिचा आवाज उठतो तर प्रेमी जनात ती मितभाष्य करते. सबंध कथेतून वीररसाचा आविष्कार झाला आहे.

नरेन्द्राच्या सभेपुढील भाषणाचा प्रसंग, राष्ट्रदेवीचे चित्ररेखाटन, मंदाकिनीच्या पवित्र गंभीर पात्रात उदयादित्य आणि चारूमती यांचा नौकाविहार हे प्रसंग अत्यंत मनोवेधक आहेत.

योगायोग असा की या पुस्तकाचे प्रकाशन हे आंतर्राष्ट्रीय बालकवर्ष साजरे होत असताना झाले आहे. तानाशाही, भ्रष्टाचार, पाशवी अत्याचार या विरुद्ध संघटित शक्ती उभारली असता कल्याण-कारी राज्य कसे टिकवून धरिता येते याचा आदर्श लेखकाने युवकासमोर ठेवला आहे.

⊗ ⊗ ⊗

अज्ञानसिद्ध आणि 'नागेशमाहात्म्य' / वि. बा. प्रभुदेसाई

प्राचीन मराठी वाङ्मयाचे संशोधन आणि समालोचन आतापर्यंत अनेक अभ्यासकांनी केलेले असले तरी त्यामुळे सर्वच महत्त्वाच्या समस्यांचा समाधानकारक उलगडा झालेला आहे, असे म्हणता येणार नाही. विविध धार्मिक संप्रदाय, त्यांचे प्रवर्तक आणि त्यांनी बजावलेली वाङ्मयीन कामगिरी यांचा आवाका हा एका स्वतंत्र शोध–प्रबंधाचा विषय होण्याइतपत मोठा असतो हे पुरेसे सिद्ध झालेले आहे. नाथ, वारकरी, रामदासी, महानुभाव, दत्त इत्यादी प्रमुख संप्रदायांनी केलेली वाङ्मयनिर्मिती बऱ्याच प्रमाणात उजेडात आलेली आहे. नागेश संप्रदाय हा प्राचीन संप्रदायांपैकीच एक होय.

वडवाळ सिद्ध नागनाथ ऊर्फ नागेश हा नागेश संप्रदायाचा प्रवर्तक मानला जातो. **'महाराष्ट्रीय संत–कवि-काव्य-सूची'कार** गोविंद काशीनाथ चांदोरकर यांनी (शके १८३७) माहिती दिली आहे ती अशी :—(१) "अज्ञानसिद्ध नागेश यांनी आपले ग्रंथात 'नागनाथ' हे आपले गुरूंचे नाव म्हणून दिले आहे व स्वतःचे नाव नुसते 'अज्ञान' असे देतात. यांनी अविंध भाषेत 'पंचीकरणप्रमेय' रचिले आहे यावरून यांच्या काल १४०० चा सुमार येतो. 'वरद नागेश' व हे एकच असे वाटते. ग्रंथ :– कालज्ञान, पंचीकरणप्रमेय" तसेच, (२) "वडवाळ सिद्ध (नागेश) ग्रंथ :– संकटहरिणी शिवग्रंथ' (मार्गशीर्ष व. २ शक १३१३) इ. "वरद नागेश (अज्ञान नागेश) वि. माहिती :– यांचे गुरू नागनाथ (नागेश) ग्रंथ :– वरद नागेश, गुरुशिष्य-संवाद" अज्ञानसिद्ध, वडवाळ सिद्ध आणि वरद अशा तीन प्रकारे निर्देशिल्या गेलेल्या 'नागेशां'–च्या परस्परसंबंधाचा संशोधकांनी करून ठेवलेला गुंतावळा अभ्यासकांना घोटाळ्यात पाडणारा असाच आहे.

वि. ल. भावे यांच्या **'महाराष्ट्र सारस्वता'**-ला जोडलेल्या **'पुरवणीत'** (आ. पाचवी, १९६३) डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी विविध मतांचा परामर्श घेऊन निष्कर्ष काढला आहे तो असा :– "या शतकात (चौदाव्या) एक वडवाळ सिद्ध नागेश व दुसरा अज्ञान सिद्ध नागेश असे दोन कवी ऐकू येतात. पैकी पहिल्याचा उल्लेख 'सारस्वत' कारांनी केलाच आहे. त्याचा काळ संतकविकाव्यसूचिकार शके १२९० ते १३४० असा देतात. दुसरा कवी स्वतःचा उल्लेख अज्ञान सिद्ध नागेश किंवा वरद नागेश या नावाने करीत असून तो वरील नागेशा-चाच शिष्य दिसतो. एवढे मात्र खरे, की या दोन कवींविषयी विश्वसनीय असा तपशील अद्यापी तरी उपलब्ध झालेला नाही." अशी ही वस्तुस्थिती आहे.

प्रस्तुत विषयावर प्रकाश टाकणारी डॉ. यू. म. पठाण यांची 'नागेश संप्रदाय' (१९६३) आणि 'अज्ञानसिद्ध विरचित वरदनागेश (१९७०) ही दोन पुस्तके नंतरच्या काळात औरंगाबादहून प्रसिद्ध झाली आहेत. याशिवाय शं. ना. मोहोळकर, डॉ. पंडित आवळीकर, गं. धो. कोठावळे यांनी निरनिराळ्या प्रसंगी केलेल्या या विषयावरील संशोधनपर लिखाणाचाही निर्देश करावा लागेल.

प्रा. पां. ना. कुलकर्णी यांनी संपादन केलेले **'अज्ञानसिद्ध-विरचित नागेशमाहात्म्य' व्हीनस प्रकाशनाने** १९७७ साली प्रसिद्ध केले आहे. या संपादनाला जोडलेल्या 'प्रस्तावने'त प्रा. कुलकर्णी यांनी नागेश संप्रदायाशी संबंधित अशा विविध प्रश्नांचा समतोलपणे विचार केला आहे. 'संशोधन-धारा' या आपल्या अभ्यासपूर्ण लेख-संग्रहाच्या (१९६७) 'प्रास्ताविका'त प्रा. पां. ना. कुलकर्णी यांनी लिहिले आहे:– "संशोधनात शोधा-शोधीइतकीच संशुद्धीला प्रतिष्ठा असते. संशुद्धीने मतभिन्नता कमी व्हावी म्हणून हे लेखन. संशोधनात

संप्रदाय नसावेत तशीच संशोधकाला नातीही नसावीत. माझे पूज्य गुरुवर्य कै. प्रा. द. सी. पंगू आणि माझे एक आवडते विद्यार्थीमित्र डॉ. पंडित आवळीकर यांच्या संशोधनावरील टीका, जवळिकी-मुळेच की काय कठोर उतरली. ती तशी न उतरती तर बरे होते." या उताऱ्यावरून प्रा. कुलकर्णी यांचा संशोधनविषयक दृष्टिकोन स्पष्ट होईल. शोधाशोधी आणि संशुद्धी करून साक्षेपाने जमविलेल्या माहितीच्या आधारे काही 'विचारकृती निर्माण करणे' हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट दिसते. संशोधनात 'मी' ला म्हणजेच अहंकारयुक्त दुराग्रहाला महत्त्व नाही तर मुख्य भर सत्यान्वेषणावरच असायला हवा, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. अज्ञान सिद्धांच्या नावावर अनेक ग्रंथ आढळतात :– त्यांपैकी 'संकटहरणी शिवग्रंथ', 'वरदनागेश', व 'नागेश माहात्म्य' हे प्रसिद्ध झालेले असून पुढे दिलेल्या रचना अप्रकाशित आहेत :– काळज्ञान, पृच्छापात्र, जीवब्रह्माभेदलक्षण, तत्त्वबोध, सिद्धांत–पंचीकरण, सत्यकोटेशुमाहात्म्य (१२७० ओव्या). त्यांची काही पदे मराठी प्रमाणेच फारशी व कन्नड भाषांतही आढळतात हे विशेष.

प्रा. पां. ना. कुलकर्णी यांनी 'नागेशमाहात्म्या' ची अनेक हस्तलिखिते मोठ्या प्रयासाने मिळवून त्याचे संपादन केले आहे. पाचशे ओवीसंख्येच्या या संपादनाला त्यांनी लिहिलेल्या (२८ पृष्ठांच्या) संशोधनपर व विवेचक प्रस्तावनेतील काही महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

(१) एक ऐतिहासिक व्यक्ती म्हणून नागनाथ हे ज्ञानदेवसमकालीन होत आणि त्यांचे वास्तव्य काही काळ सोलापूर जिल्ह्यात होते असे इतिहासविवेचनाच्या संदर्भात म्हणता येणे शक्य आहे.

(२) वडवाळ सिद्ध नागेशांनी प्रवर्तिलेल्या या संप्रदायाचे नाव 'नागेश-संप्रदाय' असून त्यात वहिरंभट ऊर्फ वहिरा पिसा, अज्ञान सिद्ध नागेश, तुकाराम महाराज, उद्धव चिद्घन, दत्त चैतन्य, वेडा नागा, अलमखान, चवंडा महाराज, सिद्धलिंग इत्यादी अनेक संतकवींचा अंतर्भाव केला जातो.

(३) अद्वैत सिद्धान्तावर या संप्रदायाची उभारणी असून तो उदारमनस्क आणि सर्वसमावेशक आहे. जाति-धर्मांच्या अतीत असणाऱ्या 'शिवतत्त्वा'ने उजळून निघण्याची भाषा तो बोलतो. भारतातील प्राचीन संप्रदायांपैकी चैतन्य संप्रदायात या परंपरेचा अंतर्भाव होतो असे नागेश सांप्रदायिक ग्रंथांवरून आणि व्यक्तिनामांतील 'चैतन्य' या पदावरून म्हणता येते.

(४) नागनाथ ऊर्फ वडवाळ सिद्ध नागेश हे नागेश संप्रदायाचे मूलस्थान होय. नाथ सांप्रदायिक नागनाथ आणि वडवाळ सिद्ध नागनाथ यांच्यातील नामसादृश्यामुळे दोघांच्या कथा एकाच्याच मानल्या जाऊन त्यांच्या स्थलकालचरित्रासंबंधी गुंतागुंत निर्माण झालेली दिसते. ती दूर व्हायला हवी. मात्र याबाबतीत कोणत्याही एका संतचरित्रकारावर पूर्णपणे विसंबून चालणार नाही.

(५) 'नागेशलीलामृत' हा भास्करकवीचा अप्रकाशित ग्रंथ नागेशसंप्रदायात प्रमाण मानला जातो. वडवाळ सिद्ध नागेश हे शिवावतार असून ते नवनाथांतील नागनाथांहून भिन्न होत असे भास्कर निस्संदिग्धपणे बजावतो. मानूर मठाधीश नागेश व वडवाळ सिद्ध नागेश हे भिन्न असावेत असे वाटते.

(६) 'अज्ञानसिद्धां'ना बालपणापासूनच तसे नाव पडले होते. 'अज्ञानपणी सिद्ध स्थिती ! म्हणोनी अज्ञान सिद्ध म्हणती.' अखेरपर्यंत त्याने ब्रह्मचर्य पाळले होते.

(७) अज्ञानसिद्धांच्या भक्तीने प्रसन्न होऊन नागनाथांनी 'साक्षात दर्शना'ने त्यांना सनाथ केले. भगवान सर्वव्यापक आणि सर्वांचे पर्यवसान आहे हे सत्य ज्ञान प्रत्ययास येताच अज्ञानसिद्ध आनंद-रूप झाले. त्यांना अनिरसनी समाधी लागली.

(८) वडवाळ सिद्ध नागेश, हेगरस, वहिरा पिसा, नामदेव, ज्ञानदेव ही सर्व मंडळी समकालीन दिसतात. अज्ञान सिद्ध नागेश या सर्वांहून काहीसे उत्तरकालीन आहेत.

श्री. गणेश दामोदर बुवा मु. नरंदे, यांच्या संग्रहातील वंशावळही [हेगरस बावा (पुढे कन्येचे पुत्र) ते दामोदर ग. बुवापर्यंत] अज्ञानसिद्धांच्या

कालनिर्णयासाठी उपयोगी पडेल म्हणून प्रा. पां. ना. कुलकर्णी यांनी ती मुद्दाम आपल्या प्रस्तावनेत दिली आहे.

(९) आपले वडीलच आपल्या उदरी आले या अहिल्येच्या श्रद्धेवरून हेगरसाचे आयुर्मान संपल्या नंतर अज्ञान सिद्ध जन्मले हे मान्य व्हावे.

(१०) अज्ञानसिद्धांच्या 'संकटहरणी'तील कालोल्लेखावरून त्यांचा काल साधारणपणे शके १२८० ते १३४० च्या दरम्यानचा मानता येईल. त्यांनी केलेली विपुल ग्रंथरचना, आणि नागेश संप्रदायाची वृद्धिगत केलेली परंपरा या गोष्टीही दृष्टिआड करता येत नाहीत.

(११) अज्ञानसिद्धांच्या चरित्रकथनात ज्या अद्भुत किंवा दैवी कथा दिल्या आहेत त्या सांप्रदायिक ग्रंथावरूनच. त्यातून महत्त्वपूर्ण तात्त्विक आशय फार सुंदर रीतीने व्यक्त होतो. त्यांच्या काव्याचे स्वरूप या दैवी कथांची उकल करण्यास पुष्कळदा साह्यभूत ठरते.

(१२) अज्ञानसिद्धांनी शाहिरी स्वरूपाची कविता लिहिली असून त्यांची काही पदे मराठी, फारशी व कन्नड भाषांत आहेत.

(१३) याशिवाय प्रा. कुलकर्णी यांनी नरंदे येथे पाहिलेला 'गुरुसाम्राज्य' या नावाच्या ६९० ओव्यांचा ग्रंथही अज्ञान सिद्धांचाच असावा.

(१४) 'वरदनागेश' हा ग्रंथ तात्त्विक स्वरूपाचा आहे तर 'नागेशमाहात्म्य' हा त्यांचा भक्तिग्रंथ आहे. शिवरात्रिव्रताचे परमोत्तमत्व त्यांना येथे सांगावयाचे आहे. उपास्य व गुरू यांची एकात्मताही त्यांनी येथे सांगितली आहे. किंबहुना आपले गुरू नागेश यांच्या नावामुळेच ते 'नागेश माहात्म्य' लिहायला प्रवृत्त झाले असावेत.

(१५) विष्णू आणि ब्रह्मदेव यांच्यातील श्रेष्ठतेचा झगडा मिटवण्यासाठी शिवरात्रीच्या दिवशी नागबंध क्षेत्रात नागलिंग निर्माण झाले आणि शिवरात्रव्रत सहजी घडल्याने महापापी सकुमाराचा उद्धार झाला अशा दोन कथा येथे सांगितल्या गेल्या आहेत.

(१६) त्यांची रूपकसृष्टी संपन्न आहे, तथापि त्यांची भाषा पांडित्याच्या आणि कल्पकतेच्या आहारी फारशी न जाता प्रसन्नपणे भक्तिपूर्ण पदक्षेप टाकीत जाते. तिला साहित्याचे शिल्प कोरायचे नसून भक्तीची पावन गंगा लोकोद्धारासाठी वाहती ठेवायची आहे.

प्रस्तुत काव्याच्या कापशी व नरंदे या दोन ठिकाणी प्राप्त झालेल्या वेगवेगळया दोन प्रतींच्या आधारे संपादकांनी पाठशुद्ध संहिता तयार केली आहे. मूळ ग्रंथांच्या नकला बऱ्याच अशुद्ध आढळतात. अन्यभाषिक भक्तांचे साहचर्य आणि कर्नाटकाचे सामीप्य यामुळेही असे घडले असावे, असा संपादकांचा तर्क आहे. मूळ संहिता सिद्ध करताना कपाशी-प्रत आधीची असल्याने ती प्रमाण मानून तळटीपांत नरंदे-प्रतीतील पाठभेद दिले आहेत. शेवटी 'कठीण शब्दांचा कोश' व 'संख्यायुक्त शब्दांचा कोश' दिल्यामुळे अभ्यासकांची चांगली सोय झाली आहे. केवळ पन्नास पृष्ठांच्या संहितेला संपूर्ण दोन पृष्ठांचे 'शुद्धिपत्र' आवश्यक वाटावे ही गोष्ट मात्र खटकते. प्रस्तुत संपादनाने बऱ्याच अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

प्रा. पां. ना. कुलकर्णी यांना ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी एक ज्ञानेश्वरीची प्रत उपलब्ध झालेली असून त्या प्राचीन हस्तलिखिताचे प्रा. कुलकर्णी यांनी साक्षेपाने केलेले संपादन प्रकाशात येण्याचा सुदिन लवकरच उगवो अशी सदिच्छा या निमित्ताने प्रगट करावीशी वाटते.

⊕ ⊕ ⊕

काळोखातील विश्व / रमेश नारायण

दलित साहित्यविश्वाचा अभ्यास करताना कवितांच्या पिकांची रोपं मैलोगणिक दूरवर उगवलेली दिसतात. अंकुरावस्थेत कुठल्या रोपांचे वृक्ष होतील याबाबतचे अंदाज चुकत असले तरी नामदेव ढसाळ ते यशवंत मनोहर या वृक्षविस्तारातील अनेक वृक्षांनी आपापल्या कवितेतून दलितांच्या दु:खावर सावली केली हेही निर्विवाद सत्य. पण यातही शतकानुशतकांच्या 'दलित जाणीवा' कवितांमध्ये शब्दबद्ध करण्याच्या प्रयत्नात अनेकांनी केवळ 'पीकांचे रान' उभे केले हेही नाकबूल करण्यात अर्थ नाही. अशा कंटाळवाण्या मन:स्थितीत सहज एक कविता हाती पडली आणि उत्खननात अचानक पुरलेले धन गवसावे तसे वाटले.

या अंकुराचे कवी होते; दे. शि. दुधलकर. विदर्भातील दलित जाणिवांच्या कवींपैकी एक शक्ती. जे भोगले तेच अभिव्यक्त करणारा. जसा जगवल्या गेला— त्या अनुभवांनाच शब्दबद्ध करणारा कवी.

ह्या कवीमनाच्या काही कथाही अधून-मधून प्रकाशित व्हायच्या. त्याकडे लक्ष नसायचे. परवा या कथांचाच एक संग्रह 'काळोख' या नावाने प्रसिद्ध झाला. आणि काळोखातील विश्वाचे दर्दभरे—बेरहमी दर्शन वाचताना दलितांच्या दु:खांचे प्रतिनिधित्व महाराष्ट्र शारदेच्या दरबारात 'काळोख'कर्ता करीत आहे असे मला वाटले.

"दुनियेतल्या तमाम दु:खी जीवास" अशा अर्पणपत्रिकेने सुरूवात झालेला काळोख 'कातीण', 'हार', 'तोल', 'दगा', 'चक्र', 'आयुष्यातला एक फेरा', 'मूकवळी', 'सूड', 'पंधरा हजार', 'विसर', 'अंधार', 'किडलेलं मन' असा १२ तासांचा आहे...एक जीवघेणी—काळीकुट्ट रात्र., ज्या व्यक्तींची दु:खं दे. शि. वेशीवर टांगतात त्या व्यक्ती आजन्म काळोखातच जगतात. या समाज रचनेचीच ही रीत आहे.. मग दे. शि. हा सारा प्रपंच उभा कां करतात? या प्रश्नाचे उत्तर असे की, झिडकारलेल्या माणसांच्या वेदना उरात खुपू लागल्या की सहृदय माणसाला स्वस्थ बसवत नाही. आणि मग नखरेल वातावरणात लोळणाऱ्या तलम कातडीच्या माणसांना नवे आव्हान देत अशा कथा जन्माला येतात. ह्या संग्रहातील कथा दे. शि. ज्या समाज—संस्कारात वाढला त्या माणसांच्या कथा आहेत. त्याच समूहमनासाठी लिहिलेल्या आहेत. यातील सारीच माणसं जीवनातला प्रकाश हरवून बसलेली; भोवतालचे नासके व्यवहार, अप्रामाणिकपणा, अवहेलना, दु:ख यांनी रक्ताळलेली. आणि महत्त्वाचे म्हणजे स्वत: दे. शि. ही तसेच खरचटलेले आहेत. सुव्यांनी भोगलेल्या दु:खजाणिवेला एका क्रांतिप्रवण तत्त्वाची जोड आहे. दुधलकरांची दु:खे केवळ दु:खेच आहेत. आणि केवळ दु:खांचेच चित्रण म्हणजे उत्कृष्ट कलाकृती नव्हे— एवढाच काय तो फरक आहे.

कथालेखनाच्या क्षेत्रात दुधलकर तसे नवखे लेखक साहजिकच कथेचे मंत्र-तंत्र, निकष-नियम या बंधनातून कथा मुक्त झालेल्या दिसतात. परंतु बुलंद आणि वास्तविक अनुभवाच्या बळावर नियमयुक्त कथाही वाचकांना कशी हेलावते याचे उदाहरण म्हणजे हा कथासंग्रह आहे. बहुतेक अनुभव खेड्यातील आहेत. कथाही वऱ्हाडी मन व माती यांच्या 'स्थितप्रज्ञ जखमा' घेऊनच अवतरतात. त्यामुळेच कथेशी सुसंगत असलेले संवादही वऱ्हाडी आणि ग्रामीण बोलीतच आहेत. क्वचित कुठे अचानक, उद्धव शेळकेंच्या 'धग' ची आठवण दे. शि. ची शैली करून देते. पण या सर्व कथा काळजाला हात घालतात एवढे निश्चित.

दुधलकरांची सारी पात्रे तळातली आहेत. दलितवर्ग आणि त्यातही ग्रामीण परिसर; क्वचितच अशी व्यक्तिचित्रे साहित्यात आढळतात. माडगुळकरांच्या ग्रामीण कथेशी निसर्ग जसा एकरूप होतो

तसं इथे झाले असते तर दलित साहित्यातील कथेची ही कोंडी फुटली असती हे खरे; किंवा याउलट बोलायचे तर माडगुळकरांना दे. शि. नी व्यक्त केलेली ग्रामीण दलितांची दुःखे दिसली असती तर त्यांच्या निसर्गालाही नवा अर्थ प्राप्त झाला असता. असे होत नाही. कारण दे. शि. कथा लेखक या नावाने कुठेतरी कमी पडतात. एवढे खरे— की, अनुभव सच्चे आहेत, त्यातील माणसं सच्ची आहेत.

हा सारा पसारा खरं तर एका महा-काव्याचा आहे इतकी दलितांची दुःखे प्रचंड आहेत. युगानुयुगाच्या काळोखातील आहेत. पण केवळ दुःखाचे चित्रण म्हणजे दलित-कथा ठरतात का? ठीक आहे. या जाणिवा समाजाप्रत पोचल्या. पण कोणत्या समाजाची इथे अपेक्षा आहे? पांढरपेशी मध्यमवर्ग की दलित? दलितांच्या उत्थानाकरिता हे सर्व हवे. मागूनही न्याय मिळत नाही तर मग विद्रोह हवा. तर हा विद्रोह तरी पुरेसा अभि-व्यक्त होतो का?

दुधलकरांच्या कथा वाचून हे सर्व प्रश्न मनात निर्माण होतात. हेही त्या कथांचे सामर्थ्य आहे. हेही नसे थोडके!

दे. शि. ना एकच सांगावंसं वाटतं; तुमच्या या कथांचं स्वागत उच्चवर्गीय करोत न करोत. वर्ण पात्रांच्या जातकुळींनी मात्र तुमच्या कथांचं स्वागत केलं आहे. कारण अभिव्यक्त झालेलं दुःख केवळ तुमचं नाही. त्या साऱ्यांचं आहे. दुनियेतल्या तमाम दुःखी जीवांचं आहे. आणि ते दुःख त्यांना आपलं वाटण्याचं कारण 'तुमचा प्रामाणिकपणा' आहे.

अशा या प्रामाणिक दलित कथाकाराकडून भविष्यात असेच अंतःकरणातला काळोख धग-धगून पेटवणारे व या समाजाचे ठसठसणारे दुःख हलकं करणारे सच्छे अनुभव त्यांच्या कथा-कलेतून व्यक्त होवोत ही अपेक्षा करणे व्यर्थ ठरणार नाही.

काळोख दे. शि. दुधलकर
प्र. १९७८, किंमत नऊ रुपये
प्रकाशक—प्रभाकर देशमुख,
वैभव प्रकाशन, नागपूर

क वि ता

समुद्रात / नरेंद्र बोडके

कुणाची तरी हाक येते अवेळी
फुले गंधगर्भातुनी चांदणे
जिथे गाडलेले मनातील पक्षी
तिथे पालवी या तमाला फुटे

कधीचा इथे कण्हतो हा दिवाही
सभोवार घोंगावती वादळे
उरी न्हात कैफात अस्तावण्याच्या
उभे झाड शब्दाहुनी बोलके

निरोपास भांबावल्या वृद्ध वाटा
दुभंगून प्राणातली प्रार्थना
घरांचीच ही प्रेतयात्रा निघाली
तसा एकट्याचा निघे करवां.

किती शोधिले खोल मातीत पाणी
तरी ओंजळीला फुटेना झरा
तुझ्या आसवांच्या समुद्रात माझी
दिशाहीन हाकारली गल्बते
दिशाहीन हाकारली गल्बते.

द्वैत / नारायण कुळकर्णी कवठेकर

पिंडी ते ब्रह्मांडी
येथे तर द्वैत
वळती पाऊले
कोषात कंसाच्या
मूठ मूठ माती
ताऱ्यांच्या चरणी
मोकळी सुटली
दोन हातांमध्ये
आग तीच राख
भान जळण्याचे

असा कंठशोष
स्वतातच
गोकुळ-बाजारी
अडे मन
घेऊन कपाळी
लोटांगण
मोळीतून काडी
द्वैतावली
सांगावया सोपे
सक्त पण

आज माझ्या जीवनी/देवकीनंदन सारस्वत

आसवांनी आसवांचे
गीत का शृंगारिले
शब्द झालेधुंद वेडे
वेदनेने पाहिले
सूर झाले मोरपंखी
वेदनेला पाहुनी
शब्द झाले का मुके
ते गीत माझे गाउनी
सूर फिरती एकटे का
त्या किनारी उन्मनी
गीत गीताला मिळाले
आज माझ्या जीवनी

त्या घनदाट जंगलात / राम गोसावी

पुन्हा एकदा त्या घनदाट जंगलात
झोकून द्यावे स्वतःला
हिरव्यागर्द गवतावर
निरखावी आभाळाची निळाई
गर्द हिरव्या पर्ण राशीतून, झिरपणारी.
धरावा ताल सुतार पक्षाच्या टोकटोकाशी
आणि जुळवावा गळा कोकिळेच्या–
उंच लयकारीशी.
रानफुलाचे बेहोष गंध श्वासात साठविताना
तुटून पडावे सारे बंध
क्षुद्र स्वार्थाचे, अहंपणाचे
आणि जडशीळ पापण्या हलकेच मिटवून घेता घेता
ऐकावा अनाहत नाद प्राणमृदुंगाचा
आणि हरवून घ्यावे स्वतःला निदान
एक क्षण पुन्हा एकदा
त्या घनदाट जंगलात.

एक कविता / चित्रा पांढरकर

तिच्या देहाच्या घाटदार वळणाला
अन् त्वचेच्या मुळसुळीतपणाला
त्याच्यात वेळी अवेळी उधाण असायचं
तेव्हा ती असायची वसलेली सिल्क होऊन
एकतर उगाचच लाजाळू
नाहीतर पाकळ्यांची वलयं लपेटून
किंवा भग
वारा फुंकता फुंकता
त्याचा 'देह' ती बनून जायची
आता ती त्याच्या श्वासांची झुंबरं
पापण्यांशी रेखून पहुडली असेल
म्हणून जरा जपून
भुवईच्या केसांचा आखीव बाक
थरथरायला नकोय म्हणून
घुंगरंही फार नाजुक किणकिणतात
देहाच्या घाटदार वळणाशी सुसंगत
त्वचेचं झुळझुळीत देखणेपण.

पाऊस आला अन् / रंजना विगम

पाऊस आला अन् पक्षांना पंख फुटले
निष्पाप आभाळाचे वांझपण फिटले
देहावरली अपुरी वल्कले फेडून मी केवलांगी झाले
धुवांधार पावसातील धुवांधार सरोवरासारखा
तू मिठीत माझ्या.
प्रत्येक स्त्रीच्या स्तनांवर ठेवून दिले आहेस
तू असेच देठखुडले कमळ
अरण्य संपता संपत नाही असा दिशाभुली वनवास
तुझ्या देहाचा गंध असलेल्या अनेक झाडांचे श्वास
मला नकोत ही झाडे मुळापासून उपटावीत
असे हात मी कुठून आणू ?
मला हवा आहे सूर्यास्त
असे रंगभरले मेघ मी कसे आणू ?
मी कसे खणून काढू माझ्या जखमांचे वाळवंट
कणाकणाशी जिथे दाट धुक्याचा वर्फ
तुझ्या ईश्वरी प्रार्थनांचा गर्त !

वास्तू / राजीव जोशी

रात्र निर्धास्त पसरली असताना
बरोबर मध्यरात्री; न सांगता न सवरता
त्यानं पेटवून दिली वास्तू
हातातल्या मशालीने.
धुराने गुदमरल्यावर
प्राणभयानं डोळे चोळणाऱ्यांवर
तो कडाडला—
प्राण हवे असल्यास
ह्या झोपडीत
माझ्या आश्रयाला या.
अन्यथा,
विझवतच बसा वणवा.
भीत भीतच—
वणवा विझलाय असं सारे म्हणताय.
हळहळतांनाही मनात येतंय—
डागडुजी करावी लागली तरी हरकत नाही
इयंच, अशीच वास्तू उभी रहायला हवीय.
समोरच्या झोपडीत मात्र
मेणबत्त्यांच्या लख्ख उजेडात
खिचडीचा हंडा शिजतोय.

अर्घ्य / वसंत सावंत

मावळती. झावळती
आम्रतरूच्या भवती
पान पान राघूंचा
किलविलाट मजभवती.
स्वरहिरव्या राव्यांसह
गाण्यांचे संमोहन
मी डुबून...
क्षितिजाला चंद्र फुटे
तोही मजसम भिजून.
झाडावर राघूंचे
जग निजले
जग निजले
माझ्यातुन फुटलेल्या
रात्रीला
मी निवांत अर्घ्य दिले.

क्रांति / नीला शर्मा

जयघोषांच्या बधिर भुलावणीत
विपरक्ताच्या धारा फुटतात
असंही म्हणतात—
ठुसठुसणारे गळू विखारी
कुणि अकस्मात् चिरून टाकावे
तेव्हाच रोग पसार होतो.
शल्यचिकित्सक येतो आणि
शस्त्रास्त्रांची दुधार परजत
वर्मावरती तटस्थतेने सुरी फिरवतो.
जयघोषांच्या बधिर भुलावणीत
विषाक्त रक्ताची चिरकांडी उडते.
धन्वंतरी अन् सावध होऊन
पडद्यामागे हात धुताना
दुर्जंतूंचे वेढे पडतात,
अंगांगांवर वेड्या चढतात,
काळगृहांना अर्थ गवसतो,
तडीपारच्या बातम्या रंगून,
लोक वरळतात—
क्रांति घडल्येय्, क्रांति घडल्येय् !

चंद्रधून / वसंत सावंत

मावळती आली नि
        पालवली लव छाया
समोरच्या सागावर
        बगळयांची घनमाया
ठोकुनिया तंबू ते
        फडफडती. .किणकिणती.
सांजेच्या आरतीस
        मजलाही 'ये म्हणती'—
रुणझुणती रुमझुमती
        दवबिंदु स्वर्गातिल
देवांचे श्वास भास.
        रात्रीला देत देत—
मिटलेले सागाच्या
        पानांवर मजसमोर.
मी उगवे माझ्यातुन
        रात्रीची चंद्रधून
पृथ्वीवर.

दिवा / ज्योती कस्तुरे

विचार करीत होते शून्यपणे
तर आठवला एकदम दिवा
पाठोपाठ मंद तेवणारी दिव्याची वात.
तेल संपले तरी ती तेवत असते शांत
स्वत:ला जाळीत.
नि विझून जाते अपरिहार्यपणे
अगदी शेवटच्या क्षणी.
म्हणणारे म्हणोत, 'दिवा विझला !'
पण दिवा कधीच विझत नसतो
खाक होते फक्त वात.
नवी वात मिळताच दिवा नव्याने पेटतो
जुन्या वातीला सोयिस्कर विसरून !

आता पराभवच गोड वाटतात / अनुराधा पाटील

उनाड वाऱ्याला पाठीवर घेत
किनाऱ्याला पोहचवणारी त्यांची जहाजं,
बुडताना पाहिलीयत मी.
छातीआड घुसमटणारे त्यांचे कल्लोळ
थडथडतात अजून नसानसात.
सरत्या रात्रींचे गाणे गळयात कोंडून
नवी पहाट जवळ करणारे निरंतर काफिले
झालेत दिसेनासे वळणावर
त्यांच्या जात्या पावलांनी उठवलेली धुळही
कधीच क्षितिजापार झालीय्.
या साऱ्यांसाठी मी कविता लिहीत असे.
आता कविता तरी कुणासाठी लिहाव्यात ?
माळरानावरून सरकत येणाऱ्या भयाण सावल्या
वेढताहेत अणू रेणू.
यांचे, त्यांचे; तुझे, माझे
सगळे प्रश्न बाद होताहेत
लागताहेत पराभवांच्या असंख्य कतारी.
मैलांच्या प्रत्येक थांब्यावर
बळी जायची सवय
रक्तात मुरवलेली—कतारींनी
आता पराभवच गोड वाटतात.

संघर्ष / बाळकृष्ण बन्नोरे

झळाळत होते
आभाळ नितळ..
एक टपोरे रक्तकमळ.
कुठून शिरले जनावर बेवारस
धुरळले अनिवार
उरात एक अनोळखी भ्रमर - वेड.
लेऊन कवच हाडा-मासांचे
उगवले बेटावर हिरवळीच्या
फोडून त्वचा अंधाराची
हिणवीत क्षितिजांच्या मोरपिसांना
कल्पतरूचा शापच...
फळले विकल्प
तटतटलेत दृष्टीबंध निमिषात
लवली पापणी
चुकचुकली पाल माथ्यावर.
दिशांनी करणी केल्यागत
लागलेत क्षण झुरणीला
मंतरलेल्या सापळयात
खदखदत दलदल
कर्वाम्ल कंपनाने
फसफसणारे शेवाळ माळ सभोवार
'मी' असणाऱ्या या मिश्र तवंगावर तरंगत..
तू उभा
मगरूर आदि – भैरव
वज्रोत्कीर्ण अस्मितेत
प्रभंजनाच्या कडयावर
गालावर नक्षत्रांच्या गोंदवीत मेघ
असूर्यंपश्या दरीच्या अर्ध-नग्न गात्रांवर
लोटीत कावळयांचे शैल शृंग
पेटवीत कातळांत विषगंध
शेष फणांवर मांडून
विश्रब्ध डाव भातुकलीचा
विसावणाऱ्या पृथ्वीचे
झापीत नेत्र चंचल अस्वली पंजानी
प्रशांत सागराच्या कोथळयांत
नांगरून घट्ट
आपले दुर्मद गलबत
टेहळीत किनारे स्थानबद्ध—बुभुक्षित
तडजोडीची बोलत भाषा
तूच निर्मिलेल्या स्थितीप्रिय
यत्न रक्षीत
वारूळाच्या महाद्वाराशी
मी बसून शरणार्थी
विस्थापित झोळीत घालून
विधवेचा मूक-गर्भ
दत्ताच्या तसबीरीतील
श्वाना सारखा
उष्टावण रक्षीत
येणाऱ्या वाटसरूंची
अडवीत वाट...

गाडीतला प्रवास : एक भावानुभव / आर्. एस्. केळकर

त्या अनोळखी प्रदेशात
भाड्याने अंथरूण घेतले मी
रात्रभराच्या आरामासाठी
आगगाडीत;
आणि माझे स्टेशन येताच
कसा उतरून गेलो
एखाद्या बेपर्वा बादशहासारखा
माझ्याच गुर्मीत !

विचारही कसा आला नाही मनात
की माझ्यामागे अंथरूण एकटे पडले आहे
आणि मी त्याला, अशा
निराधार अवस्थेत निःसंकोच सोडून जातो आहे !

काल रात्रभर आम्ही परस्परांच्या
अंगलगीत झोपलो होतो, उबेत विसावलो होतो;
कसे नाही स्मरले की जणू, काही काळ
अध्यात्मातील द्वैताचे अद्वैत बनलो होतो !
आता आम्ही फिरून वेगळे झालो आहोत :
जसे काही तेथे माझेच शव पडले आहे अजून
ज्याला फक्त रात्रभर
माझे हे उपरे चैतन्य होते कसेबसे बिलगून !

स्वैर अनुवाद – 'सेतु'

अभिमान / दुर्गेश

घराच्या चार जीर्ण भिंती
एक वाकली जमिनीकडे
दुसरी-तिसरीला गेल्या विशाल भेगा
चवथीचे अस्तित्व अशाश्वत.
केव्हा कोसळेल अनिश्चित
टेक देऊन सावरला तोल कसातरी !
पण अजूनही घर म्हणून
सांगतोच अभिमानाने ! !

झाडे होऊन जाऊ / ज्योती लांजेवार

वादळून वादळून सुस्तावली आहेत
भोवतालची सगळी झाडे
आपण मात्र ऊबच देत आहोत...
नजरेने नजरेला...
चल, झाडे होऊन जाऊ
फांद्या तर छाटणार नाहीत कुणी ?
केव्हा वादळू...केव्हाही शांत होऊ
रानात तर फिरकणार नाहीत कुणी
अडवायला तुला...गला ?

मावळतीला / वसंत सावंत

मावळतीला झुलत झुलत मी एक प्रवासी
अनाम गावा तुझ्या उतरलो मी घरवासी.
पिवळया माळावरी पसरल्या केशरवाटा
थरकत आल्या देहामधुनी पिवळ्या लाटा.
निळसर श्यामल सह्याद्रीच्या दूर कड्यांवर
भाळावरच्या सरकत होत्या अगम्य रेषा...

समुद्र / श्रीपाद गंगाधर कावळे

क्षितिजाचे भर्जरी काठ
चंदेरी समुद्र
भूसंपन्न कोटयावधी लाटांचे बलीष्ठ हात
दूरवर पसरलेले अफाट स्वामीत्व
डौलदार नावांची फडफडती शीडे
लहरत्या लाटांवर
ध्वनिरम्य सूर नादावलेले
सार्थ संगीत..
—समुद्र धुंदावला नाही.
तळाशी मौक्तिकांचे भरघोस खच
फुलारलेले फुलोर—
तरंगते मासे
अंतस्थ पाचूचे वृक्ष.
—समुद्र वेडावला नाही.
एव्हढे प्रचंड बाहूबल
आमरण कक्षा बद्ध
पोर्णिमेची बघत वाट
आमरण जागरण
पितृवत किणाऱ्याची ओढ...
—समुद्र धुंदावला नाही.

⊗ ⊗ ⊗

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त १-७-१९७९ ते ३०-९-१९७९

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. **कार्यालय व्यवस्थापन :**

१.१ दि. २९-७-७९ ला कार्यकारी मंडळाची सभा केंद्रिय कार्यालयात झाली. बहुसंख्येने आजीव सभासद करण्यात सर्वश्री धनकर व म्हैसाळकर यांनी जे सहकार्य दिले त्यावद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. आजीव सदस्यांची ५०००/- रु. ची रक्कम कायम स्वरूपाची ठेव म्हणून ठेवावे असे ठरले.

वार्शी येथील मराठी साहित्य संमेलनासाठी कार्य कारीणीचे सर्व सदस्य व अध्यक्ष प्रणीत सदस्य मिळून २५ नावे मतदार म्हणून महामंडळाकडे पाठवावीत असे ठरले.

१.२ दि. २९-७-७९ ला विदर्भ साहित्य संघाच्या घटनेत काही फेरबदल करण्यासाठी विशेष साधारण सभा दुपारी १२.३० वाजता भरली. मुख्यत्त्वेकरून सर्वसाधारण सभासद वार्षिक वर्गणी रु. १०/- व आजीव सभासद वर्गणी रु. १५१/- करण्यास संमती देण्यात आली. दि. ९-९-७९ ला ह्या फेरबदलांना झालेल्या विशेष सर्व साधारण सभेत सर्वानुमते शिक्कामोर्तब करण्यात आले.

१.३ वार्षिक सभा— दि. २९-७-७९ ला दुपारी ४ वाजता गडकरी सभागृहात ही सभा भरली. गतवर्षाचे कार्यवृत्त व हिशेव संमत करण्यात आले. १९७९-८० चा अर्थ संकल्प संमत झाला. श्री. महेश्वर गद्रे यांची १९७९-८० करता (चार्टर्ड) हिशेब तपासनिस म्हणून नेमणूक करण्यात आली.

पुढील निवडणूकीवावत तक्रारींचा विचार करून निकाल देण्यासाठी लवाद म्हणून अॅड. विजय धुंडीराज देशमुख यांची नियुक्ती करण्यांत आली.

२. **आजीव सदस्य**

२.१ सर्वश्री—

(१) पु. ह. धनकर, चंद्रपूर
(२) श. प. जयस्वाल, नागभीड
(३) वा. सो. वासोड, चंद्रपूर
(४) स. वि. सालफळे, चंद्रपूर
(५) मु. वा. उपगन्लावार, चंद्रपूर
(६) आ. व्य. सोनवळकर, चंद्रपूर
(७) श्री. मा. तिमांडे, चंद्रपूर
(८) वि. सा. आइंचवार, चंद्रपूर
(९) य. ह. सरदेशपांडे, चंद्रपूर
(१०) मनोहर त्र्यं. म्हैसाळकर, नागपूर
(११) सौ. माधवी मनोहर म्हैसाळकर, नागपूर
(१२) रमेश शंकर अंभईकार, नागपूर
(१३) अजित प्रभाकर दिवाडकर, नागपूर
(१४) सुरेश दत्तात्रय शेंद्रे, नागपूर
(१५) केशव गणेश जोशी, नागपूर
(१६) केशव सदाशिव मुळे, नागपूर

(१७) विजय निळकंठ वैद्य, नागपूर
(१८) संजय रामभाऊ पेंडसे, नागपूर
(१९) उल्हास वासुदेव केळकर, नागपूर
(२०) इ. जी. वसिष्ठा, नागपूर
(२१) चंद्रकांत उमाजी माळवी, नागपूर
(२२) रामदास बळीराम मोकादम, नागपूर
(२३) अरूण रघुनाथ आपटे, नागपूर
(२४) श्रीमती आशादेवी माहेश्वरी, नागपूर
(२५) प्रकाश माहेश्वरी, नागपूर
(२६) गोविंदचंद्र मिश्रा, नागपूर
(२७) एच. सी. व्ही. रॉक, नागपूर
(२८) सुबोध पांडुरंग धर्माधिकारी, नागपूर
(२९) श्रीधर परशुराम घारपुरे, नागपूर
(३०) राजेश्वर त्र्यंबक दिवाण, नागपूर
(३१) कुमुद श्रीधर पाठक, नागपूर
(३२) श्री. वा. चोरघडे, नागपूर
(३३) मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नागपूर
(३४) दिलीप गोपाळराव वाईकर, नागपूर
(३५) प्रभाकर नरहर चांदेकर, नागपूर
(३६) दत्तात्रय श्रीधर देशपांडे, नागपूर
(३७) वसंत भास्कर रानडे, नागपूर
(३८) अरविंद सिताराम पुराणिक, नागपूर
(३९) अशोक त्र्यंबक म्हैसाळकर, नागपूर
(४०) सुरेश द्वादशीवार, चंद्रपूर
(४१) के. ऊ. निवाळकर, चंद्रपूर
(४२) गजानन बुटले, चंद्रपूर
(४३) पद्माकर गोपाळ पळशीकर, नागपूर
(४४) दिनकर निळकंठ कुकडे, चंद्रपूर
(४५) दिवाकर बाळकृष्ण टोळे, नागपूर
(४६) अजित प्रभाकर देशपांडे, नागपूर
(४७) अरूण कुमार साहू, नागपूर
(४८) वर्षा मधुकर रेगे, नागपूर
(४९) प्रभाकर भालचंद्र खेळकर, अकोला
(५०) सौ. कमल आंबेकर, नागपूर
(५१) हरीष कुळकर्णी, नागपूर
(५२) सुधीर चंद्रकांत वाभुळकर, नागपूर

३. मराठी साहित्य महामंडळ

३.१ मराठी साहित्य महामंडळाची सभा वार्शी (जि. सोलापूर) येथे दि. १२–८–७९ ला घेण्यात येऊन ५४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात वार्शी येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले. नागपूर येथून वि. सा. संघाचे प्रतिनिधी गेले होते.

४. स्मृति दिन/जयंति

४.१ १४–७–७९ ला बाल गंधर्व स्मृति दिना निमित्त श्री. प्रभाकर देशकर, सौ. ललिता पाटणकर, सौ. अलकानंद झिमर्डे, सौ. मंदाकिनी पत्तरकिने यानी नाट्य संगीत मैफीलीत भाग घेतला. डॉ. मधुकर आष्टीकर ह्यांनी उत्कृष्ट धावती टीका व गीतांची जुळवणी केली. सर्वश्री जयराम पोतदार, जाधव, सामक ह्यांनी वाद्यांची साथ केली. कार्यक्रम फारच बहारीचा झाला.

१–८–७९ ला अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे जन्म शताब्दी निमित्त फोटोला हार घालण्यात आला. लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त त्यांचे प्रतिमेला हार घालण्यात आला.

२९–८–७९ लोकनायक कै. अणे जन्म शताब्दी निमित्त सभा घेण्यात आली त्यावेळी न्या. मू. श्री. मासोदकर, श्री. त्र्यं. गों. देशमुख, श्री. नाना साहेब ठेंगडी, श्री. बी. आर. मंडलेकर यांची भाषणे झाली. अध्यक्षस्थानी डॉ. आष्टीकर होते.

३०–८–७९ बालकवी बी ह्यांचे स्मृती दिना निमित्त त्यांचे फोटोला पुष्पहार घालण्यात आला.

२–९–७९ कै. भाऊसाहेब खांडकर यांचे स्मृती दिना निमित्त त्यांचे प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला.

५. स्वातंत्र्यदिन

५.१ १५–८–७९ स्वातंत्र्य दिना निमित्त वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. आप्टीकर यांचे हस्ते झेंडावंदनाचा कार्यक्रम झाला.

६. सांस्कृतिक कार्यक्रम

६.१ दि. २०, २१, २२–७–७९ गणेश व्याख्यान माला—यंदाची गणेश व्याख्यानमालेसाठी महाभारताचे गाढ अभ्यासक श्री. दाजी पणशीकर हे व्याख्यानासाठी आले होते, त्यांनी (१) कर्ण-द्रौपदीचे जन्म रहस्य, (२) डोळस व्यक्तिरेखा गांधारी, (३) धर्मयोगी युधिष्ठिर या विषयांवर व्याख्याने दिली. त्यांची व्याख्याने फारच गाजली.

६.२ आंतर शालेय कथा कथन स्पर्धा—ह्या स्पर्धा या वर्षापासूनच सुरू करण्यात आल्या असून ह्या स्पर्धेसाठी कु. कमल व्य. सगदेव यानी त्यांचे आईच्या स्मरणार्थ कै. सत्यभामाबाई स्मृती म्हणून कायम ठेव रु. १७००/- देणगी दिलेली आहे. ह्या स्पर्धा (वर्ग ५ ते ७) व (वर्ग ८ ते १०) अशा दोन गटात दि. १८ व १९–८–७९ ला घेण्यात आल्या. ह्या दोन्ही गटातील मुलांनी कथा सांगितल्या. एकंदर १६ शाळांनी यांत भाग घेतला होता व नागपूर बाहेरील उमरेड व वरोरा येथील शाळेतील मुलांनी पण भाग घेतला होता.

वर्ग (५ ते ७ यत्ता)–(अ) गट–प्रथम क्र. कु. अल्पना रिंगे, सरस्वती विद्यालय, नागपूर, रोख रु. ३०/-, द्वितीय क्र. कु. वर्षा रानडे, धरमपेठ माध्यमिक शाळा, रोख रु. २०/-, वर्ग (८ ते १०)–(ब) गट–प्रथम क्रमांक मिलिंद देवगांवकर, सरस्वती विद्यालय, वरोरा, रोख रु. ३०/-, द्वितीय क्रमांक प्रविण जयदेव, लोकांची शाळा, शिरसपेठ, नागपूर, रोख रु. २०/- ह्या शिवाय काहीना उत्तजनार्थ प्रशस्ती पत्रे देण्यात आली.

कथा कथनाच्या परिक्षकाचे काम सो. सुनीती आफळे व सौ. पुष्पा कोण यानी केले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. ज. रा. फणसाळकर यानी केले. वक्षीस समारंभ संघाध्यक्ष डॉ. मधुकर आप्टीकर यांचे हस्ते झाला. कार्यक्रमाला श्री. कमल सगदेव, अनेक पालक व शिक्षक उपस्थित होते.

६.३ महाविद्यालयीन रानडे वक्तृव स्पर्धा— दरवर्षी प्रमाणे या स्पर्धा गडकरी सभागृहात दि. २१, २२ व २३ सप्टेंबर, १९७९ ह्या दिवशी घेण्यात आल्या.

विषय :—"सर्वपक्षीय सरकार ही भारताची आजची गरज आहे."

(१) **ह्या स्पर्धेत एकंदर** १६ महाविद्यालयांनी भाग घेतला होता.

(२) स्पर्धेचे परीक्षक

(१) प्रा. मधुसुदन दत्तात्रय पारनंदीवार, (२) सौ. सुधा साठे हे होते.

(३) **बक्षीसे** : स्पर्धेची फिरती ढाल 'शासकीय मेडीकल कॉलेज', नागपूर, यांना मिळाली. प्रथम पारितोपिक रु. १००/- विवेक पी. देशपांडे, मेडीकल कॉलेज, नागपूर.

द्वितीय पारितोपिक रु. ७५/- एन. एस. भगत, शिवाजी कॉलेज, अमरावती.

(४) **प्रशस्तीपत्रे** (१) कु. धुपे–धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर, (२) कु. अनुराधा देशपांडे, हिस्लॉप कॉलेज, नागपूर, (३) सदाशिव शंकर गोखले, सिंधू महाविद्यालय, नागपूर, (४) कु. कल्पना कमलाकर पाटील, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा,

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ डॉ. म. स. चान्सरकर यांच्या हस्ते पार पडला. स्पर्धेला प्रतिसाद चांगला मिळाला.

अनुक्रमणिका

७. नाट्य समिती

७.१ महिला एकांकिका स्पर्धा—यंदाच्या या स्पर्धेत ११ संस्थेनी भाग घेतला होता. या स्पर्धा १४, १५ व १६ जुलै १९७९ ला धनवटे रंग मंदिरात झाल्या. सौ. रजनी राय यांचे हस्ते उद्‌घाटन होऊन सुरूवात करण्यात आली. त्यांनी स्पर्धेसाठी रु. १०१/- देणगी दाखल दिले. परीक्षक म्हणून सौ. कल्याणी देशमुख, श्री. मदन गडकरी व श्रीमती कुसुमताई मोहनी यांनी काम केले. पारितोषिक वितरण समारंभ दि. १७ ला सौ. आशा देवी महेश्वरी यांचे हस्ते झाला. त्यानी पण ह्यावेळी देणगी दाखल १०१/- रु. दिले. ह्याच दिवशी रसिक रंजन तर्फे "चक्र" ही एकांकीका सादर करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन सौ. कमल आंबेकर यानी केले.

नाटकाचे प्रथम पारितोषिक	व्यंकटेश ब्रह्मदेव जागीरदार फिरती ढाल व विदर्भ साहित्य संघ आणि कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक रु. १०१/- रोख.
नाटक – 'वळणावर गुलबक्षीच्या'	**सादरकर्ते** – रामनगर महिला समाज.
द्वितीय पारितोषिक	उत्कर्ष कला मंदिर फिरती ढाल व विदर्भ साहित्य संघाचे पारितोषिक रु. ७५/- रोख.
नाटक – 'नाही काहीच नाही'	**सादरकर्ते** – अॅमॅच्युअर आर्टीस्ट कंबाईन.
तृतीय पारितोषिक	विदर्भ साहित्य संघ व कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक रु. ६१/- रोख.
नाटक – रानफूल	**सादरकर्ते** – 'हर्णे महिला समाज'.
उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्र	चौसापी वाडा – सादर कर्ते नाट्यश्री–– अमरावती.
अभिनयाची पारितोषिक	विदर्भ साहित्य संघाचे रु. ३१/- चे रोख + ५१/- रु. रोख.
प्रथम पारितोषिक	श्रीमती मनोरमाबाई पोद्दार पारितोषिक सौ. शुभदा सावदेकर वळणावर गुलबक्षीच्या.
द्वितीय पारितोषिक	वि. सा. संघाचे रु. २५/- रोख कु. अंजली करकरे–– रानफूल.
तृतीय पारितोषिक	वि. सा. संघाचे रु. २०/- रोख विभागून कु. अनुराधा नायक : व्यथा ही अंतरीची : कु. मीरा कुलकर्णी : नाही काहीच नाही.
दिग्दर्शनाची पारितोषिके	वि. सा. संघ व कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक रु. ५०/- रोख, कु. प्रभा फणशीकर–वळणावर गुलबक्षीच्या.
द्वितीय पारितोषिक	वि. सा. संघाचे रु. २५/- रोख; सौ. चन्द्रप्रभा दिवेकर–– रानफूल.
लेखनाचे पारितोषिक	विदर्भ साहित्य संघातर्फे लेखनाचे रु. ३१/- चे पारितोषिक सौ. आसावरी ब्रह्म यांच्या रंग माझा वेगळा या एकांकिकेस देण्यात आले.

कै. सुशीलाबाई कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ रु. २५/- चे बाल कलाकारासाठी ठेवलेले पारितोषिक कु. अनुराधा जाऊरकर हिला 'विहीणबाई रुसली—नवरा नवरी विनमली' मधील विनोदीकेच्या भूमिकेसाठी देण्यात आले.

७.२ कै. रघुनाथराव आष्टीकर स्मृति विनोदी एकांकिका स्पर्धा—वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. मधुकरराव आष्टीकर ह्यांनी आपल्या वडिलांच्या स्मृति प्रीत्यर्थ दिलेल्या ३०००/- रु. च्या देणगीतून या स्पर्धा यंदा पासून नव्यानेच सुरू करण्यात आल्या असल्या तरी प्रतिसाद फारच छान मिळाला. ह्या स्पर्धेसाठी एकंदर १९ संस्थानी भाग घेतला होता. ह्या स्पर्धेचे परीक्षक सर्वश्री प्रभाकर पुराणिक, मधु जोशी आणि किशोर कुळकर्णी हे होते. ह्या स्पर्धा दि. ४, ५, ६, ७, ८, ९ ऑगस्ट, १९७९ ला घेण्यात आल्या. दि. १० ला पारितोषिक वितरण समारंभ कुलगुरू दादासाहेब काळमेघ यांचे हस्ते झाला. बक्षिस वितरणानंतर नवप्रभात या संस्थेतर्फे "जगन कमळ बघ" ही एकांकिका सादर करण्यात आली. या स्पर्धेसाठी श्रीयुत रमेश अंधारे यांनी आपले वडील कै. गणेश सखाराम अंधारे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ फिरती ढाल दिली. या विनोदी एकांकिकेच्या स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे आहे. कार्यक्रमाचे संचालन सौ. कमल आवेकर यांनी केले.

पारितोषिक प्राप्त नाटके — अनुक्रमे ३ बक्षिसे

	संस्था	एकांकिका	पारितोषिक
१.	बालरंजन, नागपूर	'पळी म्हणाली पोळपाटाला'	७५ रु. रोख व फिरती ढाल
२.	कला तरंग, नागपूर	'माशानं गिळला फासा'	५० रु. रोख
३.	गंधर्व कलामंदिर, नागपूर	'भानगडी शिवाय पुरूष नाही'	२५ रु. रोख
४.	स्टाफ रिक्रिअेशन क्लब, एम. एम. ई बी., नागपूर	'घरमालक'	उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्रक

वैयक्तिक अभिनय गुणवत्ता — २ पारितोषिके

	संस्था	एकांकिका	कलाकार	भूमिका	पारितोषिक
			(पुरूष)		रोख रु.
१.	स्टाफ रिक्रीअेशन क्लब' एम. एस. ई. बी, नागपूर	'घरमालक'	अशोक इनामदार	'गजानन'	२०/-
२.	बालरंजन, नागपूर	'पळी म्हणाली पोळपाटाला'	पराग लुले	'पंडित'	१५/-
			(स्त्री)		
३.	कलातरंग, नागपूर	'माशानं गिळला फासा'	कु. सुहास बोंद्रे	'छकुली'	२०/-
४.	अेलेव्हन स्टार्स एसोसिएशन, वर्धा	'कथा दिनूच्या मृत्युपत्राची'	कु. निलिमा धारसकर	'मिनी'	१५/-

दिग्दर्शनाचे एक पारितोषिक

संस्था	एकांकिका	दिग्दर्शक	पारितोषिक
१. बालरंजन, नागपूर	'पळी म्हणाली पोळपाटाला'	हेमंत चिटणवीस	रु. २५/- रोख

लेखनाचे विशेष प्रशस्तीपत्र

श्री. नाना ढाकुलकर –– "माशानं गिळला फासा"

७.३ घर अंगण–– २८–७–७९ ला घर अंगण या कार्यक्रमाअंतर्गत रंग स्वानंद या संस्थेतर्फे 'सांगाती' ह्या एकांकीकेचा प्रयोग गडकरी सभागृहात करण्यात आला.

७.४ ११–८–७९ ला घर अंगण या कार्यक्रमा अंतर्गत चंद्रपूरचे श्री. दिलीप आलोणी यांचा मूक अभिनय कार्यक्रम झाला.

८. चित्रकला समिती

८.१ कै. नलिनीबाई जतकर शालेय चित्रकला स्पर्धा–– वरील स्पर्धा १२–२–७९ रोजी झाल्या. त्याचा बक्षीस समारंभाचा कार्यक्रम दि. १७–८–७९ ला प्रसिद्ध चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांचे हस्ते झाला. पहिल्या ५ क्रमांकाना रोख पारितोषिके व नवयुग विद्यालय, हनुमाननगर, नागपूर, या शाळेला फिरती ढाल देण्यात आली.

८.२ चित्रकला प्रदर्शन–– बाल चित्रकारांच्या कलाकृतीचे एक प्रदर्शन दिनांक ६–७–७९ ला युवा शक्ती उत्कर्ष मंडळ, वसोली ग्रुप व वि. सा. संघाच्या सहकार्याने वि. सा. संघाच्या चित्रकला दालनात भरविण्यात आले.

९. उर्दू शिक्षणाचे वर्ग

दि. १०–९–७९ ला श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे अध्यक्षतेखाली हलकए-अहबाब व विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने डॉ. मधुकर आष्टीकर ह्यांचे हस्ते उर्दू शिक्षणाच्या वर्गांचे उद्घाटन करण्यात आले. हे वर्ग आठवड्यातून ४ दिवस सायंकाळी ७-३० ते ८-३० भरत असतात.

१०. परीक्षा समिती :

१०.१ परीक्षा समिती : प्रथम सत्रीय वृत्त––

(१) दि. १ व २ सप्टेंबर, १९७९ रोजी झालेल्या विविध परीक्षांना एकूण ६९८ परीक्षार्थी १३ केन्द्रांत सम्मीलित झालेत.

(२) आगामी परीक्षा दि. २ व ३ फेब्रुवारी, १९८० रोजी होतील. आवेदनपत्रे १५ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयात पोचली पाहिजेत.

(३) १९८० बोर्ड व विद्यापीठाच्या बदलत्या अभ्यास क्रमानुसारच परीक्षा होतील, याची सर्व संबंधितांनी दखल घेणे आवश्यक आहे.

विदर्भ साहित्य संघ परीक्षा समिती

प्रथम सत्र सप्टेंबर, १९७९

परीक्षाफल

१०.२ शासकीय परीक्षा : मराठी प्राज्ञ—श्रीमती वनिता यावले (सर्वप्रथम), श्री. अशरूल्ला खान, श्री. के. चंद्रशेखरय्या, श्री. एस. के. एस. गैहिदू, श्री. राम बाबू शुल्ला.

सा. पारंगत प्रथम खंड— द. बा. सेलोटे.

सा. स्नातक संपूर्ण— प्रथम श्रेणी डॉ. कुसुमलता पटोरिया (सर्वप्रथम), द्वितीय श्रेणी कु. नूतन सवनीस, तृतीय श्रेणी श्री. अ. शा. झोड.

सा. स्नातक खंड–३— द्वितीय श्रेणी कु. सुनंदा खपली, कु. वत्सला कोल्हे, तृतीय श्रेणी नि. पां. महाकुलकर.

सा. स्नातक खंड–१— द्वितीय श्रेणी कु. मेघा तांबेकर, तिलोत्तमा शेंडे, सुभाष वावनकुळे, तृतीय श्रेणी–दूर्गाशंकर डोर्लीकर, सुभाष तोटावार, डो. मु. कांबळे, एम. के. पचारे, कु. निर्मला धकीते, रेखा वंजारी, सुनंदा धार्मिक, भ. चिं. गिरडकर, सु. मो. कोरडे, दि. रा. खत्री, प्र. हि. काळबांडे, र. कि. शेंगर, वा. श्रा. वैद्य, सु. श्रा. असरडे.

भाषा स्नातक संपूर्ण– द्वितीय श्रेणी–कु. शोभा ठमके, रमेश वाटाणे, ग. म. सावळे, ना. आ. खराटे, तृतीय श्रेणी–आ. कृ. वाघमारे.

भाषा स्नातक खंड–३ —श्रीनिवास रिसालदार (सर्वप्रथम), प्रथम श्रेणी–कृष्ण मा. बैतुले, मीना चिमूरकर, द्वितीय श्रेणी–गजानन बरडे, तृतीय श्रेणी– सुरेश वैरागडे, बाबा उमाठे.

भाषा स्नातक खंड २, ३ — शंकर महादेवराव गोरकर.

भाषा स्नातक खंड–१ — कल्पना गोपाळकृष्ण देशकर (सर्वप्रथम), द्वितीय श्रेणी कु. चंद्रकला सोरते, कु. विजया सोनी, सुलभा देशकर, वसंता जीवतोडे, ललीत रामटेके, मनोहर खोडे, तृतीय श्रेणी कु. उज्वला उमाठे, देवका सोरते.

सा. स्नातक खंड १, ३—कु. तानाबाई रामटेके.

१०.३ पारितोषिक प्राप्तकर्ते परीक्षासत्र १ सप्टेंबर, १९७९

परीक्षा	परीक्षार्थी नांव	केन्द्र	पुरस्कार रक्कम
			रु. पै.
म. प्रवेश	कु. पुष्पा टेऊमल भाग्या	बाबानानक सिंधी हिंदी हा., नागपूर	५.००
म. परिचय	कु. उर्मिला रामेश्वर शर्मा	—,,—	५.००
म. बोध	रवींद्र अंबादास अंबाडकर	खल्लार हायस्कूल, खल्लार	५.००
म. प्रबोधिनी	श्री. एस. एस. शिसोलिया	कुर्वेज न्यूमॉडेल हायस्कूल, नागपूर	५.००
म. प्रबोध	रामआसरे मुन्शीराम श्रीवास	कुर्वेज न्यू मॉडेल हायस्कूल, नागपूर	५.००
म. प्रारंभ	कु. सविता नारद कानतोडे	जिल्हा परिषद म. गांधी विद्यालय, लाखनी	५.००
सा. विनीत	सुनील अंतोबा ढेंगे	जि. प. गांधी विद्यालय, लाखनी	१५.००
सा. प्रबोध	बाळकृष्ण रामभाऊ महाजन	भा. भा. मंदिर, नागपूर	५.००
भा. परिचित-१	कु. ममता द्वारकाप्रसाद कपूर	जनता कॉलेज ऑफ एज्यु., चंद्रपूर	५.००
भा. परिचित-२	वसंत मोतीरामजी काळे	भारत विद्यालय, अकोला	
सा. परिचित-१	कु. कल्पना दादाजी टिपले	जनता कॉलेज ऑफ एज्यु., चंद्रपूर	५.००
सा. परिचित-२	रवी दिवाकरराव गिऱ्हे	भा. भा. मंदिर, नागपूर	५.००
सा. स्नातक	डॉ. कुसुमलता पटोरिया	भा. भा. मंदिर, नागपूर	१०.००
भा. स्नातक	श्रीनिवास गंगाधरराव रिसालदार	—,,—	१०.००
म. प्राज्ञ	श्रीमती वनिता बाबाराव यावले	शासकीय परीक्षा केन्द्र, वि. सा. संघ	२५.००

११. शाखावृत्त

११.१ नरखेड—१९७९–८० सालासाठी खालील कार्यकारीणी स्थापन करण्यात आली. अध्यक्ष–रमेश गुप्ता, उपाध्यक्ष–तुकाराम क्षिरसागर, सौ. मिनाक्षी अंधारे, सरचिटणीस–प्रा. रमेश पोतदार, चिटणीस–प्रा. उमाटे, सौ. आशाताई सुरजुसे, आनंद गुरमुळे, कोषाध्यक्ष–भाऊराव ठाकरे, सदस्य– प्रा. वासुदेव डहाके, रामराव ढोके, पां. गो. कटोर, बाबुराव दंदारे, सुभाष खोडे, सुधाकर ठाकरे, भा. शा. काकडे, कृष्णा राऊत, नंदु क्षिरसागर, जयंती पटेल, रमेश कायंदे,

तुळशी जयंती निमित्त— जनमानसात तुलसीदासाचे स्थान स्वामी श्री निर्गुणजी यांचे प्रवचन झाले. अध्यक्ष स्थानी ज्ञा. ह. वोंडे हे होते.

११.२ कारंजा (घाडगे) ता. आर्वी—१९७९–८० सालासाठी खालील कार्यकारीणी नियुक्त करण्यात आली. अध्यक्ष–सर्वश्री शिवकुमार बाजपेयी, सचिव–बाबाराव भुसारी, सहसचिव–श्री. सुरेश पालीवाल, कोषाध्यक्ष–विमल शर्मा, सदस्य–शशिकांत सिरास, डॉ. शिरभाते, डॉ. रोटकर, जयकिसन अग्रवाल, नरेश इंगळे.

इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

परिशिष्ट २

विदर्भ साहित्य संघ

उमेदवारी परत घेण्यासंबंधीचे आवेदन पत्र/पृ. १२/छ/मध्ये निर्देशित :

१ एप्रिल, १९ ते ३१ मार्च, १९ ह्या तीन वर्षांकरिता होणाऱ्या विदर्भ साहित्य संघाच्या केन्द्रीय कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीसाठी मी अध्यक्षाच्या / सभासदाच्या पदाकरिता उमेदवार म्हणून नाम निदर्शक पत्रिका दिली होती. या आवेदन पत्राद्वारे मी आपली उमेदवारी परत घेत आहे.

दि··············· उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवाराचे नाव ····················

सभासद सूची

पृष्ठ ·············

हे आवेदन पत्र मी स्वतः·· अथवा माझे सूचक·········

ह्यांनी आज दिनांक

····ला निर्वाचन अधिकाऱ्यांसमोर प्रस्तुत केले.

स्वाक्षरी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वार्षिक वर्गणीदारांना सूचना

विशेष साधारण सभेत संमत झाल्याप्रमाणे वि. सा. संघाच्या सर्वसाधारण सभासदांची वार्षिक वर्गणी रु. १०/- व आजीव सभासदांची वर्गणी रु. १५१/- करण्यात आली आहे. हा बदल ९ सप्टेंबर, १९७९ पासून अमलात आलेला आहे. संस्थेचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च आहे.

———

विदर्भ साहित्य संघ, नागपूर.

खालीलप्रमाणे घटनेत फेरबदल

दि. २९–७–७९ च्या विशेष साधारण सभेत संमत झाले आणि दि. ९–९–७९ च्या विशेष साधारण सभेत त्यावर शिक्कामोर्तब झाले.

(१) **मूळ घटनेत असलेले खालील मुद्रण दोष सुधारावेत :**

पृ. ७ मध्ये "कलम १२ निवडणूक" हे शब्द घालावे.

पृ. ९ (औ) मध्ये (उ) च्या ऐवजी (ङ) हा शब्द घालावा.

पृ. २६ कामकाजाचे नियम (१२) मधील (१५) (अ) मधील (अ) गाळावा.

पृ. १२ (छ) मध्ये निर्देशित उमेदवारी परत घेण्यासंबंधी परिशिष्ट २ जोडावे (सोबत जोडले आहे).

(२) **घटनेत खालीलप्रमाणे फेरबदल करावेत :**

पृ. ३ कलम ७ (उ) आजीव सभासद "एकशे एक" हा शब्द गाळून त्या जागी "एकशे एक्कावन" हा शब्द टाकावा.

(ऊ) साधारण सभासद– ("पाच") हा शब्द गाळून त्या ऐवजी "दहा" हा शब्द घालावा.

पृ. ८ कलम १२ निवडणूक

(ऊ) "सूचीत संशोधन करतील" हे शब्द गाळून "सूचीला पुरवणी जोडतील" हे शब्द घालावे.

(ए) "संशोधित मतदारांची" हे शब्द गाळावे आणि त्या ऐवजी "वरील" शब्द घालावा.

"व युगवाणीच्या जानेवारी महिन्याच्या अंकात" हे शब्द गाळावेत.

पृ. १७ कलम १५ :

कार्यकारी मंडळाची कर्तव्ये व अधिकार यातील "अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षाचे सर्व अधिकार अध्यक्षाने नामनिर्दिष्ट केलेल्या नागपूरच्या उपाध्यक्षास राहतील" यातील "अध्यक्षाचे सर्व अधिकार" हे शब्द गाळून "कार्यालयाने प्रस्तुत केलेल्या दैनंदिन कामकाजाचे सर्व अधिकार" हे शब्द घालावेत.

पृ. २६ — कामकाजाचे नियम — नियम १३

"तिसऱ्या वर्गाचे" ऐवजी "दुसऱ्या वर्गाचे" हे शब्द घालावेत आणि "मात्र संमेलनाच्या वेळी भरणाऱ्या सभांना असा प्रवास भत्ता मिळणार नाही" हे वाक्य गाळावे.

अनुक्रमणिका

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झांशी राणी चौक, नागपूर–१२.
मुद्रक : क. मा. सावंत, व्यवस्थापक, नागपूर विद्यापीठ मुद्रणालय, नागपूर–१०.

युगवाणी

१९६७ - जाने, जून, ऑग, ऑ
नो, डि - ६ अंक

१९६८ - मार्च - १ अंक